महाराष्ट्राचे
# शिल्पकार

# गोपाळ कृष्ण गोखले



डॉ. आशुतोष भुपटकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार : चरित्रग्रंथ माला

# गोपाळ कृष्ण गोखले

**लेखक**

**डॉ. आशुतोष भुपटकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(एच-१७२)-१

➢ **पुस्तकाचे नाव** : महाराष्ट्राचे शिल्पकार गोपाळ कृष्ण गोखले

➢ **लेखक** : डॉ. आशुतोष भुपटकर

➢ **आयएसबीएन** : ९७८-९३-९३५९९-६६-०७

➢ **प्रथमावृत्ती** : २०२३

➢ **प्रकाशक** : सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५

➢ © **प्रकाशकाधीन**

➢ **मुद्रक** : व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी.पी.ओ. नजीक, पुणे - ४११ ००१

➢ **किंमत** : रुपये ६२/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

इंग्रजी राज्यप्रणाली व अर्थशास्त्राचा बारकाईने अभ्यास करून त्यांचाच वापर करून ब्रिटिश सरकारला भारताच्या सर्वांगीण उन्नतीसाठी धारेवर धरणाऱ्या मोजक्या देशभक्तांमध्ये गोपाळ कृष्ण गोखले हे अग्रणी होते. देशाला लोकशाही प्रणालीची ओळख स्वातंत्र्य मिळण्याआधी त्यांनी करून दिली. त्यांनी निष्ठेने केलेली निरंतर देशसेवा ही नंतरच्या गांधीप्रभृती नेत्यांना प्रेरणादायी ठरली.

काही कारणाने त्यांचे चरित्र महाराष्ट्राचे शिल्पकार या मालेत राहून गेले होते. ती उणीव आता भरून निघत आहे.

महाराष्ट्रातील युवा पिढीला हे चरित्र बोधप्रद होईल यात शंका नाही.

– सदानंद मोरे,

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

‘‘चरित्र लिहिण्यात अथवा पुतळे
उभारण्यात वेळ वाया घालवू नका,
पण जीव ओतून देशाची सेवा करा,
तरच तुम्ही सच्चे आणि निष्ठावंत देशसेवक
म्हणवून घ्यायला लायक ठराल’’

फेब्रुवारी १९१५ मध्ये मृत्युशय्येवर असताना गोपाळ कृष्ण गोखले
यांनी आपल्या सहकाऱ्यांना उद्देशून काढलेले उद्गार.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | मनोगत | ०८ |
| १. | जीवनपट | १२ |
| २. | द्रष्टा शिक्षणवेत्ता | ३५ |
| ३. | उत्कृष्ट संसदपटू | ४३ |
| ४. | राजकीय नेतृत्व | ५३ |
| ५. | आंतरराष्ट्रीय कर्तृत्व | ७६ |
| ६. | आदर्श देशसेवक | ८७ |
| ७. | गोखल्यांचे अर्थकारण | ९८ |
| ८. | नेत्यांचा नेता | ११५ |

# मनोगत

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार या मालिकेत नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे चरित्र प्रकाशित होण्यास त्यांच्या मृत्यूनंतर एक शतक उलटावे, याचा अर्थ असा की त्यांचे कार्य काळाच्या उदरातून बाहेर काढून नव्या पिढीसमोर ठेवण्याचे महत्त्व जाणकारांना वाटले असावे. एखाद्या भव्य प्रासादाचे कौतुक करताना त्याच्या शिल्पकाराची आठवण क्वचित होते, तद्वत भारतातील सर्वाधिक प्रगतिशील राज्य म्हणून ज्या महाराष्ट्राची गणना केली जाते, त्याच्या प्रगतीचे मूळ प्रवाह कोठून वाहत येतात हे पाहिले जात नाही. महाराष्ट्रातील समाज सुधारणा, शिक्षणकारण, अर्थकारण, सहकारी चळवळ आणि औद्योगिक विकास या सर्व घटकांचा परस्परपोषक असा संबंध असल्यामुळे आज जी प्रगती दिसते ती घडून आली, असे मानण्यास जागा आहे. अजून बराच पल्ला आपल्याला गाठायचा आहे हे अर्थातच उघड आहे.

त्यासाठी गेल्या शतकामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात जे थोर नेते होऊन गेले त्यांच्या कार्य-कर्तृत्वाचा धांडोळा घेणे आवश्यक ठरते. प्रसिद्ध ब्रिटीश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल म्हणत असत, ''इतिहास अभ्यासा, अभ्यास करा, कारण सत्ताकारणाची सर्व रहस्ये तुम्हाला त्यात सापडतील.''

नामदार गोखले हे संपूर्ण भारतात आधुनिक भारताचे शिल्पकार या मालिकेत झळकत असताना महाराष्ट्रात त्यांच्या कार्याची म्हणावी तशी दखल आज घेतली जात नाही. जनमानसाला जहाल व्यक्तिमत्त्वाचे स्वाभाविक आकर्षण असते. गोखले हे मवाळ पक्षाचे समजले जात आणि अजूनही तीच त्यांची प्रतिमा आहे. त्यामुळे कदाचित त्यांचे कार्य विस्मृतीच्या पडद्याआड गेले असावे. तुलनेत लोकमान्य टिळकांचे व्यक्तिमत्त्व लोकांच्या मनात ठसले आहे.

पण २००९ मध्ये जेव्हा शिक्षण हक्काचा कायदा संमत करण्यात आला, त्यावेळेस नामदार गोखले यांनी १९१० मध्ये तत्कालीन कायदेमंडळात मांडलेल्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या ठरावाचा प्रामुख्याने उल्लेख करण्यात आला. गोखल्यांच्या

दूरदर्शित्वाला येणाऱ्या शतकाचे आकलन कसे झाले याचा उलगडा नंतरच्या प्रकरणात होईल.  आणखी ज्या कारणाने गोखल्यांची आठवण होते ती गांधीजींमुळे.

जेव्हा जेव्हा महात्मा गांधींच्या कर्तृत्वसंपन्न वारशाची उजळणी करण्याचा प्रसंग येतो, त्या त्या वेळेस नामदार गोखल्यांची आठवण जागी होते. याचे प्रमुख कारण म्हणजे महात्माजी गोखल्यांना आपले राजकीय गुरु मानत होते.

टिळक आणि गोखले यांच्या भिन्न कार्यशैली हे देखील अभ्यासकांच्या संशोधनाचा विषय राहिलेले आहेत.  त्यामुळे देशी व परदेशी लेखकांची या विषयावरची पुस्तके अजूनही प्रकाशित होत असतात.  पुस्तकाच्या शेवटी दिलेल्या संदर्भ सूचीवरून गोखले यांच्याविषयी किती ग्रंथ संपदा उपलब्ध आहे याचा अंदाज येऊ शकेल.

एकविसाव्या शतकातील तरुण वर्गाकडून मोठ्या अपेक्षा आहेत.  महाराष्ट्र आणि संपूर्ण देशासमोर सर्व सामाजिक घटकांची सर्वांगीण प्रगती जलद गतीने साधण्याची गरज आहे.  अशा वेळेस आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारांकडून त्यांना शिकण्यासारखे खूप काही आहे.  महाराष्ट्राला तरुण नेतृत्वाची वानवा कधीच भासलेली नाही.  क्षेत्र शेती, सहकार, उद्योग, शिक्षण वा राजकारण असो, या सर्वांचा परस्परपूरक संबंध असतो आणि ज्यांना सत्ता आणि संपत्ती नव्हे तर परिवर्तन आणि प्रगती साधण्यासाठी नेतृत्व करावयाचे आहे, त्यांना या सर्व क्षेत्रांचा परस्पर संबंध काय आहे ते समजून घेण्याची आवश्यकता आहे.  हे ज्ञान मिळविण्याचा राजमार्ग म्हणजे आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारांची चरित्रे. हे सर्व तरुणवर्गाचे संचित आहे.  त्याचा लाभ ते घेतील अशी आशा आहे.

गोखले यांचे आयुष्य अवघे ४९ वर्षांचे, पण त्यांच्या कामाची क्षेत्रे शिक्षणापासून पक्षीय आणि संसदीय राजकारणापर्यंत विस्तारलेली होती.  त्यांचे अर्थविषयक चिंतन आणि देशसेवेचा त्यांनी निवडलेला मार्ग यांचा देखील तत्कालीन राजकारणावर प्रभाव पडला होता.  या सर्वांचा मागोवा घेत असताना त्यातल्या प्रवाहांचा महाराष्ट्राच्या प्रगतीवर काय परिणाम झाला हे तपासण्याचा प्रयत्न या पुस्तकात  केला आहे.

पुस्तक लिहिताना एकविसाव्या शतकातील तरुण जिज्ञासू वर्ग डोळ्यासमोर ठेवला

आहे.  त्यांना आपल्या राजकीय सामाजिक संचिताची जाणीव होऊन त्याचा डोळस अभ्यास करण्यास त्यांनी प्रवृत्त व्हावे, हा या पुस्तक लेखनाचा उद्देश आहे. त्यामुळे वैचारिक बैठक असणारे नेतृत्व लाभलेली महाराष्ट्राची परंपरा पुढे चालू राहील अशी आशा आहे.

गोखल्यांचे चरित्र लिहिण्याची मला संधी मिळाली हे मोठे भाग्य असे मी समजतो. कारण ज्या डेक्कन एजुकेशन सोसायटी च्या वाढीसाठी गोखल्यांनी अविरत परिश्रम केले त्या सोसायटीचा आजीव सदस्य म्हणून मी १९८७ मध्ये निवडला गेलो. २००५ मध्ये निवृत्तिपूर्व रजेवर जाण्यापर्यंत वेगवेगळ्या पदांवर काम करण्याची संधी मला मिळाली. ज्या काळात देशामध्ये लोकशाही कार्यप्रणाली रुजलेली नव्हती, त्या काळात डे ए सोसायटीची कार्यपद्धती ही लोकशाही मूल्ये, संरचना आणि प्रणाली यावर आधारित होती आणि तिला बळकट करण्यात गोखल्यांचा मोठा वाटा होता. या गोष्टी मला सोसायटीत काम करताना अनुभवायला मिळाल्या.

हे चरित्र लेखनाचे काम मजकडे सोपविल्याबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा मी आभारी आहे.

– डॉ. आशुतोष भुपटकर

# राष्ट्रपुरूष



गोपाळ कृष्ण गोखले

# १ जीवनपट

## जन्म

९ मे १८६६, कोतळूक, तत्कालीन ता चिपळूण, सध्या ता. गुहागर, जि  रत्नागिरी

## शालेय शिक्षण

कागल, जि कोल्हापूर आणि राजाराम हायस्कूल, कोल्हापूर, मॅट्रीक परीक्षा: १८८१

## विवाह

१८८० – पत्नी सावित्रीबाई

१८८७ – पत्नी राधाबाई

## पदवी शिक्षण

१८८२ – पदवीपूर्व, राजाराम कॉलेज, कोल्हापूर

१८८३ – प्रथम वर्ष, डेक्कन कॉलेज, पुणे

१८८४ – बी. ए. (ऐच्छिक – गणित), एल्फिन्स्टन कॉलेज , मुंबई

## नोकरी

जानेवारी १८८५ मध्ये न्यू इंग्लिश स्कूल पुणे येथे शिक्षक म्हणून रुजू,

जून १८८५ मध्ये फर्ग्युसन कॉलेज मध्ये व्याख्याता म्हणून नेमणूक

## सदस्यत्व

जून १८८६ मध्ये डेक्कन एजुकेशन सोसायटी चे आजीव

सदस्यत्व. १८९२  ते १८९८ : कार्यवाह, डे. ए. सोसायटी, पुणे

## सार्वजनिक सभा

१८८८ – मानद कार्यवाह आणि 'पुणे सार्वजनिक सभेची त्रैमासिक पत्रिका' चे संपादक

१८९५ – राजीनामा आणि न्या रानडे यांच्या समवेत डेक्कन सभेची स्थापना.

१८९६–१९०१ – मानद कार्यवाह, डेक्कन सभा; या कालावधीत १८९७ मध्ये शासकीय खर्चविषयक वेल्बी कमिशन समोर सभेतर्फे साक्ष.

## भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

१८८९ – मुंबईच्या पाचव्या अधिवेशनात सहभाग

१९०५ – बनारस अधिवेशनाचे अध्यक्ष

१९०५ – लाला लजपत राय यांच्या समवेत काँग्रेस तर्फे देशाच्या समस्या मांडण्यासाठी इंग्लंड दौरा, एकूण ४५ जाहीर भाषणे.

## मुंबई विद्यापीठ

१८९५ ते १९१५ – विद्यापीठ विधिसभा सदस्य

## पुणे नगरपालिका

१८९८ ते १९०६ सदस्य

१९०२ आणि १९०५ अध्यक्ष

## मुंबई विधिमंडळ

१८९९ – मुंबई इलाख्याच्या मध्य विभागातील नगरपालिकांचे प्रतिनिधी म्हणून निवड

## मध्यवर्ती विधिमंडळ, दिल्ली

१९०१ – १९१५ सदस्य

## सर्वण्ट्स ऑफ इंडिया सोसायटी

स्थापना १९०५

## मृत्यू

१९ फेब्रुवारी १९१५

गोखल्यांच्या जीवनाकडे एक दृष्टिक्षेप टाकला तरी हे लगेच लक्षात येते की ४९ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी केवढा मोठा पल्ला गाठला होता. कागल पासून दिल्लीपर्यंत आणि भारतापासून इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेपर्यंत त्यांचा आवाज दुमदुमला होता. आयुष्यातला अर्ध्याहून अधिक काळ हा त्यांनी सार्वजनिक जीवनात देशापुढल्या समस्यांवर काम करण्यात व्यतीत केला होता.

## बालपण व शिक्षण

गोखल्यांचा जन्म एका गरीब घरात झाला. लहान वयात वडिलांचा मृत्यू झाल्यानंतर मोठे बंधू गोविंदराव आणि त्यांच्या पत्नी यांनी गोपाळच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली आणि कागलहून त्याला शिक्षणासाठी प्रथम कोल्हापूर , नंतर पुणे आणि मग मुंबईस पाठविले. आपल्या बंधू आणि वहिनीने केलेल्या त्यागाची जाणीव असल्याने गोपाळराव १८८४ मध्ये वयाच्या १८ व्या वर्षी बी. ए. झाल्यावर पुण्याला आले आणि नोकरी धरून कायद्याच्या अभ्यासाला लागले. वकिली करून कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारावी हा त्यांचा उद्देश होता. ती नोकरी होती चिपळूणकरांनी १८८० मध्ये स्थापन केलेल्या न्यू इंग्लिश स्कूल मध्ये शिक्षकाची. विष्णुशास्त्री चिपळूणकर दोन वर्षातच निवर्तल्यावर त्यांचे सहकारी आपटे, टिळक आणि आगरकर यांच्या प्रयत्नाने ही शाळा अल्पावधीत नावारूपाला आली होती. शिक्षणाद्वारे देशाची उन्नती घडवावी या ध्येयाने ते प्रेरित झाले होते. या मंडळींनी ऑक्टोबर १८८४ मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन करून जानेवारी १८८५ ला फर्ग्युसन कॉलेज सुरु केले. गोखल्यांची बौद्धिक तयारी, शिक्षणावरील निष्ठा आणि कष्टाळू वृत्ती यांमुळे प्रभावित होऊन त्यांना जून ८५ पासून फर्ग्युसन कॉलेज मध्ये शिकविण्यास पाचारण करण्यात आले.

## शिक्षकी पेशा

डे.ए.सोसायटीला तत्कालीन भारतीय आणि युरोपियन धुरीणांचे पाठबळ लाभले

होते. त्यामध्ये न्या. रानडे, डॉ. रा.गो. भांडारकर तसेच सर वेडरबर्न आणि डॉ सेल्बी यांचा समावेश होता. प्रत्यक्ष कामकाज हे आजीव सदस्यांनी चालवायचे अशी योजना होती. वीस वर्षे सोसायटीची सेवा करण्याचे वचन हे आजीव सदस्य देत असत आणि आजही हा नियम पाळला जातो. विद्यमान आजीव सदस्यांनी नवीन सदस्यांची शिक्षक आणि प्राध्यापकांमधून निवड करायची. अशी त्यावेळेपासून चालत आलेली पद्धत आहे.

शिक्षक म्हणून रुजू झाल्यानंतर सहा महिन्यांनी कॉलेजमध्ये व्याख्याता म्हणून नेमणूक आणि वर्षभरात आजीव सदस्य म्हणून निवड, या गोष्टी हे दर्शवतात की गोखल्यांच्या व्यासंग आणि विद्वत्ता या गुणांबरोबरच त्यांची ध्येयनिष्ठा आणि कष्ट उपसण्याची तयारी या वृत्तीची ओळख अल्पावधीत टिळक-आगरकर प्रभृतींना झालेली होती. या सर्व आजीव सदस्यांनी तळमळीने केलेल्या कामामुळे फर्ग्युसन कॉलेजचा नावलौकिक वाढू लागला. मुंबई इलाख्याचे राज्यपाल लॉर्ड सॅण्डहर्स्ट यांनी असे गौरवोद्गार काढले की या आजीव सदस्यांसारखे स्वार्थत्याग करून न डगमगता निरपेक्ष बुद्धीने काम करणारे तरुण इतरत्र असतील, ही कल्पना करणे देखील अवघड आहे.

## सार्वजनिक सभा

याच सुमारास आगरकरांच्या सांगण्यावरून न्या.रानडे यांनी गोपाळरावांना सार्वजनिक सभेच्या कामात मदत करण्यास बोलावले. येथून गोखल्यांच्या सार्वजनिक जीवनाला सुरुवात झाली असे म्हणता येईल. जनमानसाचे प्रबोधन, शासनकर्त्यांचे मत परिवर्तन आणि उदारमतवादी विचार आणि वैधानिक साधनांनी भारताची प्रगती साधणे यावर रानड्यांचा मुख्य भर असे. त्यासाठी समस्यांचा अभ्यास करायचा, माहिती आणि ज्ञान संकलित करायचे आणि हे करताना बौद्धिक सचोटी जपायची, तसेच सहिष्णुता आणि सौजन्य सोडायचे नाही, हा रानड्यांचा शिरस्ता होता. १८८८ मध्ये सार्वजनिक सभेच्या कार्यवाहपदाची जबाबदारी गोखल्यांकडे आली. त्याचबरोबर सभेच्या त्रैमासिक पत्रिकेचे

संपादकत्व देखील त्यांच्याकडे आले. सरकारी धोरणे आणि त्यांची अंमलबजावणी यासंबंधी सार्वजनिक सभा आपले मत सरकारपुढे सादर करीत असे आणि वेळोवेळी सभा बोलवून लोकशिक्षणाचे कामही पार पाडत असे. या कामात न्या. रानडे यांना साथ करणारे गणेश व्यंकटेश जोशी हे शिक्षण खात्यात नोकरीस होते. एल्फिन्स्टन महाविद्यालयातून बी.ए. पदवी उत्तम गुणांनी मिळवून शिक्षक म्हणून अहमदनगर येथे त्यांनी सुरवात केली होती. प्लेगनिवारणात त्यांनी बजावलेल्या कामगिरीमुळे ब्रिटीश सरकारने त्यांना रावबहादूर ही पदवी दिली होती. त्यांना अर्थशास्त्रात उत्तम गती होती. रानड्यांच्या सांगण्यावरून जोशी यांनी गोखल्यांना आर्थिक विश्लेषण करण्यासंबंधी मार्गदर्शन केले. कायदेमंडळात पुढे सरकारी अंदाजपत्रकाची चिरफाड करताना जोशी यांच्याकडून शिकलेले अर्थशास्त्र त्यांना उपयोगी पडले आणि गोखले हे आपले ऋण कधी विसरले नाहीत. वेल्बी आयोगासमोर त्यांनी दिलेल्या साक्षीची प्रशंसा होऊ लागल्यावर तिचे श्रेय त्यांनी न्या. रानडे आणि रा. ब. जोशी यांच्या मार्गदर्शनाला दिले.

## डेक्कन एज्युकेशन सोसायटी

इकडे वैचारिक आणि वैयक्तिक पातळीवरील मतभेदांमुळे टिळक आणि आगरकर यांच्यातील दरी वाढत चालली होती. त्यात गोखले हे सुरवातीला सोसायटीत आले तेव्हा टिळकांच्या व्यक्तिमत्त्वामुळे प्रभावित झाले होते. पण जसजसा सहवास वाढत गेला, तसे ते विचार आणि वृत्ती यामध्ये साधर्म्य असल्याने आगरकरांकडे झुकले. त्यामुळे ते टिळकांच्या रोषास पात्र झाले आणि त्यांचे हे वैमनस्य गोखल्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे पुढचे पावशतक चालू राहिले. गोखल्यांना मरणोत्तर श्रद्धांजली वाहताना मात्र टिळकांनी मुक्तकंठाने गोखल्यांचे गुणवर्णन केले. १८९० मध्ये डे.ए. सोसायटीचा राजीनामा देऊन टिळक बाहेर पडले. त्यानंतर दोन वर्षांनी प्राचार्य आपटे स्वर्गवासी झाले. आणखी तीन वर्षांनी कॉलेजचे तिसरे संस्थापक गोपाळ गणेश आगरकर हे देखील कालवश झाले. गोखले हे १८९२ पासून डे.ए. सोसायटीच्या कार्यवाह पदाची

धुरा वाहत होते. टिळक बाहेर पडले, आपटे आणि आगरकर निधन पावले आणि शाळा कॉलेजचा व्याप वाढलेला, अशा कठीण परिस्थितीत गोखल्यांना प्राचार्यपद देऊ केले गेले. सोसायटी आणि सार्वजनिक सभा यामधील कामाची व्याप्ती पाहून गोखल्यांनी प्राचार्य होण्यास नम्रपणे नकार दिला आणि कार्यवाहपद सांभाळणे सुरु ठेवले. दानशूर व्यक्तींकडून देणग्या मिळवून कॉलेज साठी वसतिगृह, ग्रंथालय इत्यादी सुविधा निर्माण करण्यात गोखल्यांचा मोठा वाटा होता. फर्ग्युसन मधील इमारती आजही त्या कामाची साक्ष देतात. शुल्क मर्यादित ठेवून शिक्षण हे समाजातल्या सर्व थरांना उपलब्ध करून देणे असे डे.ए.सोसायटीचे उद्दिष्ट होते. पण म्हणून विद्यार्थ्यांना जुजबी सुविधा द्यायच्या असा सोसायटीचा कधी दृष्टिकोन नव्हता. उत्तम सुविधा पुरविण्याकडेच कल असल्याने त्यासाठी लागेल तो निधी देणग्यांद्वारे उभा करण्यासाठी गोखले झटत राहिले. त्यासाठी ठिकठिकाणी हिंडून दानशूर व्यक्तींकडे जाण्यास त्यांनी कंटाळा केला नाही.

या काळातल्या त्यांच्या वैयक्तिक जीवनातील महत्त्वाची घटना म्हणजे त्यांचे दुसरे लग्न! पहिला विवाह वयाच्या १४ व्या वर्षी सावित्रीबाईशी झाला. त्यांना दुर्धर व्याधी असल्याचे निष्पन्न झाल्याने संसार करणे अशक्य झाले. त्याकाळच्या प्रथेनुसार दुसऱ्या लग्नाचा आग्रह होऊ लागला. नातेवाईकांच्या आग्रहाला नकार देत गोपाळरावांनी ५-६ वर्षे तशीच काढली. अखेर सावित्रीबाईच्या संमतीने १८८७ मध्ये राधाबाई यांच्याशी दुसरा विवाह लागला. एक मुलगा आणि दोन मुलींना जन्म देऊन राधाबाई अल्पवयात निवर्तल्या. मुलगा बालपणातच गेला आणि राधाबाईच्या निधनानंतर जवळच्या नातेवाईकांनी मुलींकडे लक्ष दिले. दोन्ही मुलींना गोखल्यांनी कटाक्षाने शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले.

## सार्वजनिक जीवन

सार्वजनिक सभेचे काम करायला लागल्यानंतर गोखल्यांचा सामाजिक, राजकीय वर्तुळात वावर वाढू लागला. कॉंग्रेस, मुंबई विद्यापीठ आणि पुणे नगरपालिका या सारख्या संस्थांमध्ये काम करण्याची संधी गोखल्यांना मिळाली आणि त्यांच्यातल्या

सामाजिक कार्यकर्त्याचे राजकीय नेतृत्वात रुपांतर होण्यास येथे सुरवात झाली, असे म्हणता येईल.

सार्वजनिक जीवनाची प्रेरणा गोखल्यांना कशामुळे झाली हे सांगणे अवघड आहे. न्या रानडे यांचा संपर्क लाभण्याआधी त्यांनी कोल्हापुरात १८८६ मध्ये 'ब्रिटीश अमदानीतील भारत' या विषयावर एक जाहीर व्याख्यान दिल्याची नोंद आहे. त्या व्याख्यानास अध्यक्ष म्हणून कोल्हापूर संस्थानातील ब्रिटीश निवासी अधिकारी विल्यम लीवॉर्नर हे होते आणि त्यांनी गोखल्यांच्या चित्तवेधक वक्तृत्वाची आणि इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. आधी टिळक-आगरकर आणि नंतर न्या रानडे यांच्या वैचारिक बैठकीचा प्रभाव हा गोखल्यांवर पडला असावा. अर्थात देशप्रेमाच्या अंतःस्फूर्तीला आकार देण्याचे महत्त्वाचे काम या वैचारिक प्रभावामुळे झाले असे म्हणता येईल. सार्वजनिक जीवनामध्ये गोखले भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आणि दिल्लीचे शाही कायदेमंडळ यामध्ये प्रामुख्याने कार्यरत झाले, तरी त्याखेरीज त्यांनी प्रांतिक कायदेमंडळ, पुणे नगरपालिका आणि मुंबई विद्यापीठ विद्वत्सभा यामध्ये देखील काम केले. एका बाजूला फर्ग्युसन कॉलेज आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे काम आणि दुसरीकडे सार्वजनिक सभेमधली न्या.रानडे यांच्या हाताखालची उमेदवारी, असा समांतर प्रवास सुरु असताना १८८९ मध्ये गोखल्यांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस मध्ये प्रवेश केला आणि त्यानंतर त्यांच्या कर्तृत्वाला झळाळी मिळत गेली. सोसायटी मधला लोकशाही कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव, सार्वजनिक सभेमधला लोकांच्या समस्यांवरचा अभ्यास आणि वैचारिक तयारी या गोष्टींचा कॉंग्रेसमधल्या कामात त्यांना उपयोग झाला. आपल्या कारकीर्दीत गोखल्यांना अनेक कसोट्या द्याव्या लागल्या. त्यातली पहिली होती वेल्बी कमिशन समोरील साक्षीची.

## पहिला इंग्लंड दौरा

वेल्बी कमिशनची पार्श्वभूमी अशी होती की कॉंग्रेसने आपल्या १८८५च्या पहिल्या वहिल्या अधिवेशनात दादाभाई नवरोजी यांच्या पुढाकाराने अशी मागणी केली होती

की हिंदुस्तानच्या आर्थिक व्यवस्थापनाची आयोग नेमून चौकशी करण्यात यावी. याचे कारण असे होते की कर रूपाने महसूल गोळा होणार भारतात आणि त्याच्या खर्चाचे निर्णय घेणार भारत सचिव हे लंडन मध्ये बसून. काँग्रेस पुढाऱ्यांना अशी दाट शंका होती की भारताचा पैसा मोठ्या प्रमाणात अन्यत्र वळवून आणि वाढत्या खर्चाची हाकाटी करून करांचे प्रमाण वाढते ठेवले जात आहे. परिणामी हिंदुस्तानची अर्थव्यवस्था खिळखिळी होत आहे. त्यामुळे हे वेल्बी कमिशन १८९५ ला नेमण्यात आले. लॉर्ड रेजिनल्ड वेल्बी हे अध्यक्ष, सर विल्यम वेडरबर्न, विल्यम केन आणि दादाभाई नवरोजी हे सदस्य होते. दादाभाईनी अशी इच्छा प्रदर्शित केली होती की रानडे किंवा रावबहादूर ग. व्यं.जोशी यांच्यापैकी एकाने कमिशनपुढे साक्ष द्यावी. पण दोघेही सरकारी नोकरीत असल्याने त्यांना साक्ष देणे शक्य नव्हते. म्हणून १८९७ मध्ये तरुण आणि नवख्या गोपाळरावांकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली.

कमिशनसमोर साक्ष दिल्यानंतर उलट तपासणी होणार असल्याने गोपाळरावांनी आपल्या रानडे-जोशी गुरुद्वयाच्या मार्गदर्शनाखाली कसून तयारी केली. त्यांनी १८६ पानांचा लेखी पुरावा सादर केल्यावर लंडन येथे एप्रिल १८९७ मध्ये दोन दिवस त्यांची उलट तपासणी घेण्यात आली. साक्ष देण्यास आलेले इतर प्रतिनिधी मद्रासचे सुब्रमण्य अय्यर, बंगालचे सुरेंद्रनाथ बॅनर्जी आणि मुंबईचे सर दिनशा वाच्छा हे होते. आकडेवारी आणि माहितीवरील हुकमत, तर्कशुद्ध युक्तिवाद आणि इंग्रजीतील ओघवते वक्तृत्व यामुळे गोखल्यांनी भारताच्या अर्थकारणाची विदारक स्थिती कमिशन समोर प्रभावीपणे मांडली. रावबहादूर जोश्यांना लिहिलेल्या पत्रात सर वाच्छा यांनी खुल्या दिलाने गोखल्यांची प्रशंसा केली.

काँग्रेस मधील उदारमतवादी आणि नेमस्त नेतृत्वाला गोखले आपलेसे वाटू लागले आणि भावी नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाऊ लागले. याच सुमारास एक घटना घडली, ज्यामुळे गोखल्यांना आणखी एका कसोटीस सामोरे जावे लागले.

## प्लेग प्रकरण

गोखले इंग्लंडात असताना मुंबई पुण्याकडे प्लेगची साथ उसळली आणि तिला काबूत आणण्यासाठी प्लेग निवारण समितीची सरकारने स्थापना केली. हे काम सैन्याकडे देण्यात आले. त्या समितीवर फक्त गोऱ्या लष्करी आणि नागरी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. या समितीने घरांची झडती घेणे, रोग्यांना वेगळ्या छावण्यात हलवणे, उंदरांचा नायनाट करणे इ. कामे आरंभली. हे सर्व करताना ते कुणालाही आणि कशालाही जुमानत नसत. त्यामुळे घरातील भांडीकुंडी, देवदेव्हारे रस्त्यावर फेकण्यास, पोराबाळांना व म्हाताऱ्या माणसांना फरफटत नेण्यास ते मागे पुढे पाहत नसत. प्लेग आटोक्यात आणण्यासाठी दंडुकेशाहीला पर्याय नाही, असे त्यांना वाटत असे. सोजीरांविषयी असंतोषाचे रुपांतर संतापात होऊ लागले. लोक सहकार्य करत नाहीत म्हटल्यावर सोजिरांची दंडुकेशाही तापू लागली. १८९७ च्या मे महिन्यात पुण्यातील डेक्कन सभेने २००० नागरिकांच्या सह्या असलेले निवेदन देऊन नऊ तक्रारी मांडल्या. पुण्यातील स्थानिक मुसलमानांची संघटना असलेल्या अंजुमन असोसिएशनच्या प्रमुख सभासदांच्या या निवेदनावर सह्या होत्या. सभेचे म्हणणे असे होते की लोकांना विश्वासात न घेता आणि स्थानिक कार्यकर्त्यांचे सहकार्य न घेता दडपशाहीने गोरे सोजिर काम करीत आहेत, त्यामुळे असंतोष वाढत आहे.

या घडामोडींची बातमी गोखल्यांना त्यांचे पुण्यातील मित्र पुरवू लागले. त्यातच जून १८९७ मध्ये चाफेकर बंधूंनी रँड आणि आयर्स्ट या इंग्रज अधिकाऱ्यांवर गोळ्या झाडून त्यांचा खून केला. त्यामुळे सरकारने खवळून अधिक दडपशाही सुरु केली. या दरम्यान गोखल्यांच्या मित्रांनी त्यांना कळविले की गोऱ्या सोजिरांनी प्लेगच्या कामात दोघा स्त्रियांशी अतिप्रसंग केला, ज्यामुळे त्यापैकी एकीने जीव दिला. गोखल्यांना हे अतिशय धक्कादायक आणि संतापजनक होते. त्यांनी तत्काळ हे वृत्त सर वेडरबर्न यांच्या मार्फत ब्रिटीश संसद सदस्यांच्या कानावर घातले आणि २ जुलै १८९७ ला मँचेस्टर गार्डियन या वृत्तपत्राला मुलाखत देऊन प्लेग निवारणाच्या कामातील

अत्याचारासंबंधी चौकशी करण्याची मागणी केली.

मुंबई इलाख्याचे तत्कालीन राज्यपाल लॉर्ड सँडहर्स्ट यांनी मात्र गोखल्यांचे वक्तव्य म्हणजे विखारी कवित्व असल्याचे जाहीर करून टाकले. यावेळेस सँडहर्स्ट यांनी एक चाल खेळली. प्लेग निवारणासंबंधी पाच प्रश्न त्यांनी तारेने पुण्यातील निवडक ५०० लोकांकडे पाठविले आणि त्यांना २४ तासात उत्तरे देण्याची सक्ती केली. ज्यांना व्यक्तिगत त्रास सहन करावा लागला नाही, अशीच मंडळी निवडली असल्याने त्यांची उत्तरे सोजीरांना सोयीची होती. त्या आधारावर सँडहर्स्ट यांनी त्यांचे वरिष्ठ लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांना गोखल्यांचे आरोप निराधार आणि दुष्ट हेतूने प्रेरित असल्याचे कळविले. हॅमिल्टन यांनी हाउस ऑफ कॉमन्स मध्ये निवेदन करून गोखल्यांच्या मुलाखतीमुळे ब्रिटीश जनतेत भारतातील अत्याचाराबद्दल निर्माण झालेला संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न केला. कॉमन्स मधील पारशी सदस्य मंचेरजी भावनगरी यांनी गोखल्यांवर टीकेची झोड उठविली आणि त्यांनी माफी मागावी अशी मागणी केली.

१८ जुलै १८९७ ला गोखले समुद्रमार्गे परतीच्या सफरीला निघाले. एडन बंदरात त्यांना पुण्याच्या मित्रांची पत्रे मिळाली. आपली नावे जाहीर करू नयेत असे त्यांनी कळवळून विनविले होते. बोट मुंबईस पोचताच मुंबईचे पोलीस आयुक्त मि विन्सेंट यांनी गोखल्यांची भेट मागितली आणि तक्रारदारांची पत्रे पाहण्याची मागणी केली. गोखल्यांनी त्यास नकार दिला आणि आपण या प्रकरणास प्रांजळपणे सामोरे जाणार असल्याचे सांगितले. मित्रांनी आपल्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा जाऊ न देण्यामुळे आपण सार्वजनिक रोषाला पात्र ठरणार आहोत, हे त्यांना उमजले होते. एकीकडे वेल्बी कमिशन समोरील कामगिरीचे समाधान आणि दुसरीकडे प्लेग संबंधातील फसगत अशा विचित्र अवस्थेमध्ये तरुण गोपाळराव सापडले होते.

मुंबईत न्या.रानडे यांची भेट त्यांनी घेतली. पुण्यास जाऊन पुन्हा एकदा आपले मित्र जाहीर तक्रार करण्यास तयार आहेत काय हे पाहावे असा रानड्यांनी सल्ला दिला. पण कोणीच पुढे येण्यास तयार झाले नाहीत, सरकारने चौकशी आयोग नेमण्यास नकार

दिला आणि कोणताही पुरावा मिळेनासा झाला. ज्यांनी इंग्लंडमध्ये आपल्यावरील दडपशाहीच्या विरोधात आवाज उठविला आणि कॉमन्स सभागृहाला दखल घेण्यास भाग पाडले, ते आपले पुढारी तोंडघशी पडणार असे दिसत असून पुण्यातील लोक डोळ्यावर कातडी ओढून गप्प बसले. गोखल्यांनी मात्र दोष लोकांना न देता सँडहर्स्ट यांच्या जुलमी कारभाराला दिला.

जानेवारी १८९८ मध्ये वृत्तपत्रांना दिलेल्या निवेदनात गोखले म्हणतात :

''सबळ पुरावा मिळण्याचा प्रश्नच नाही, हे लक्षात यायला मला फार वेळ लागला नाही आणि त्यामुळे सपशेल माफी मागणे हाच एकमेव पर्याय आहे हे मला कळून चुकले. माझ्यासाठी हे अग्निदिव्यच होते. दूर परदेशी चार महिने झटून देशबांधवांसाठी, सगळ्यांच्या म्हणण्यानुसार, उपयुक्त असे काम करून मायदेशी परतावे, तेव्हा पुढे काय वाढून ठेवलेले? तर मानहानीचे ताट, विरोधकांना विजयाचा उन्माद आणि हताश देशबांधवांकडून होणारी संतप्त कानउघाडणी''

न्या.रानडे, फेरोजशाह मेथा, सर विल्यम वेडरबर्न आणि दादाभाई नवरोजी यांना विश्वासात घेऊन गोखल्यांनी संपूर्ण बिनशर्त माफीचे पत्र टाइम्स ऑफ इंडिया आणि मँचेस्टर गार्डियन या वृत्तपत्रांना पाठविले. ते एकाच दिवशी ४ ऑगस्ट १८९७ ला प्रसिद्ध झाले. त्यामध्ये त्यांनी राज्यपाल, प्लेग निवारण समितीचे सदस्य आणि गोरे सोजीर यांची बिनशर्त माफी मागितली.

हा निर्णय घेताना गोखल्यांना किती यातना झाल्या असतील, याची कल्पनाही करणे क्लेशदायक आहे. आपण सरकार आणि सरकारी यंत्रणा यांच्यावर गंभीर आरोप केले आणि त्या आरोपांचा तसूभरही आधार आपण देऊ शकत नाही, ही गोष्ट नैतिकतेला धरून होत नाही, इतकेच नव्हे तर इंग्लंड मधील भारतीय वंशाचा एक संसद सदस्य त्यासाठी आपल्याला धारेवर धरतो, हेही गोखल्यांच्या मनाला लागून राहिले. इतर प्रांतांतल्या आपल्या चाहत्यांना त्यांना याचे स्पष्टीकरण द्यावे लागले. त्यातल्या एका पत्रात ते म्हणतात:

'' मी जो मार्ग अवलंबला तो कितीही क्लेशकारक असला तरी कर्तव्य आणि सन्मान यांना साधणारा तोच एकमेव पर्याय होता, हे तुम्हाला पटले आणि तुमच्या साऱ्या शंका दूर झाल्या, याचे मला समाधान आहे. जी मानहानी मी सोसत आहे ती संवेदनशील मनाला छळणारी सर्वात कठीण गोष्ट आहे आणि त्यात भर पडते, जेव्हा तुम्हाला हे ठाऊक असते की तुमचे मित्र आणि नातेवाईक हेदेखील मनस्ताप भोगत आहेत. मी संयम ठेवून आहे, कारण मला ही जाणीव आहे की मी जे केले ते कर्तव्यबुद्धीने आणि एक न एक दिवस मला न्याय मिळेल. न्यायमूर्ती रानडे यांच्या शिकवणुकीमुळे आणि त्यांच्या उदाहरणामुळे मी हे पूर्वीच उमगलो आहे की लोकांची वाहवा नव्हे तर आपला विवेक हाच आपल्या कृतीचा पाया असला पाहिजे.''

(श्री ए के घोष यांना १५ जाने १८९८ला लिहिलेल्या पत्रातून...)

या ठिकाणी थोडे विषयांतर करून हे लक्षात घेतले पाहिजे की नगरपालिकांच्या स्थापनेबरोबर नागरिकांच्या आरोग्य तपासणीचे धोरण ब्रिटीशांनी अवलंबिले होते. त्यांच्या दृष्टीने बहुसंख्य नागरी वस्त्या या घाण, अस्वच्छता आणि अनारोग्य यांनी माखलेल्या होत्या. कारण हिंदुस्तानी लोकांना स्वच्छता आणि आरोग्य यांचे वावडे होते. त्याकाळी असा देखील समज सामान्य जनतेत पसरला होता की इस्पितळात टाकल्याने माणसे दगावतात. प्लेगच्या रोग्याला त्याचे नातेवाईक बऱ्याबोलाने इस्पितळात दाखल करणार नाहीत, अशी ब्रिटीशांची अटकळ होती. म्हणून प्लेगचा सामना करण्यासाठी त्यांनी लष्कराला पाचारण केले होते. वेळ पडली तर बळाचा वापर करून लोकांना बाहेर काढा आणि रोग्यांना इस्पितळात डांबून टाका, असे सोजीरांना सांगण्यात आले होते. स्थानिक संस्था आरोग्यविषयक 'स्वराज्य' करण्यास सक्षम नाहीत आणि म्हणून ब्रिटीश सरकारनेच सर्व काही केले पाहिजे, असे त्यामागचे गृहीत होते. डेक्कन सभा आणि अंजुमन असोसिएशनच्या निवेदनांकडे त्यामुळेच दुर्लक्ष करण्यात आले.

या माफी प्रकरणाचा परिणाम असा झाला की जनमत काय आहे, यापेक्षा समस्येचा सारासार विचार करणे अधिक महत्त्वाचे आहे आणि रेट्याबरोबर वाहत

जाण्यापेक्षा थोडे अलिप्त राहून सावधपणे, सुज्ञपणे विचार करून मत बनवावे अशी गोपाळरावांची प्रवृत्ती बनली.

वेल्बी कमिशन समोरील साक्ष यामुळे गोखल्यांचे राजनैतिक नैपुण्य भारतीयांसमोर आले, तर माफी प्रकरणामुळे त्यांचे नैतिक मनोधैर्य हे सुजाण नागरिकांना अचंबित करून टाकणारे ठरले. नुकती सुरु होत असलेली राजकीय कारकीर्द इथे एक व्यक्ती स्वतःहून माफी मागून धोक्यात घालते, असे दुसरे उदाहरण सापडेल का?

## प्लेग निवारण आणि आधुनिकता

प्लेगचा धुमाकूळ १८९९ मधेही चालूच राहिला आणि गोखल्यांनी काही सहकाऱ्यांच्या मदतीने प्लेग निवारणाच्या कामात प्रवेश केला. त्यामुळे सरकारला उशिरा का होईना जाग आली आणि स्थानिक कार्यकर्त्यांचा सहभाग घ्यावा असे वाटून प्लेग निवारण आयोगाची नेमणूक करण्यात आली. गोखल्यांना सदस्य म्हणून निमंत्रित करण्यात आले. या सुमारास डॉ.हाफकिन यांच्या लशीवरील संशोधनाने जगभर वादळ उठले. सूक्ष्म जंतूंमुळे साथीचे रोग उद्भवतात आणि लस टोचून या रोगाला प्रतिबंध करता येतो, या गोष्टीवर पुराणमतवादी मंडळींचा विश्वास बसत नव्हता. डॉ भाटवडेकर यांच्यासारखी काही डॉक्टर मंडळी सक्तीच्या लस टोचण्याच्या बाजूने होती, तर काही वैद्य त्याला विरोध करत होते.

प्लेग निवारण आयोगाने ठिकठिकाणी भेटी देऊन माहिती गोळा केली. गोखल्यांनी कसोशीने अभ्यास करून असे निष्कर्ष मांडले की सार्वत्रिक लशीचा कार्यक्रम यशस्वी करायचा असेल तर प्रशिक्षित तज्ज्ञ यांच्याकडून लस दिली गेली पाहिजे आणि डोस किती द्यायचा हे त्यांनी काळजीपूर्वक ठरविले पाहिजे. तसेच लशीची सक्ती न करता तो निर्णय लोकांवर सोडला पाहिजे. फेब्रु १९०० मध्ये सरकारने हे निष्कर्ष जसेच्या तसे स्वीकारले.

डॉ.हाफकिन १९०१ मध्ये भारतात आले, तेव्हा पुण्यात त्यांचे स्वागत करण्यात

आले. पुन्हा एकदा पुराणमतवादी आणि प्रागतिक विचारसरणीमधला फरक पुढे आला. जुन्या मंडळींनी डॉ हाफकिन ची हुर्यो उडविण्याचा प्रयत्न केला, तर गोखल्यांनी त्यांचा सत्कार आयोजित केला.

परंपरा आणि नवता यांच्यातल्या रस्सीखेचीबद्दल कविकुलगुरू कालिदास यांचा एक श्लोक प्रसिद्ध आहे :-

**पुराणमित्येव न साधु सर्वं । न चापि काव्यं नवमित्यवद्यं ।।**
**संतः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते । मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ।।**

(मालविकाग्निमित्र १.२)

याचा अर्थ असा की जुने सगळेच चांगले असते असे नाही आणि नवे सारे टाकाऊ असते, असेही नाही. चांगले लोक पारख करून तुलनेने जे इष्ट ते अंगिकारतात आणि दुसऱ्यांच्या सांगण्यावर जातात, ते सदैव संभ्रमात राहतात. गोखल्यांनी या कामातून परंपरे मध्ये नवता कशी साधायची हेच प्रभावीपणे दाखवून दिले. वैद्यकीय क्षेत्रातले आपण तज्ञ नाही, पण लस वापरण्याचे आणि न वापरण्याचे काय परिणाम होतात, तसेच लस वापरून सर्वत्र सारखा अनुभव येत नाही, मग त्याची कारणे कोणती या गोष्टींचा बारकाईने अभ्यास त्यांनी केला. अनुभव देखील पारखता आला पाहिजे, हेच त्यांनी उदाहरणाने स्पष्ट केले. त्याचा परिणाम असा झाला की ९७ साली गोखल्यांवर टीका करणारे मुंबई इलाख्याचे राज्यपाल लॉर्ड सँडहर्स्ट यांनी मुंबई कायदेमंडळात असे उद्गार काढले:

''दोन वर्षापूर्वी प्रो गोखले यांनी जे वृत्त पसरविले होते, त्याचा तीव्र शब्दात निषेध करण्याचे कर्तव्य मला बजावावे लागले. अर्थात त्यांना चुकीची माहिती पुरविण्यात आली होती हे निश्चित. त्यामुळे त्या वृत्तान्तामुळे अस्वस्थ होऊन त्याचे खंडन करण्याची मला चिंता लागून राहिली होती. पण तितक्याच उत्कटतेने मी आज हे सांगू इच्छितो

की प्रो गोखल्यांसारखा कष्टाळू, मोठ्या मनाचा आणि कनवाळू कार्यकर्ता प्लेग निवारणामध्ये मला दुसरा दिसलेला नाही.''

## मुंबई कायदेमंडळात प्रवेश

याच सुमारास १८९९ मध्ये मुंबई इलाख्याच्या प्रांतिक कायदेमंडळात नगरपालिकांचे प्रतिनिधी म्हणून गोखल्यांची निवड झाली आणि येथून त्यांच्या संसदीय कारकीर्दीला सुरुवात झाली असे म्हणता येईल. अर्थात येथे ते केवळ दोन वर्षे सदस्य राहिले. कारण नंतर ते दिल्लीच्या मध्यवर्ती कायदेमंडळात निवडून गेले. या अवधीत दोन उल्लेखनीय घटना घडल्या. पहिली म्हणजे १८७९ च्या जमीन महसूल संहितेत दुरुस्ती सरकारतर्फे मांडण्यात आली. दुष्काळ, प्लेग आणि मंदी यामुळे गांजलेल्या शेतकऱ्यांच्या हितासाठी गोखल्यांनी बऱ्याच सूचना केल्या. कायदेमंडळातील निर्वाचित सदस्य हे आपल्या निष्ठांशी ठाम असत. सरकारी दुरुस्ती विधेयकात बऱ्याच त्रुटी असल्याने सर फेरोजशा मेथा यांनी अशी दुरुस्ती मांडली की हे विधेयक अधिक चर्चेसाठी आणि पुनर्विचारार्थ सभागृहाच्या विशेष समितीकडे परत पाठविण्यात यावे. ही दुरुस्ती फेटाळण्यात आल्यावर फेरोजशा आणि इतर सदस्यांनी सभात्याग केला. अर्थातच गोखले हेही त्यात सहभागी होते. सरकारी गोटात खळबळ उडवून देणारी ही गोष्ट होती. गोखल्यांना सभेतून बाहेर पडणे हे क्लेशकारक होते. पण त्यांनी सर मेथांना सांगितले की मी आपल्यामागे येतो, कारण एकट्याने रास्त राहण्यापेक्षा सगळ्यांबरोबर राहून चूक झाली तरी चालेल.

## मध्यवर्ती कायदेमंडळ

सर मेथांनी प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणाने राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या जागी मध्यवर्ती कायदेमंडळात गोखल्यांची निवड झाली. बोमनजी पेटीट आणि इब्राहीम रहिमतुल्ला या इच्छुकांनी गोखल्यांचा मनोदय ऐकल्यावर त्यांच्यासाठी माघार घेतल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. १९०१ ते १९१५ अशी १४ वर्षे त्यांनी त्या काळच्या

या संसदेमध्ये विधायक विरोधक या भूमिकेतून गाजविली. नुसती टीका करायची नाही तर इष्टानिष्ट उपायांची चर्चा करून धोरणविषयक निश्चित प्रस्ताव सादर करण्याचा गोखल्यांचा परिपाठ होता. लोकहिताच्या प्रत्येक विषयावर बारकाईने अभ्यास करून माहितीच्या आधारावर मांडणी करण्याची त्यांची तयारी न्या. रानडे यांच्याकडे त्यांनी केलेल्या उमेदवारीच्या काळात झाली होती. न्या. रानडे १९०१ मध्ये निवर्तले आणि रावबहादूर जोशी हे सरकारी नोकरीतून १९०७ मध्ये निवृत्त झाले, आणि नेमस्त उपायांचा उपयोग होत नाही, म्हणून जहाल गटाकडे त्यांचा कल झाला. त्यामुळे गोखले पुढच्या वाटचालीसाठी स्वतःच्या प्रयत्नांवर पूर्णपणे विसंबून राहिले.

मध्यवर्ती कायदेमंडळात आलेल्या विविध विषयांची व्याप्ती फार मोठी होती. शासकीय महसूल आणि खर्च हा गोखल्यांच्या अभ्यासाचा विषय तर प्राथमिक ते तांत्रिक शिक्षण हा त्यांच्या अनुभवाचा भाग होता. व्यापारावरील निर्बंध, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, सहकारी पतसंस्था याचबरोबर शासकीय सेवांचे भारतीयीकरण अर्थात भारतीयांची भरती हेही विषय गोखल्यांनी गांभीर्याने हाताळलेले दिसतात. गोखल्यांचे कायदेमंडळातील अस्तित्व म्हणजे त्यांचा ध्येयवाद, कर्तृत्व आणि व्यक्तित्व यांचा त्रिवेणी संगम म्हटला पाहिजे. व्हाईसरॉय यांच्या कार्यकारी मंडळातील वित्तविषयक सदस्य सर गाय फ्लीटवूड विल्सन यांनी गोखल्यांच्या कायदेमंडळ कामगिरीचे अतिशय समर्पक वर्णन केले होते. १९१३ मध्ये एका भाषणात ते म्हणाले की गोखल्यांशिवाय कायदेमंडळ कामकाज म्हणजे ''हॅम्लेटशिवाय हॅम्लेट हे नाटक करण्यासारखे आहे.''

## सर्व्हन्टस ऑफ इंडिया सोसायटी

फर्ग्युसन कॉलेज व डे. ए. सोसायटी एकीकडे आणि दुसरीकडे काँग्रेस आणि कायदेमंडळ यांच्यातील काम याचा ताण पडून गोखल्यांच्या तब्येतीवर त्याचा परिणाम जाणवू लागला. पहिले तीन आजीव सदस्य – टिळक, आगरकर आणि आपटे हे आपली वीस वर्षांची शपथ पूर्ण करू शकले नसल्याची खंत असल्याने गोखल्यांना वीस

वर्षे पूर्ण करून बाहेर पडावे असे वाटत होते. न्यू इंग्लिश स्कूल मधील एक वर्ष आणि फर्लो रजेची दोन वर्षे धरून आजीव सदस्य मंडळाने त्यांना १९०२ साली निवृत्त होण्याची परवानगी दिली. फर्ग्युसन च्या विद्यार्थ्यांनी त्यांच्यासाठी निरोप समारंभ आयोजित केला त्यावेळेस उत्तरादाखल गोखल्यांनी केलेले भाषण आजही प्रसिद्ध आहे. शिक्षणक्षेत्रातील सुनिश्चितता सोडून सार्वजनिक जीवनातील अनिश्चिततेला आपण सामोरे जात आहोत. कारण आपल्याला एक अनावर ऊर्मी सार्वजनिक कामाकडे ओढून नेत आहे असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर डे.ए. सोसायटीचे वैशिष्ट्य विशद करताना त्यांनी हे सांगितले की डे.ए.सोसायटी हे भारतीयांनी एकत्र येऊन व्रतस्थ वृत्तीने आणि उत्साहाने एका ध्येयासाठी काम करण्याचे एकमेवाद्वितीय असे उदाहरण आहे. हे ध्येय कोणते तर धिमेपणाने पण निश्चितपणे स्वावलंबनाकडे वाटचाल करणे, ज्यायोगे आपण अधिकाधिक प्रमाणात स्वतःच्या प्रयत्नांवर भिस्त ठेवतो. सोसायटीच्या शैक्षणिक कामामागचे मुख्य नैतिक अधिष्ठान या ध्येयासाठी एकत्र येऊन काम करणे हे आहे, हा गोखल्यांच्या भाषणातला महत्त्वाचा संदेश होता. गोखल्यांचा हा संदेश देशभर नंतर निनादत राहिला आणि आजही तो उद्धृत केला जातो.

यानंतर राष्ट्रीय काँग्रेस आणि कायदेमंडळातील कामकाज यात गुंतले असताना गोखल्यांना ध्यास होता, तो सार्वजनिक जीवन हे आध्यात्मिक मूल्यांनी प्रेरित कसे होईल याचा. त्यांच्या लेखी आध्यात्मिक मूल्यांचा अर्थ केवळ नैतिकता असा नसून तिच्या जोडीला देशसेवा-जनसेवा हेच जीवनाचे सर्वस्व मानून त्यासाठी तन-मन-धन समर्पित करणे असा होता. डे.ए.सोसायटीतील अनुभवाने त्यांना शिस्तबद्ध कार्यपद्धतीमधून येणारी कार्यक्षमता आणि प्रशिक्षित सदस्यांचा संच या गोष्टींची आवश्यकता पटली होती. त्याचबरोबर डे.ए.सोसायटीला सुरवातीच्या काळात ज्या मतभेदांनी ग्रासले होते ते टाळण्याचे त्यांचे प्रयत्न होते. यातून त्यांनी जून १९०५ मध्ये सर्वण्ट्स ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना केली. त्यावेळेस त्यांच्याबरोबर शपथ घेणाऱ्यांत नटेश अप्पाजी द्रविड, अनंत पटवर्धन आणि गोपाळ कृष्ण देवधर हे तीन सदस्य होते आणि सूर्योदयाच्या

वेळेस पायाभरणी श्री आबासाहेब साठे यांच्या हस्ते झाली. संस्थेसाठी फर्ग्युसन टेकडीच्या दक्षिणेकडील जमीन निवडण्यात आली होती. या घटनेचे स्मारक असलेला स्तंभ आजही पुण्यातील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था व फर्ग्युसन यांच्या मधल्या टेकडीवर उभा आहे. देशसेवेसाठी मिशनरी वृत्ती, उत्साह आणि कष्टाच्या तयारीसोबत वैचारिक बैठक आवश्यक असल्याने या सर्व बाबतीत उमेदवारी पूर्ण केलेले तरुण उपयोगी पडतील अशी गोखल्यांची धारणा होती. त्यांनी स्वतः न्या. रानडे यांच्या हाताखाली हे धडे घेतले होते आणि तो अनुभव संस्थात्मक पातळीवर देता यावा अशी त्यांची योजना होती.

## भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

दीड दशक काँग्रेस च्या कामात सक्रिय भाग घेऊन दादाभाई नवरोजी आणि सर फेरोजशा मेथा यांच्या बरोबर काम केल्याने सरकारसमोर काँग्रेसचे म्हणणे प्रभावीपणे मांडण्यासाठी गोखल्यांना पाचारण केले जाई. १९०५ च्या बनारस अधिवेशनासाठी त्यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. पण हा काळही त्यांच्या कसोटीचा होता.

लॉर्ड कर्झन याने बंगालच्या फाळणीचा निर्णय लोकांच्या प्रक्षोभाला न जुमानता अमलात आणला होता. काँग्रेसमधल्या जहाल मंडळींना ठराव – निवेदने हे टाकाऊ ठरल्याने आता मोठे निषेध मोर्चे काढावे असे वाटू लागले होते. बंगाल मध्ये विदेशी मालावर बहिष्कार आणि स्वदेशी चा पुरस्कार या चळवळींना जोर चढत होता आणि त्यांना पंजाब आणि महाराष्ट्रातून पाठिंबा मिळत होता. अशा परिस्थितीत पक्षातील विविध गटांना एकत्र ठेवून जनतेचा क्षोभ सरकारपर्यंत पोचविण्याचे महत्त्वाचे काम गोखल्यांनी निर्भीडपणे परंतु संतुलन राखून तडीस नेले.

कर्झनच्या धोरणांची तुलना औरंगजेबाच्या जुलमी राजवटीशी करून बंगालच्या फाळणीनंतर निर्माण झालेली उत्स्फूर्त एकजूट ही जात–पंथ भेदापलीकडे जाऊन निर्माण झालेल्या सच्च्या राष्ट्रीय भावनेचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले. स्वदेशी चळवळीचे

समर्थन करताना त्यांनी सांगितले की यामुळे लोकांना आपल्या आर्थिक उन्नतीसाठी स्वार्थत्याग, परस्पर सहकार्य आणि डोळसपणे प्रयत्न करण्यास प्रोत्साहन मिळणार आहे. विदेशीवरील बहिष्कार हे राजकीय हत्यार फाळणीनंतरच्या अपवादात्मक परिस्थितीत बंगालमध्ये वापरले गेल्याचे त्यांनी समर्थन केले.

बंगालच्या फाळणीने देशाला एकत्र आणले खरे, पण कॉन्ग्रेसच्या अंतर्गत ब्रिटीश सत्तेबद्दल कोणता दृष्टिकोन ठेवायचा, यावरून मतभेद इतके तीव्र झाले की फूट पडण्याची शक्यता निर्माण झाली. १९०६ ची काँग्रेस दादाभाई नवरोजी यांच्या अध्यक्षतेखाली कोलकात्याला पार पडली. परंतु १९०७ ची सुरत काँग्रेस जहाल गटाच्या विरोधामुळे उधळली गेली. जहाल गटाने स्वतंत्र पक्ष काढण्याचे ठरविले.

त्यामुळे १९०८ मध्ये मवाळ गटाने काँग्रेस ची घटना बनविण्याचे काम गोखल्यांकडे सोपविले. त्यात ध्येय धोरणे आणि मार्ग आणि माध्यमांचा स्पष्ट उल्लेख केला होता. ब्रिटीश साम्राज्यातील इतर राष्ट्रांतील जनतेला असलेले स्वयंशासनाचे अधिकार मिळविणे आणि त्यासाठी घटनात्मक मार्गांनी शासनव्यवस्थेत सुधारणा घडवून आणणे, राष्ट्रीय एकता वाढविणे, सार्वजनिक हित जोपासणे आणि देशाची बौद्धिक, नैतिक, आर्थिक आणि औद्योगिक संपत्ती वाढविणे हे मार्ग असतील असे काँग्रेसच्या नव्या घटनेतील पहिले कलम नमूद करीत होते. नंतरच्या काळात जहाल गटाला पुन्हा काँग्रेसमध्ये आणण्याचे प्रयत्न १९१० आणि १९१४ मध्ये करण्यात आले. परंतु ध्येय आणि मार्ग दोन्हीबद्दल जहाल गटाचे विचार वेगळे असल्याने ते यशस्वी झाले नाहीत. टिळकांचा सार्वजनिक सभेपासूनचा अनुभव गाठीशी असताना देखील गोखल्यांना काही काळ ऐक्य होऊ शकेल असे वाटत होते. परंतु टिळक हे तडजोडीस तयार नसल्याचे दिसताच गोखल्यांनी आपले स्पष्ट मत मध्यस्थी करणाऱ्यांना सांगून टाकले. गोखल्यांच्या हयातीत हा समेट होऊ शकला नाही.

## गांधी आणि दक्षिण आफ्रिका दौरा

दक्षिण आफ्रिका, मॉरिशस, वेस्ट इंडीज इ ब्रिटीश वसाहतींमध्ये ऊस, चहा, कॉफीच्या

मळ्यांमध्ये काम करण्यासाठी भारतातून मजूर नेण्यात येत. गुलामगिरीची पद्धत बंद झाल्याने त्यांना करारनामा करून तिकडे नेले जाई. करारांकित मजूर पाच वर्षे काम केल्यानंतर स्वतंत्र काम करण्यास मोकळा असे. पण त्याला ३ पौंडाचा वार्षिक कर भरावा लागे. तसेच त्याला वर्णद्वेषामुळे कुठल्याच सोयी सवलती उपलब्ध होऊ शकत नसत. परिणामी पुन्हा करारांकित होणे अथवा जमवलेली पुंजी खर्चून मायदेशी परतणे हेच पर्याय त्यांच्यापुढे असत. प्रत्यक्षात ही वेगळ्या तऱ्हेने लादलेली गुलामगिरीच होती. १९०१ च्या कोलकाता अधिवेशनात हा विषय मांडण्यासाठी मोहनदास गांधी आले होते. पण त्या सर्व वातावरणाला ते नवखे असल्यामुळे बुजून जाऊन ते काही विषय समितीपुढे बोलू धजावत नव्हते. तेव्हा गोखल्यांनी त्यांची त्या कुचम्बणेतून सुटका केली. त्यानंतर सातत्याने कॉंग्रेस व कायदेमंडळ तसेच ब्रिटनमधील दौऱ्यात गोखल्यांनी परदेशस्थ भारतीय मजुरांचा विषय मांडून त्यांच्या मागण्या पुढे रेटल्या. लाहोर येथील १९०९ च्या २४ व्या कॉंग्रेस अधिवेशनात त्यांनी भाषणात असे म्हटले :

''(परदेशातील भारतीय मजुरांसंबंधीचा) हा विषय म्हणजे आपण सर्व, आपला देश, आपली देशभक्ती, सार्वजनिक हिताची आपली तळमळ या सर्वांची ईश्वर आणि मानवतेने पाहिलेली कसोटी आहे. जितके आपण या कसोटीला उतरू, तितकेच आपण या मायदेशाला वर काढू शकू. ''१९०७ मध्ये ट्रान्सवाल मधील नवीन कायद्याच्या विरोधात गांधींनी सुरु केलेल्या सत्याग्रहाला नुसता पाठिंबा देऊन गोखले थांबले नाहीत, तर त्या लढ्याला आर्थिक सहाय्य करण्यासाठी एक समिती स्थापून त्यांनी देणग्या गोळा करून गांधींना पैशाची रसद पुरविली. गांधींच्या सत्याग्रहाची प्रशंसा करताना गोखले म्हणाले की हे नैतिक आणि आत्मिक पातळीवरचे साधन अनुकरणीय आहे. गांधींची विचारसरणी आणि कार्यपद्धती यातील एकवाक्यता गोखल्यांना मनापासून भावली आणि म्हणून आफ्रिकेतील बांधवांना मदतीसाठी त्यांनी जिवाचे रान केले. १९०९ मध्ये मुंबईतील एका जाहीर सभेत गोखल्यांनी गांधींच्या सत्याग्रहाबद्दल काढलेले पुढील उद्गार त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष देतात:

'' ही सारी चळवळ किती उत्कृष्टपणे चालविली आहे ते पहा. आपले नेहमीचे मतभेद विसरून आणि गाऱ्हाणी बाजूला ठेवून हिंदू, मुसलमान, पारशी इ मंडळी अपूर्व असा संयम राखून आपली एकजूट दाखवीत आहेत. ज्या माणसाने हे घडवून आणले, त्याला कमी तर लेखूच नका, पण त्याचे नैतिक सामर्थ्य किती उच्च कोटीचे आहे ते जाणून घ्या.''

'ज्यांना मायदेशात कमीपणाची वागणूक मिळते त्यांना विदेशात काय वेगळे मिळणार', असे गोखल्यांचे म्हणणे होते. गांधींच्या आग्रहाखातर १९१२ मध्ये इंग्लंड दौऱ्याहून परतताना ऑक्टोबर महिन्यात त्यांनी केप टाऊनला पाय ठेवला. या भरगच्च दौऱ्याचा गोखल्यांच्या तब्येतीवर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून गांधींनी त्यांच्या सचिवाची भूमिका निभावली.

भारताला दक्षिण आफ्रिका सरकारशी बोलणी थेट न करता ब्रिटन मार्फत करावी लागत. गोखल्यांनी आफ्रिकेतील गोऱ्या उदारमतवादी मंडळींना आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला आणि तो बऱ्याच अंशी यशस्वी झाला. दक्षिण आफ्रिकेच्या संसदेत बोलताना सिनेटर श्राइनर यांनी गोखल्यांचा उल्लेख ''आजच्या युगातील महान व्यक्तींमधील एक'' असा केला. आपल्या नेहमीच्या संयत भाषेत त्यांनी डच राज्यकर्त्यांवर टीका देखील केली. ''युरोपियनांमध्ये बरेच गुण असले तरी संवेदनशीलतेचा मोठा अभाव आहे; त्यामुळे त्यांना इतरांची दुःखे कळू शकत नाहीत. नाही तर 'पूर्वेकडे युरोपियनांना मुक्त द्वार असताना युरोपची दारे आशियाई लोकांना बंद का असावीत' हा प्रश्न त्यांना नक्कीच पडला असता.'' गोखल्यांनी आफ्रिकेतील गोरे, कृष्णवर्णीय आणि भारतीय अशा सर्वांची मने जिंकली आणि काही आश्वासने देखील घेतली. परंतु त्या सर्वांपेक्षा महत्त्वाचे म्हणजे या सफरीच्या अखेरीस झांजिबारला येताना त्यांनी गांधींशी मायदेशातील राजकीय परिस्थितीबद्दल प्रदीर्घ चर्चा केली आणि त्यांना भारतात परतण्याविषयी गळ घातली. एका अर्थाने दक्षिण आफ्रिकेतील लढ्याला आपले सक्रिय पाठबळ देऊन गोखल्यांनी गांधींना आपले अघोषित वारस बनविले होते.

## अंतकाळ

गोखले एकूण सात वेळा इंग्लंडला गेले. या सर्व दौऱ्यांमध्ये त्यांचा दिनक्रम हा पहाटे सुरु होऊन मध्यरात्री संपत असे. दिवसभरच्या औपचारिक बैठकांची तयारी आणि अभ्यास लवकर उठून करण्याचा त्यांचा परिपाठ असे. या सर्वांचा ताण त्यांच्यावर पडला होता. त्यांच्या इंग्लंडमधील शेवटच्या वास्तव्याची आठवण सरोजिनी नायडू यांच्या शब्दात बोलकी झाली आहे:

''पानगळीला बिलगून आलेली उदासी धुक्याच्या मंदावलेल्या प्रकाशासारखी त्यांच्या चित्तवृत्तीभर पसरली होती. कदाचित मृत्यूची छाया आपल्या दिशेने सरकत असल्याची जाणीवही असू शकेल. माझा निरोप घेताना ते एवढेच म्हणाले की आपली भेट परत होणे नाही. तू जगशील तेव्हा एवढे लक्षात असू दे की तुझे आयुष्य देशसेवेला समर्पित आहे. म्हणजे माझे काम झाले. ''

नोव्हेंबर १९१४ मध्ये भारतात परतल्यावर गोखले पुन्हा कामात गुंतले होते. फेब्रुवारी १९१५ च्या १२ तारखेला सर्व्हन्टस ऑफ इंडिया सोसायटीमध्ये गांधीजींचा सत्कार ठेवला होता. दुसऱ्या दिवशी पहाटे त्यांनी लॉर्ड विलिंग्डन यांना भारताच्या घटनेसंबंधी द्यावयाच्या सूचनांचे लेखन केले. त्यानंतर त्यांना श्वासोच्छ्वासाला त्रास होऊ लागला. एक आठवडाभर थोडे लेखन आणि धाप लागणे हा प्रकार चालू राहिला आणि अखेर १९ फेब्रुवारीच्या रात्री हा महान उदारमतवादी देशभक्त काळाच्या पडद्याआड गेला.

◆◆◆

## २

# द्रष्टा शिक्षणवेत्ता: गोखल्यांचे शिक्षणविषयक योगदान

न्यू इंग्लिश स्कूल मध्ये शिक्षकी पेशाला सुरुवात केल्यावर दुसऱ्याच वर्षी गोखल्यांची फर्ग्युसन कॉलेज मध्ये नेमणूक झाली. तिथे अध्यापनाबरोबरच आजीव सदस्य म्हणून त्यांचा शैक्षणिक व्यवस्थापनामध्ये सहभाग होता. त्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या विद्वत्सभेचे ते सदस्य होते. मग प्रांतिक कायदेमंडळ आणि नंतर मध्यवर्ती कायदेमंडळ या वेगवेगळ्या स्तरांवर काम करण्याची संधी गोखल्यांना मिळाली. म्हणून शिक्षणविषयक समस्यांचा त्यांनी साकल्याने विचार केला.

त्यांच्या विचाराचे मुख्य सूत्र असे होते की भारताला पाश्चात्य जगासारखी सर्वांगीण प्रगती साधायची असेल तर शेती, उद्योग आणि शासनप्रणाली ही आधुनिक पायावर उभारली पाहिजे आणि ती भारतीयांनी राबविली पाहिजे. हे स्वावलंबन व्यापक प्रमाणावर आणि शाश्वत पायावर साधण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण आहे. यामध्ये शासनाची भूमिका ही शिक्षण क्षेत्राचा विस्तार साधण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे ही असली पाहिजे. या सर्वामागचा त्यांचा ठाम विश्वास हा होता की सुशिक्षित भारतीय माणूस कोणत्याही दृष्टीने सुशिक्षित इंग्रजापेक्षा मागे राहणार नाही आणि हे दाखविण्याची कोणतीही संधी ते दवडीत नसत.

१९०२ पासून ते पुढील प्रत्येक वर्षी शिक्षणावरील खर्च वाढविण्याची मागणी कायदेमंडळात करीत असत. मध्यवर्ती कायदेमंडळातील आपल्या पदार्पणाच्या भाषणात अंदाजपत्रकाचे विश्लेषण करताना त्यांनी हे दाखवून दिले की 'गत पंधरा वर्षात ब्रिटनमधील शालेय शिक्षणावरील खर्च अडीचपटीने वाढला असून भारतात मात्र त्यात नगण्य वाढ होत आहे. परिणामी शालेय वयातील दहापैकी नऊ मुले शाळेबाहेर आहेत आणि पाचातल्या चार गावांत शाळाच नाही.'

त्यावेळच्या शासनप्रणाली मध्ये शिक्षण ही प्रांतिक सरकारांच्या अखत्यारीतली

बाब होती. मध्यवर्ती सरकारला त्यावेळेस साम्राज्य सरकार असे संबोधले जाई. गोखल्यांचा आग्रह असा होता की शिक्षण हे साम्राज्याच्या खर्चाची बाब म्हणून गणले जावे. याचे कारण प्रांतिक सरकारे अशी सबब पुढे करू शकत की शेतीवरील करांचे प्रमाण ३० वर्षांसाठी कायम असल्याने त्यांचे उत्पन्न वाढत नाही आणि सबब शिक्षणावरील खर्चात वाढ करता येत नाही. साम्राज्याच्या खर्चाची बाब म्हणून जर शिक्षण धरले गेले तर अंदाजपत्रकीय शिलकीमधून त्यावर खर्च करता येईल. कारण त्याकाळात साम्राज्य सरकारचे उत्पन्न खर्चापेक्षा अधिक असून शिल्लक पडत असे आणि त्या शिलकीतून साम्राज्याचा इतर खर्च भागवता येत असे..

प्रजासत्ताक भारताने आपल्या घटनेत संघराज्याचे तत्त्व स्वीकारले आणि म्हणून शिक्षणाचा समावेश या समवर्ती यादीमध्ये केला गेला. त्यामुळे शिक्षण हा विषय केंद्र सरकार आणि राज्य सरकार या दोहोंच्या अधिकारक्षेत्रात येतो. त्याची पूर्वपीठिका ही ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या धोरणात कशी आहे, ती पुढे पहा.

१८५७ च्या स्वातंत्र्य समरानंतर कंपनी सरकार जाऊन राणी सरकार आले आणि त्यांनी लॉर्ड मेकॉलेचे धोरण पुढे चालू ठेवले. या धोरणाचा थोडक्यात इतिहास पाहणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे गोखल्यांनी एक दशक भर जो विषय कायदेमंडळात लावून धरला त्याचे महत्त्व लक्षात येईल.

ईस्ट इंडिया कंपनीचे सरकार ब्रिटीश संसदेच्या १८१३ च्या आदेशानुसार पर्शियन आणि संस्कृत शिक्षण अनुक्रमे देणाऱ्या मदरसे आणि पाठशाळांना मिळून देशभरात वार्षिक रु १ लाख आर्थिक सहाय्य करीत असे. काही वर्षांनी कंपनी अधिकाऱ्यांच्या हे लक्षात येऊ लागले की बंगाल मध्ये इंग्रजी शिकविणारे खाजगी वर्ग सुरु झाले आहेत. कंपनी सरकारकडे नोकरी मिळविण्यासाठी फारशी किंवा संस्कृतपेक्षा इंग्रजी शिकल्याने अधिक उपयोग होईल, असा मुलांना या वर्गात धाडण्याचा उच्चवर्गीयांचा हेतू होता. या सुमारास इंग्लंड मध्ये अभिजात विरुद्ध उपयुक्त शिक्षण हा वाद चालू होता. तोच धागा पकडून मेकॉलेने इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार केला आणि इंग्रजी

शिक्षणाचा कायदा १८३५ मध्ये संमत झाला. अर्थात हे शिक्षण आम जनतेसाठी नसून सधन लोकांसाठी होते. मेकॉलेचे स्पष्टीकरण असे होते–

''आमच्याजवळील मर्यादित साधने पाहता सर्व जनतेला शिक्षित करणे आमच्या आवाक्याबाहेर आहे. लक्षावधी जनतेबरोबर आमचे दुभाषे म्हणून काम करणारा वर्ग निर्माण करण्याकडेच आमचे प्रयत्न सर्व ताकदीनिशी लागले पाहिजेत. हे रक्ताने आणि रंगाने भारतीय पण बौद्धिक कुवत, नीतिमूल्ये, मते आणि अभिरुची याबाबतीत मात्र इंग्लिश असले पाहिजेत. त्यांनी हवे तर देशी भाषांना घासूनपुसून झळाळी द्यावी, पाश्चात्य विज्ञानातील संज्ञांना पर्याय शोधावेत आणि सर्वसामान्यांपर्यंत हे ज्ञान पोचविण्याची माध्यमे म्हणून या भाषांचा विकास करावा.''

ही मानसिकता नंतरच्या अर्धशतकाहून अधिक काळात दृढमूल झाली होती आणि गोखल्यांना तिचा सामना करायचा होता. १८८१ मध्ये हंटर आयोगापुढे महात्मा फुल्यांनी सादर केलेल्या निवेदनात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची मागणी केलेली होती. परंतु नंतरच्या दोन दशकात ब्रिटीश राज्यकर्त्यांनी त्यावर कोणतेच पाऊल उचलले नव्हते. गोखल्यांनी इतर देशांची आकडेवारी गोळा करून हे दाखविले की इंग्लंड अमेरिकेत १८ टक्क्यांहून अधिक मुले प्राथमिक शाळेत दाखल होतात आणि त्यांच्यावर दरडोई ५.५ शिलिंग (४.१२ रुपये) इतका खर्च होतो. भारतात मात्र फक्त १.४ टक्के मुले प्राथमिक शिक्षण घेतात आणि त्यांच्यावर दर डोई १ पेनीपेक्षा कमी खर्च होतो. (१ पौंड=२० शिलिंग आणि १ शिलिंग = १२ पेनी, सर्व आकडे १९०३ च्या भाषणातून). त्यावेळचा विनिमयदर १ पौंड = १५ रुपये धरला तर भारतातल्या विद्यार्थ्यांवर दरडोई १ आणा खर्च प्राथमिक शिक्षणात केला जाई. त्याच्या ६६पट खर्च इंग्लंड अमेरिकेत केला जाई. उच्च शिक्षणाच्या बाबतीत तर अधिकच दुरवस्था होती. इंग्लंड अमेरिकेत दरडोई खर्च ११ पेन्स होता तर भारतात जेमतेम पाव पेनी उच्च शिक्षणावर खर्च होत होती. राष्ट्रीय शिक्षण हे इतर सरकारे आपले परम कर्तव्य समजतात आणि भारतात मात्र सरकार शिक्षणाला नगण्य स्थान देत आहे, हे त्यांनी दाखवून दिले. नुकतेच अवतीर्ण

झालेले विसावे शतक म्हणजे लोकांच्या शैक्षणिक आणि औद्योगिक प्रगतीला मोठी आणि सर्वंकष चालना देणारे ठरणार आहे, असे भाकीतही त्यांनी वर्तविले.

आणखी तीन वर्षांनी १९०६च्या अंदाजपत्रकावरील भाषणात त्यांनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची निकड प्रतिपादन केली. बालवयातले शिक्षणाचे संस्कार मुलांच्या सर्वांगीण प्रगतीचा आणि म्हणून देशाच्या उद्धाराचा पाया असतात, हे देशहिताची तळमळ लागून राहिलेल्या गोखल्यांसारख्या धुरंधर नेत्याला तेव्हाच उमगले होते. प्रथम मोफत शिक्षण देऊन लोकांना आपल्या धोरणाकडे वळविले पाहिजे आणि नंतर त्याच्या प्रसारासाठी शाळेत जाण्याची सक्ती प्रसंगी केली पाहिजे, असे त्यांचे मत होते.

शाळेत गेली नाही तर मुलांना शेतावर किंवा कारखान्यात कामाला लावले जाते. त्यांच्याकडून जादा तास काम करून घेतले जाते आणि एकीकडे त्यांची पिळवणूक होत असताना त्यांना वाईट सवयी लागण्याचा धोका वाढतो. म्हणून शाळेत जाण्याची सक्ती समर्थनीय आहे. अर्थात अशी वेळ नेहमी येण्याची शक्यता कमी; जर मोफत शिक्षण सर्वांपर्यंत पोचले तर लोक आपणहून मुलांना शाळेत घालतील. आपल्या देशाचे भवितव्य मुलांच्या प्राथमिक शिक्षणाशी निगडीत आहे असे त्यांचे आग्रहाचे प्रतिपादन असे. कामावर ठेवण्याची किमान वयोमर्यादा ९ वरून १० वर्षे करण्याची सूचना त्यांनी केली होती.

सरकार आपल्या सूचनांची दखल घेत नाही, म्हणून आपला प्राथमिक शिक्षणासम्बंधीचा आग्रह सोडून न देता अधिक जोराने गोखले तो मांडू लागले. १९१० मध्ये त्यांनी असा प्रस्ताव मांडला की मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण हे धोरण स्वीकारून त्याच्या अंमलबजावणीसाठी एक स्वतंत्र आयोग नेमण्यात यावा. ही सक्ती मुलग्यांसाठी ६ ते १० अशी चार वर्षे असावी. मुलींना काही काळ सक्तीपासून दूर ठेवावे. त्यासाठी लागणाऱ्या रु ३५ कोटी निधीची तरतूद दोन तृतीयांश सरकारने आणि एक तृतीयांश स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावी, असे प्रस्तावाचे स्वरूप होते. या पलीकडे जाऊन गृह खात्यामध्ये सचिव पदाचा अधिकारी शिक्षण विभागासाठी नेमावा

आणि पुढे व्हाईसरॉय यांच्या कार्यकारी मंडळात एक शिक्षण-सदस्य असावा हेही त्यांनी नमूद केले होते. प्रदेशांची सांस्कृतिक वैशिष्ट्ये, आर्थिक क्षमता आणि सामाजिक जागृती यामध्ये असलेली विविधता लक्षात घेऊन गोखल्यांनी शिक्षण धोरण ठरविण्यात आणि अमलात आणण्यात अडचणी येतील हे ओळखून या सूचना केल्या होत्या. सरकारने या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून त्याचा समग्र विचार केला जाईल असे सांगितल्यावर गोखल्यांनी आपला ठराव मागे घेतला. त्यानुसार वर्षभरात वेगळा शिक्षण विभाग स्थापन होऊन तेथे सर स्पेन्सर हारकोर्ट बट्लर यांची नेमणूक करण्यात आली.

सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण ही योजना बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानात १८९३ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर अमरेली तालुक्यातील दहा गावात सुरु केली होती. तिचे फलित काळजीपूर्वक पाहिल्यावर आठ वर्षांनी ती संपूर्ण तालुक्याला आणि नंतर १९०६ मध्ये उभ्या संस्थानात लागू करण्यात आली. हा दाखला गोखल्यांनी ब्रिटीश सरकारला दिला. मुलांना ६ ते १२ आणि मुलींना ६ ते १० वयापर्यंत ही सक्ती लागू होती.

दरम्यानच्या काळात झालेल्या सुधारणांमुळे अशासकीय सदस्यांना विधेयक मांडण्याची मुभा मिळाल्याबरोबर गोखल्यांनी १९११ च्या मार्च मध्ये प्राथमिक शिक्षण विधेयक मांडले. त्याचा आराखडा त्यांनी इंग्लंड आणि आयर्लंड यांच्या कायद्यांचा अभ्यास करून तयार केला होता. मुलांना शाळेत घालण्याची जबाबदारी पालकांवर आणि सक्षम पालकांकडून शुल्क वसुलीची जबाबदारी जिल्हा मंडळांवर टाकलेली होती. नादार मुलांना मोफत शिक्षण आणि ६ ते १० वयोगटातील मुलग्यांना शिक्षणाची सक्ती सुचविली होती. मुलींना काही काळ सूट दिली होती. काँग्रेसनेही या विधेयकाला पाठिंबा दिला. मुस्लीम लीगने काही अटींसह तत्त्वतः मान्यता दर्शविली. देशभरातल्या नगर परिषदा, जिल्हा मंडळे, तालुका मंडळे आणि सनदी अधिकारी यांनीसुद्धा विधेयकाला पाठिंबा दिला.

ब्रिटीश अधिकारीवर्गाला अशी भीती वाटत होती की जर शिक्षणाचा प्रसार

वाढला तर कालांतराने भारतीयांचा परकी सत्तेला विरोध वाढेल आणि म्हणून त्यांचा विधेयकाला विरोध होता. शेवटी १३ विरुद्ध ३८ मतांनी हे विधेयक फेटाळण्यात आले. त्यावर गोखल्यांची प्रतिक्रिया बोलकी होती आणि ती परिवर्तनासाठी कटिबद्ध असलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याने मनन करण्याजोगी आहे:

''अध्यक्ष महाराज, माझे विधेयक फेटाळले जाणार, हे मला पुरते ठाऊक आहे. माझी तक्रार नाही आणि मी निराशही झालेलो नाही. इंग्लंडमध्ये हा कायदा आणताना किती अडचणी आल्या, त्यादेखील मला माहित आहेत. मला नेहमीच असे वाटत आले आहे आणि मी ते कित्येकदा बोलून दाखविले आहे की भारतातली आमची पिढी आमच्या अपयशाने देशाची सेवा करीत आहे. ज्यांना आपल्या यशाने देशाची सेवा करण्याचे भाग्य लाभेल, त्या आमच्या नंतरच्या पिढ्या असतील. या वाटचालीत आमच्या वाट्याला जे काही येईल ते आम्ही आनंदाने स्वीकारतो. कर्तव्यपूर्तीचे समाधान आम्हाला मिळते, कारण जिथे कर्तव्याची हाक स्पष्ट ऐकू येते, तेथे प्रयत्नच सोडून देण्यापेक्षा प्रयत्न करून अपयश आले तरी ते केव्हाही चांगलेच.''

## तंत्रशिक्षण

परदेशदौऱ्याचा एक फायदा असतो, तो म्हणजे तिथल्या तंत्रज्ञानाची आपल्या तंत्रज्ञानाशी तुलना करता येते. तंत्रज्ञानात प्रगती करण्याची निकड गोखल्यांना पटलेली होती. १९०५ मध्ये शेती संशोधन आणि प्रशिक्षण यासाठी सरकारने रु २० लाख ही तरतूद केली होती. तिचे स्वागत करून गोखल्यांनी पाच लाख पौंड खर्चून एक जागतिक दर्जाची तंत्रज्ञान संस्था स्थापावी असे सुचविले होते. यातून उद्योग-तंत्रज्ञान यांनाच चालना मिळेल असे नाही, तर लोकांच्या उत्साहाला आणि उद्यमशीलतेला प्रोत्साहन मिळेल असे त्यांनी सांगितले होते. १९१०मध्ये स. इं. सोसायटीतर्फे त्यांनी ''रानडे इंडस्ट्रियल अँड इकनॉमिक इन्स्टिट्यूट'' स्थापन केली होती व .त्यासाठी वेगळी इमारतही बांधली होती.

## खासगी शिक्षणसंस्था प्रारूप

गोखल्यांच्या कामाचा एक दुर्लक्षित पैलू म्हणजे डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी उभे केलेले शिक्षणसंस्थांचे प्रारूप. ब्रिटीश अमदानीत ''तुम्ही तुमचे शिक्षण सांभाळा, आम्ही मर्यादित अर्थसाहाय्य करू'' ही सरकारी भूमिका होती. अशा परिस्थितीत संस्थानिक आणि दानशूर व्यक्तींनी देणग्या दिल्या, तरी संस्था चालविण्याचा खटाटोप करणे आवश्यक होते. देशामध्ये त्यावेळेस स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून लोकशाही कार्यप्रणालीचा प्रघात पडू लागला होता. डेक्कन ए. सोसायटीची रचना ही शिक्षक-संचालित स्वरुपाची होती. त्यामध्ये जबाबदारी घेण्यास पात्र अशा शिक्षकांची निवड करून त्यांनी २० वर्षे संस्थेसाठी काम करण्याची शपथ घेण्याची तरतूद होती. असे शिक्षक हे आजीव सदस्य म्हणून गणले जात.

आजीव सदस्य मंडळ हे साप्ताहिक बैठकांच्या माध्यमातून संस्थेच्या कामकाजाविषयीचे निर्णय लोकशाही मार्गाने घेत असे. डे.ए. सोसायटीचा सुरवातीचा वादग्रस्त काळ सोडला तर ही व्यवस्था सुरळीत चालू राहिली. ती प्रस्थापित करण्यात गोखल्यांचा मोठा वाटा होता. ही आजीव सदस्य व्यवस्था अनेक दृष्टींनी उपयुक्त ठरली होती.

आजीव सदस्य हे शिक्षक असल्याने त्यांचे निर्णय हे शिक्षणाच्या उद्दिष्टांसाठी सुसंगत असण्याची शक्यता अधिक होती. त्यांची निवड शिक्षकांमधून होत असल्याने त्या व्यवस्थेत एक सातत्य राहत होते. जुन्या सदस्यांच्या हाताखाली नवे सदस्य उमेदवारी करत असल्याने अनुभव हस्तांतरित होत होता. परस्परांवर नियंत्रण राहत असल्याने पैशाचे व्यवहार हे निर्भेळ राहत असत आणि त्यामुळे समाजातील दानशूर व्यक्तींना आपल्या देणग्यांचा विनियोग रास्त कारणासाठी होईल, ही खात्री वाटत असे.

ही आजीव सदस्य प्रणाली स्वीकारलेल्या कित्येक खासगी शिक्षणसंस्था महाराष्ट्राच्या विविध भागांत उभ्या राहिल्या आणि त्यामुळे महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लागला. गोखल्यांच्या तिसऱ्या पुण्यतिथीला त्यांच्या नावाने नाशिकला ''गोखले एज्युकेशन

सोसायटी'' स्थापन झाली आणि शतकोत्तर वाटचाल करताना तिचा विस्तारही मोठा झाला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वतःच्या हिमतीवर अशा संस्था उभारणे आणि यशस्वीरीत्या चालवणे, हे आव्हान या मंडळींना लोकशाही प्रणालीमुळे पेलता आले. या प्रणालीचे प्रारूप डे.ए.सोसायटीमधून सिद्ध झाले होते. त्यामधून सुशिक्षित वर्ग निर्माण झाला आणि त्याने नंतरच्या काळात स्वातंत्र्य चळवळीत मोठा सहभाग घेतला.

आजही शहरी व ग्रामीण भागातील खासगी शाळांच्या संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र देशामध्ये अग्रस्थानी आहे. याचे कारण स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांनी शिक्षणाकडे दुर्लक्ष केले असतानाही महाराष्ट्रातील चळवळी मंडळी स्वस्थ बसली नाहीत. त्यांनी संस्था स्थापून संस्थानिकांचे आणि इतर दानशूर व्यक्तींचे साह्य मिळवून शिक्षणप्रसार चालू ठेवला. त्यातून पुढे महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीला चालना मिळाली.

प्राथमिक शिक्षण हा सामान्य जनतेच्या उद्धाराचा कळीचा विषय आहे, हे महात्मा फुल्यांनी हंटर आयोगासमोर १८८१ मध्ये ठासून सांगितले होते. तोच धागा तीन दशकांनंतरच्या गोखल्यांच्या कायदेमंडळातील प्रतिपादनात आपणाला दिसून येतो.

सर्व स्तरावरचे आणि सर्व प्रकारचे शिक्षण हा विषय वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय महत्त्वाचा आहे आणि तितकाच तो तात्कालिक आणि दूरगामी परिणाम करणारा आहे, हे गोखल्यांच्या सातत्याच्या आणि चिकाटीने केलेल्या कायदेमंडळातील पाठपुराव्यामुळे पारतंत्र्यातील महाराष्ट्राला जाणवले आणि उत्साही मंडळींनी गोखल्यांनी दाखविलेला संस्थात्मक मार्ग अनुसरला, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

◆◆◆

# ३ उत्कृष्ट संसदपटू

आज आपण भारताचा उल्लेख सार्थ अभिमानाने 'संसदीय लोकशाही' असा करतो. आपल्या उपखंडातील जे इतर देश आपल्याबरोबर स्वतंत्र झाले, त्यांच्या तुलनेत आपली लोकशाही गेल्या साठहून अधिक वर्षात मजबूत झाली आहे. इतर देशांसारखी लष्करी किंवा हुकुमशाही राजवट आमच्या देशात आलेली नाही आणि येऊ शकणार नाही, असा विश्वास भारतीयांनाच नव्हे तर इतर देशांनाही वाटतो. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळेस कित्येक ब्रिटीश राजकारणी आणि भारतातील काही अभिजन वर्ग यांना भारतातील लोकशाहीच्या भवितव्याबाबत गंभीर चिंता वाटत असे. गेल्या सात दशकांतील संसदीय लोकशाहीच्या वाटचालीमुळे या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

संसदीय लोकशाहीसाठी काही गोष्टी अत्यावश्यक असतात आणि त्या प्रामुख्याने मूल्यांच्या पातळीवर असतात. त्यातले पहिले म्हणजे परस्पर आदरभाव. राज्यव्यवस्थेचे विधिमंडळ, न्यायपालिका, प्रशासन आणि प्रसारमाध्यमे असे चार घटक एकत्र काम करून एकमेकांना संतुलित राखण्याचे काम करीत असतात. त्यामुळे परस्परांच्या कार्यकक्षा आणि पद्धती याबद्दल कमालीचा आदर बाळगला, तरच प्रत्येक घटक स्वतंत्रपणे आपले कर्तव्य बजावू शकतो. परस्परांच्या कामाची समीक्षा-टीका करणे आणि उणिवा दाखविणे हे संतुलन राखण्याचा अविभाज्य भाग आहे. परंतु ते करताना कुणाचा अधिक्षेप होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक असते. परस्पर आदर या तत्त्वाला जोडून येणारे दुसरे तत्त्व म्हणजे स्वतंत्र विचार. नुसते विचारस्वातंत्र्य नव्हे तर खरोखरीच स्वतंत्रपणे विचार करण्याची कुवत निर्माण करणे हे स्वतंत्र विचारात अभिप्रेत आहे. हा स्वतंत्र विचार लोकशाहीत का महत्त्वाचा आहे ते लक्षात घेतले पाहिजे.

मतभेद आणि संघर्ष हे लोकशाहीमध्ये अपरिहार्य ठरतात. नेमके हेच हुकुमशहांना नको असते. मतभेद मिटविण्यासाठी लोकशाहीमध्ये चर्चा व युक्तिवाद या गोष्टींची

व्यवहार्य तरतूद संविधानामध्ये केलेली असते. त्यामुळे संविधानाप्रती निष्ठा हे मूल्य लोकशाहीमध्ये महत्त्वाचे गणले जाते. ही मूल्ये दृढ झाल्यानेच भारतातील लोकशाही गेली सात दशके सातत्य राखून आहे. या मूल्यांचे महत्त्व कालातीत असते.

गोखले एक तपाहून अधिक काळ साम्राज्याच्या शाही कायदेमंडळाचे अशासकीय सदस्य राहिले होते. आजच्या लोकशाही संसदेसारखे नसले तरी हे कायदेमंडळ मर्यादित अर्थाने संसदीय स्वरूपाचे होते, कारण त्यात सरकारी धोरणे आणि कामगिरी यांवर चर्चेला वाव होता. येथील गोखल्यांच्या कामगिरीचा आपण दोन अंगांनी आढावा घेऊ शकतो. एक म्हणजे विशिष्ट विषयांवरील त्यांची मते आणि दृष्टिकोन आणि दुसरे अंग म्हणजे तेथे त्यांनी अंगिकारलेली तत्त्वे आणि मूल्ये.

## अंदाज पत्रकांचे विश्लेषण

नव्या शतकामधील भारताची उभारणी करण्यासाठीचा पाया तयार करणे हे आपले कायदेमंडळातील कामाचे स्वरूप आहे हे त्यांनी ठरविले होते. कराद्वारे महसूल किती गोळा होतो आणि त्याचा विनियोग कुठे आणि कसा केला जातो हे बारकाईने तपासण्याचे कौशल्य त्यांनी ग.व्यं.जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राप्त करून घेतले होते. सरकारी तिजोऱ्यांमधील पैसा एकीकडे भरून वाहत होता, तर त्याच वेळेस लोकांची हलाखी मात्र कमी होत नव्हती, याकडे गोखल्यांच्या सुरवातीच्या भाषणांचा रोख होता. महसुलातून शिल्लक पडत होती, कारण सरकार लोकहिताच्या कामांवर पैसे खर्च करीत नव्हते. यावर एक उपाय म्हणजे कराचे प्रमाण कमी करणे हा असतो. त्याच्या जोडीला दुसरा उपाय म्हणजे खर्चाची वाटणी योग्य तऱ्हेने करणे.

१९१० च्या अंदाजपत्रकावरील भाषणात गोखले म्हणाले की ''आपल्यापुढे दोन धोरणे आहेत. एकीकडे तुम्ही लष्करावरील खर्च अधिकाधिक वाढवत आहात, वरच्या अंगाने फुगलेली नोकरशाही पोसताहात आणि रेल्वेचा विस्तार करण्यात पैसे गुंतवत आहात. दुसरी दिशा म्हणजे अधिक शिक्षण, अधिक आरोग्यदायक सुविधा, शेतीतील

कर्जबाजारीपणा संपविणे आणि जनतेच्या इतर नैतिक आणि भौतिक कल्याणासाठी पैसा खर्च करणे.''

रेल्वेचे जाळे विस्तारणे आणि सीमेवर सैन्य वाढविण्यावर ब्रिटीश सरकार खर्च करायला तयार, पण शेतीतील कर्जबाजारीपणा संपविण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यायला मात्र टाळाटाळ करत आहे, अशी टीका ते सातत्याने करीत असत.

## शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा

शेतकऱ्यांना दुरवस्थेत लोटून कोणतेही सरकार सुरळीतपणे कारभार करू शकत नाही, असे गोखले वारंवार बजावीत असत. कारण देशातला त्या काळातला तो सर्वात मोठा उद्योग होता. शेतीत पाटबंधारे इ. वरील खर्चास सरकार तयार नसल्याने शेतीत सुधारणा होत नाहीत आणि परिणामी शेती उत्पादनात घट होत आहे, जमिनीचा पोत खालावत आहे, पण शेती महसुलात मात्र वाढ होतच आहे, हे गोखल्यांनी दाखवून दिले. त्यात अज्ञानाच्या जोडीला दुष्काळ आणि अनारोग्याच्या जोडीला कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी गांजून गेला आहे, असे गंभीर चित्र गोखले सातत्याने कायदेमंडळापुढे मांडत असत. नुसते शेतीचे अर्थशास्त्र त्यांनी मांडले नाही, तर त्यातला मानवी घटक जो शेतकरी, त्याच्या हलाखीकडे त्यांनी लक्ष वेधले. हे करताना त्यांचा जो ''स्वावलंबनातून स्वातंत्र्य'' हा मूलमंत्र होता, तो शेतीलाही त्यांनी लागू केला.

त्यावेळेस तज्ज्ञांच्या मते एक तृतीयांश शेतकरी हे कर्ज न फेडता आल्याने आपल्या गहाण जमिनी गमावून बसले होते आणि आपल्याच शेतावर मजूर म्हणून राबत होते. गोखल्यांची मागणी एक विशेष न्यायाधिकरण नेमून त्याद्वारे एक दशलक्ष पौंड इतक्या रकमेचे शेतकऱ्यांना कर्जनिवारणासाठी वाटप करावे अशी होती. ही रक्कम शेतसाऱ्यातून ४.५ टक्के दराने वसूल करावी आणि कर्जाच्या विळख्यातून शेतकऱ्याची मुक्तता करावी, कारण तो अर्थव्यवस्थेचा कणा आहे, असे त्यांचे म्हणणे होते. पण एवढ्यावर ते थांबले नाहीत.

शेतकऱ्यांना स्वावलंबी बनविण्याचा एक मार्ग म्हणजे त्यांना सहकारी पतसंस्था काढण्यास परवानगी देणे, हा होय असे गोखले मांडत असत. तुमच्याकडे जर स्वावलम्बनाची ओढ नसेल, बचतीची वृत्ती नसेल आणि साधनकुशलता जोपासता येत नसेल तर बाहेरून कितीही मदत मिळाली तरी त्यातून फार मोठा आणि कायमस्वरूपी फायदा होणे अशक्य आहे, असे त्यांना वाटत असे.

आपल्याकडे शतकानुशतके सरकारवर अवलंबून राहण्याची परंपरा आहे आणि त्यामुळे लोकांना स्वतःच्या कृतिशीलतेचा भरवसा वाटत नाही. ''आपण काय करू शकणार आणि केले तरी त्याचा उपयोग काय'' ही नाकर्तेपणाची भूमिका घट्ट बसली आहे. पण ती एकदा का सोडली तर मग कृतिशीलतेचा वारू थांबवणे कुणालाही शक्य होणार नाही, असे गोखल्यांनी १९०४ च्या भाषणात म्हटले होते.

आज आपण 'विकासा'ची परिभाषा वापरतो. धरणे बांधली, रस्ते बांधले, शाळा कॉलेजे काढली आणि कारखाने काढण्यास अनुदान दिले म्हणजे आर्थिक विकास झाला असे बरेच राजकीय नेते समजतात. त्यांनी गोखल्यांनी सांगितलेली त्रिसूत्री लक्षात ठेवली पाहिजे. पहिले म्हणजे स्वावलंबन, स्वतःच्या पायावर उभे राहण्याकडे वाटचाल करणे. दुसरे उत्पन्नातून बचत करून निधी संचय करणे आणि तिसरे म्हणजे उपलब्ध सामग्रीतून साधन संपत्ती निर्माण करणे. हे होत असेल तर त्या प्रदेशाचा विकास शाश्वत पायावर होऊ शकतो. अन्यथा शासकीय मदत मिळून देखील तो प्रदेश विकासात मागे राहतो. मूलभूत सुविधा निर्माण होऊन जर लोकांच्या स्थितीत फरक पडत नसेल तर ती वाढ आहे, पण विकास नाही, असे अर्थतज्ज्ञ मानतात. आजही दरडोई वार्षिक उत्पन्नाच्या आकडेवारीत राज्यांच्या क्रमवारीमध्ये महाराष्ट्र सतत अग्रेसर राहण्यामागे महाराष्ट्रातील लोकांची कृतिशीलता आहे. तीच गोखल्यांनी अधोरेखित केलेली विकासाची संकल्पना आहे. विकास म्हणजे सोयी-सुविधामध्ये गुंतवणूक इतका मर्यादित अर्थ महाराष्ट्राने घेतला नाही आणि कष्टपूर्वक सहकारी संस्थांचे जाळे विणून त्यांचा उपयोग करून लोकांना आत्मविश्वासाने जगण्याचा धडा दिला. सरकारी

मदतीचा वापर करून तिच्याशिवाय प्रगती करणे म्हणजे विकास होय. गोखल्यांच्या पश्चात स्थापन झालेल्या अर्थशास्त्र संस्थेचे संचालक आणि प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ धनंजयराव गाडगीळ यांनी सहकारी संस्था उभारण्यात याच सूत्राचा अवलंब करून दाखविला.

ब्रिटीश सरकारने १९०४ मध्ये गोखल्यांची सहकारी पतसंस्थांची सूचना मान्य केली. परंतु दुष्काळ निवारणासाठी राखून ठेवलेला निधी ब्रिटीश सरकार रेल्वे बांधणीसाठी वापरू लागल्याने गोखल्यांना त्याला विरोध करावा लागला.

## अफू व्यापार

गोखल्यांच्या काळापर्यंत भारतातील अफू व्यापार सुरु होऊन शतकाहून अधिक काळ लोटला होता. गंगेच्या खोऱ्यात आणि माळव्यामध्ये पिकणारी अफू चीनला निर्यात होत असे आणि त्या व्यापारातून ब्रिटीश कंपन्या, त्यांचे भारतीय दलाल आणि ब्रिटीश सरकार यांना मोठे उत्पन्न मिळत असे. देशातून निर्यात होणाऱ्या प्रमुख चार गोष्टींमध्ये अफू चा समावेश होता. या व्यापारामुळे ब्रिटन व चीन मध्ये दोन युद्धे झाली होती आणि त्यांची परिणती हाँगकाँगवर ब्रिटीशांनी कब्जा मिळविण्यात झाली होती. पण नंतरच्या काळात ब्रिटनमध्ये अफूविरोधी आंदोलनामुळे तणाव वाढल्यावर १८९३ मध्ये एक शाही आयोग नेमण्यात येऊन त्याला अफू बंदी करावी किंवा कसे यावर अहवाल देण्यास सांगण्यात आले होते. तो अहवाल १८९५ मध्ये सादर करण्यात आला आणि त्यामध्ये अफूबंदीच्या विरोधात निष्कर्ष दिले गेले. म्हणजे व्यापार समर्थकांचा एका प्रकारे या आयोगामुळे विजय झाला. कररूपी उत्पन्न बुडेल या कारणास्तव तत्कालीन कॉन्ग्रेस पुढाऱ्यांपैकी काहींनी अफूबंदीला पाठिंबा दिला नाही. 'भारतातील आर्थिक राष्ट्रवादाचा उदय आणि वाढ' (१९६६)या ग्रंथात विपन चंद्र यांनी हे नोंदविले आहे. दादाभाई नवरोजींच्या मते अफूबंदीपेक्षा महत्त्वाचे विषय सरकारपुढे होते. ब्रिटनमधील ख्रिश्चनधर्मीय आणि क्केकर पंथीय हे मात्र अफूला आणि अफूच्या व्यापाराला तीव्र

विरोध करीत होते. ख्रिस्ती धर्माला आणि नीतिमत्तेला अफूचा व्यापार हा कलंक आहे, असे त्यांचे म्हणणे होते.

अफूव्यापारातील अनिश्चितता चीनच्या देशांतर्गत अफू लागवडीमुळे वाढू लागली होती. म्हणून अफू राखीव निधी निर्माण करून दरवर्षी त्यात काही रक्कम टाकून जेव्हा जेव्हा अफू व्यापारात मंदी येईल, तेव्हा या निधीमधून पैसे काढून अंदाजपत्रकातील तूट भरून काढता येईल अशी कल्पना होती.

गोखल्यांचा अर्थातच अफूसेवन आणि अफू व्यापार या दोहोंनाही विरोध होता. हा पैसा चीन मधून येत असला तरी तो मानवतेला कलंक आहे, असे त्यांचे मत होते. या पैशाचा विनियोग शिक्षण, आरोग्यसुविधा आणि वैद्यकीय उपचारांसाठी व्हावा अशी सूचना त्यांनी केली होती.

## प्रशासकीय सेवांमधील भारतीयांचे प्रमाण आणि प्रतिनिधित्व

१८५७ च्या उठावानंतर ब्रिटीशांनी असे आश्वासन राणीच्या जाहिरनाम्याद्वारे दिले होते की भारतातील प्रजेला दुजाभावाची वागणूक दिली जाणार नाही. प्रत्यक्षात मात्र ब्रिटीशांना भारतीय कर्मचाऱ्यांबद्दल भरवसा वाटत नसे. कंपनी सरकार कडून कारभार राणी सरकारकडे आल्यानंतर प्रशिक्षित अधिकाऱ्यांची फळी तयार करण्यासाठी भारतीय नागरी सेवा (Indian Civil Service) ही सरकारने सुरु केली होती. स्पर्धा परीक्षा घेऊन त्यामध्ये हुशार ब्रिटीश तरुणांना भरती केले जाई व त्यांना भारतात उमेदवारी केल्यानंतर मोठे अधिकार आणि जबाबदाऱ्या दिल्या जात. या अधिकाऱ्यांना प्रशासकीय आणि न्यायदानाचे अधिकार असत. भारतीय नागरी सेवेतील सुमारे एक हजार अधिकारी तीस कोटी भारतीयांवर ब्रिटीशांची हुकमत गाजवत असत. याशिवाय त्यांचे विश्वासू सहकारी हेदेखील ब्रिटीश असत. त्यांच्या हाताखाली भारतीय लोकांना कारकुनीसारखी कामे दिली जात. हाताच्या बोटांवर मोजण्याइतके भारतीय हे उच्च पदावरचे अधिकारी म्हणून काम करीत असत.

गोखल्यांचा दृष्टिकोन दूरदर्शी होता. भारताचा कारभार हा ब्रिटीश साम्राज्यातील एक जबाबदार प्रशासन म्हणून चालवायचा असेल तर इथल्या जनतेच्या हिताचे निर्णय झाले पाहिजेत आणि त्यांची अंमलबजावणी देखील तत्परतेने झाली पाहिजे. या दोन्ही गोष्टी साधायच्या असतील तर राज्य शासनाच्या सर्व पातळ्यांवर भारतीयांचा सहभाग हा वाढला पाहिजे. त्या अनुभवातून शिकून तयार झालेल्या पिढ्या भारताचा विकास घडवून आणतील, असा त्यांना विश्वास वाटत होता.

१९०५ मधील बंगालच्या फाळणीनंतर ब्रिटीशांची दडपशाही वाढली होती आणि जहाल गटाचा असंतोष पसरत होता. त्यावेळेस गोखल्यांनी स्पष्टपणे असे म्हटले की राणीच्या जाहीरनाम्यात दिलेले समान वागणुकीचे वचन हे केवळ कविकल्पना बनून राहिले आहे आणि त्याचे परिणाम घातक होणार आहेत. '' शासकीय नोकऱ्या हा काही आमच्या तरुण पिढीच्या व्यावसायिक यशाचा तुरा नाही, तर जोपर्यंत तुम्ही आम्हाला विश्वास आणि जबाबदारीच्या सर्व पदांपासून वंचित ठेवत आहात, तोवर आम्हाला तुम्ही कमी लेखून तुमच्यापुढे मान तुकवायला सांगता आहात आणि हा आमच्या राष्ट्रीय सन्मानाचा आणि स्वाभिमानाचा प्रश्न आहे. आमची पुढची वाटचाल या प्रश्नाची योग्य उकल होण्यावर अवलंबून आहे.''

या सातत्याने मांडलेल्या मुद्द्याचा परिणाम काही प्रमाणात पुढच्या काळात दिसून आला आणि स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळेस भारतीय नागरी सेवेतील एक तृतीयांश पदे ही भारतीयांकडे होती. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना या अधिकाऱ्यांच्या ब्रिटीशधार्जिणे वागण्याचा राग येत असे. भारतीय नागरी सेवेबद्दल ते म्हणत, ''ही भारतीय नाही, नागरी पण नाही आणि सेवा तर त्याहूनही नाही.'' परंतु या सेवेतील चिंतामणी द्वारकानाथ (सी. डी.) देशमुख आणि के.पी.एस. मेनन या अधिकाऱ्यांना आपल्या पहिल्या मंत्रिमंडळातील महत्त्वाची पदे देऊन नेहरूंनी या अधिकाऱ्यांच्या अनुभवाची आणि कर्तबगारीची पावती दिली, असे म्हणता येईल. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच फाळणीच्या अग्निदिव्यातून देशाला जावे लागले. त्या

वेळेसही आपली प्रशासन व्यवस्था तग धरून राहिली आणि तिने समर्थपणे प्रशासनाची घडी बसविण्याचे आव्हान पेलले. सरदार पटेल यांनी ''ही प्रशासक मंडळी नसती तर सगळी व्यवस्था कोलमडून पडली असती'' असे मोकळेपणे मान्य केले होते.

लष्करातील पदांबाबतही गोखल्यांचा हाच दृष्टिकोन होता. अर्थात त्यांचा मुख्य भर हा हिंदुस्तानच्या पैशांनी ब्रिटीशांनी आपले लष्कर पोसावे, या बाबीला विरोध करण्यावर होता. हिंदुस्तानच्या संरक्षण गरजांपुरते लागेल त्यापेक्षा पुष्कळ जास्त प्रमाणात ब्रिटीशांनी लष्कर वाढविले होते. हा वाढीव खर्च ब्रिटनने उचलावा, असा गोखल्यांचा आग्रह असे. त्याच्या जोडीला भारतीयांना वरची पदे दिल्यास खर्चात बचत होईल, असे त्यांचे मत होते. पण मुळात ब्रिटीशांना भारतीयांचा भरवसा वाटत नसे आणि तेथेच घोडे अडले होते. वरिष्ठ पदे नाकारण्याच्या धोरणामुळे हा परस्पर अविश्वास कमी न होता वाढत होता, असे गोखल्यांनी वारंवार निदर्शनास आणले होते.

पाश्चात्यांशी संपर्क आल्यानंतर जपानने चाळीस वर्षात जी प्रगती केली त्यापेक्षा खूप आधी ब्रिटीशांशी संबंध येऊन सुद्धा हिंदुस्तान जपानपेक्षा कितीतरी पिछाडीवर पडला आहे. याचे गोखल्यांच्या मते मुख्य कारण म्हणजे इतकी वर्षे ''आम्ही मात्र लाकडे फोडत आणि पाणी शेंदत बसलो आहोत.''

## संसदीय मूल्ये

विसावे शतक सुरु झाले तेव्हा हिंदुस्तानातील ब्रिटीश सत्ता उलथून टाकावी अशी काँग्रेसची अधिकृत भूमिका नव्हती. ब्रिटीश साम्राज्यांतर्गत राहून अधिकाधिक स्वायत्तता मिळवून राज्य कारभार आपल्या हातात यावा, अशी काँग्रेसची मागणी होती. पहिले महायुद्ध झाल्यानंतर एक तपाने म्हणजे १९२९मध्ये काँग्रेसने पूर्ण स्वराज्याची मागणी केली. त्यानंतर आणखी एका तपाने ब्रिटीशांना ''चले जाव'' असे बजावण्यात आले. हा कालक्रम हे दर्शवितो की लोकांची आपल्या हक्कांबद्दल जागृती एका बाजूला होत होती तर दुसऱ्या बाजूला इतिहासाची लोकशाहीच्या दिशेने पडणारी पाऊले ब्रिटीशांच्या

नजरेला दिसत नव्हती. त्यामुळे जनतेचा ब्रिटीश राजवटी बरोबरचा आपल्या हक्कांबद्दलचा संघर्ष अधिक तीव्र होत होता.

गोखल्यांच्या कायदेमंडळातील भाषणांतून जनतेच्या मागण्या एका बाजूस आणि त्याउलट साम्राज्यवादी शोषण हा अंतर्विरोध आपल्याला जाणवतो. गोखले स्पष्टपणे आणि निर्भीडपणे आपली मते मांडत. सरकारी धोरणांच्या मर्मावर ते नेमकेपणाने बोट ठेवत. गोखले मवाळ पक्षाचे होते म्हणजे ते लोकांचे प्रश्न मांडायला कचरत, असे नव्हते, तर सभ्यपणाची मर्यादा न सोडता पण अत्यंत स्पष्टपणे ते बोलत असत. देशातील पोलीस यंत्रणेबद्दल बोलताना पोलिसांना विवेक आणि ममता या दोहोंचे वावडे आहे, असे सुनवायला त्यांनी कमी केले नाही. त्याचबरोबर धोरणातील दोष आणि त्रुटी दूर कशा करावयाच्या याबद्दल दिशा, उपाय आणि योजना याचे स्पष्ट विवेचन गोखले करताना आपल्याला दिसतात, हे शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणावर त्यांनी सुचविलेल्या योजनांवरून आपल्या लक्षात येते.

हा विधायक दृष्टिकोन गोखल्यांनी बाणवला, याचे एक कारण म्हणजे जगातील इतर देशांत काय प्रगती चालू आहे याकडे ते बारकाईने लक्ष देत असत. शिक्षणावर इतर देशांत किती खर्च होतो याची आकडेवारी गोळा करून तिचा ते उपयोग आपल्या युक्तिवादात करीत असत. आपल्या देशाची स्थिती सुधारली पाहिजे तर भौतिक पातळीवर आपण तंत्रज्ञान अवगत केले पाहिजे आणि शासनाची आधुनिक लोकशाही व्यवस्था आपण अंगिकारली पाहिजे, हे त्यांना पटले होते. हे काम करण्यासाठी नारेबाजी उपयोगाची नाही, तर शिक्षण, प्रयोग आणि अनुभव यामधून आपण पुढे जाऊ शकू, अशी त्यांची धारणा होती. म्हणून बोलायचे ते साधार असा त्यांचा दंडक होता.

ब्रिटीशांबद्दल त्यांचा दृष्टिकोनही असाच होता. आपल्याला त्यांच्याकडून घेण्यासारख्या बऱ्याच गोष्टी असल्या तरी आपण कोणत्याही तऱ्हेने कनिष्ठ नाही, अशी त्यांची भूमिका होती. भारतीयांमध्ये ती क्षमता आहे आणि तिचा वापर करून आपण स्वतःची प्रगती साधली पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. ब्रिटीश सत्ता उलथून टाकण्याची

इष्टता त्यांना वाटत नव्हती आणि तत्कालीन कॉन्ग्रेस धोरणाशी ही भूमिका सुसंगत होती. ज्याप्रमाणे साम्राज्यातील ऑस्ट्रेलिया आदी देशांना स्वायत्त शासनव्यवस्था मिळाली होती, तशा स्वायत्ततेकडे वाटचाल करण्याचे त्याकाळचे उद्दिष्ट होते. ही प्रगती साधण्यासाठी आपण शिक्षणाद्वारे आपली क्षमता वाढविली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. म्हणून कित्येक वेळा गोखल्यांच्या विचारसरणीला राजकीय वास्तववाद असे म्हटले जाते.

त्यांच्या विविध विषयांवरील भाषणांचा अभ्यास केल्यावर जाणवतो, तो त्यांचा दूरदर्शी विचार. समस्या तात्कालिक असल्या तरी आपले उद्दिष्ट हे देशातील जनतेचे सर्वांगीण उत्थान हे असले पाहिजे असे त्यांना वाटे आणि म्हणून ते तात्कालिक उपाय योजनेवर कधी समाधानी नसत. प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरताना ते तांत्रिक शिक्षणाला देखील निधी मिळाला पाहिजे असे म्हणत. कारण येणारे युग हे उद्योग आणि तंत्रज्ञानावर आधारित असणार आहे हे त्यांना उमगले होते. शिक्षण, आरोग्य आणि स्वास्थ्य सुविधा यामधील गुंतवणूक एका वर्षात होणार नसल्याने त्यांचा पाच वर्षांचा आराखडा तयार करावा लागेल हे त्यांनी मांडले होते. लोकहितासाठी ही दूरदृष्टी आवश्यक असते हे त्यांना चांगले अवगत होते.

देशहितासाठी आवश्यक असणारा स्पष्टवक्तेपणा, विधायक दृष्टिकोन, राजकीय वास्तववाद, भारतीयांच्या क्षमतेबद्दल (आत्म-)विश्वास आणि दूरदृष्टी या गोष्टींचा समन्वय आपल्याला गोखल्यांच्या संसदीय कारकीर्दीमध्ये दिसून येतो.

◆◆◆

# ४ राजकीय नेतृत्व

''मला राजकारणात आध्यात्मिकता आणावयाची आहे'' असे गोखले म्हणत असत. ते रूढार्थाने धार्मिकही नव्हते आणि योगाभ्यास सोडला तर ते पारंपरिक दृष्ट्या आध्यात्मिकही नव्हते. म्हणून त्यांचे हे विधान थोडे अधिक खोलात जाऊन पाहिले पाहिजे.

गोखल्यांच्या राजकारणाचे तीन पैलू होते : पहिला म्हणजे ब्रिटीश सत्ताधाऱ्यांबरोबरचा संघर्ष. दुसरा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस मधील जहाल गटाबरोबरचा धोरणात्मक संघर्ष आणि तिसरा म्हणजे परदेशस्थ भारतीयांच्या हक्कासंबंधीचा संघर्ष. त्यांनी जे राजकारण केले ते सारे काँग्रेसच्या माध्यमातून. वक्तृत्व आणि लेखन ही त्यांची वैचारिक साधने होती.

## ब्रिटीशांशी संबंधित राजकारण

१९०५ मधील लॉर्ड कर्झन यांनी केलेली बंगालची फाळणी हा गोखल्यांच्या संघर्षाचा पहिला टप्पा होता . फाळणीपूर्व बंगाल हा अवाढव्य प्रांत असल्याचे सांगून त्याचे प्रशासन सुयोग्य रीतीने करण्यासाठी ही फाळणी आवश्यक असल्याचे कर्झन यांचे म्हणणे होते. पूर्व बंगाल मध्ये बंगाली व आसामी भाषिक प्रदेश होता तर पश्चिम बंगाल मध्ये बिहार, ओडिशा सह बंगाली भाषिक प्रदेश होता. काँग्रेसच्या स्थापनेनंतर ब्रिटीशांनी हिंदू आणि मुस्लिम अस्मिता यांच्या वेगळेपणाला खतपाणी घालण्याचे धोरण अवलंबिले होते. पूर्व - पश्चिम बंगाल च्या फाळणीच्या पोटात पूर्वेकडील मुस्लिमबहुल प्रदेशाला आपल्यावर हिंदू करीत असलेल्या 'अन्यायाची' जाणीव करून देणे हा डाव होता. त्यातून पुढे काँग्रेसचा ब्रिटीश-विरोध बोथट करून टाकायचा, ही धूर्त रणनीती कर्झन प्रभृती राज्यकर्त्यांच्या मनात होती. हिंदू अधिक शिक्षित आणि आर्थिक दृष्ट्या संपन्न आहेत आणि ते मुस्लिमांच्या संधी हिरावून घेत आहेत, असा

समज ब्रिटीश राज्यकर्ते धूर्तपणे पसरवीत होते. वेगळे राज्य झाल्याने मुस्लिमांना आपले हक्क रक्षण करण्याची चांगली सोय उपलब्ध होईल असे भासविले जाई . चार दशकांनंतर झालेल्या हिंदुस्तानच्या फाळणीची बीजे १९०५ साली बंगाल मध्ये पेरली जात होती.

बंगालच्या फाळणीला प्रचंड विरोध करण्यात आला. काँग्रेसने फाळणीविरोधात आंदोलन सुरु केले आणि त्यात प्रथमच सर्व थरांतील लोक सामील झाले. 'स्वदेशी' चा पुकार होऊन ब्रिटीश मालावर बहिष्कार घालण्यात आला. सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रातील लोकही आंदोलनात उतरले. कालांतराने १९११ मध्ये ही फाळणी रद्द होऊन बंगालचे एकीकरण झाले.

डिसेंबर १९०५ मध्ये झालेल्या काँग्रेस अधिवेशनात केलेल्या अध्यक्षीय भाषणात गोखल्यांनी फाळणीचा धिक्कार केला. प्रशासकीय सोयीसाठी फाळणी करायची होती तर बिहार, ओडिशा आणि छोटा नागपूर (सध्याचे झारखंड) हे वेगळे काढून बंगाल एकत्र ठेवता आला असता, असे गोखल्यांनी प्रतिपादन केले. कुठल्याच विरोधाला न जुमानणारा लॉर्ड कर्झन जर भारतीय जनतेला 'मुकी बिचारी गुरे ढोरे' समजत असेल तर या राजवटीबरोबर सहकार्य करण्याची आशा पुरती मावळली, असे समजा, हेही गोखल्यांनी भाषणात सुनावले. जवळपास शतक उलटल्यावरही जर अशी परिस्थिती असेल तर यापेक्षा ब्रिटीश राजवटीचे आणखी काय वाभाडे काढायचे असे त्यांनी विचारले. एरवी सौम्य वाटणाऱ्या गोखल्यांनी नेमक्या शब्दात फाळणीवर बोचरी टीका केली हे विशेष.

पुढे १९११ मध्ये बंगालची फाळणी रद्द होऊन भाषिक तत्त्वावर बंगाल आणि आसाम वेगळे झाले आणि बिहार-ओडिशा हे तिसरे राज्य झाले. पण १९०५ च्या वंगभंगाचे भारतीय राजकारणावर दूरगामी परिणाम झाले. गोखल्यांच्या दूरदृष्टीने ते असे टिपले –

'सगळ्यांच्या वाट्याला आलेल्या एकाच अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी कोणत्याही बाह्य दडपणाशिवाय जातीपाती पलीकडे जाऊन भारतीय समाजातील सर्व भाग एकाच प्रेरणेने एकवटल्याचे ब्रिटीश राजवट सुरु झाल्यापासूनचे हे पहिलेच उदाहरण

असेल. खऱ्याखुऱ्या राष्ट्रीयत्वाची जाणीव एका लाटेसारखी देशभर पसरली आहे आणि निदान काही काळासाठी तिच्या जोरामुळे जुने बांध कोसळत आहेत, व्यक्तिगत हेवेदावे नाहीसे होत आहेत आणि इतर तंटे थंडावले आहेत.'

## धोरणात्मक संघर्ष: जहाल विरुद्ध मवाळ

या पार्श्वभूमीवर काँग्रेसने स्वदेशी चळवळ सुरु केली. विदेशी मालावरील बहिष्कार हा त्या चळवळीचा भाग बनू पाहत होता. गोखले दोहोत फरक करीत असत. 'स्वदेशी चळवळीमुळे लोक आपल्या देशाचा विचार करू लागतात. देशासाठी काही तरी त्याग करावा अशी भावना लोकांत वाढीस लागते आणि ते आपल्या देशाचा आर्थिक विकास कशामुळे होईल, याचा साधक बाधक विचार करण्यास प्रवृत्त होतात. देशहितासाठी परस्पर सहकार्य करण्याचा मोठा धडा ते यामुळे शिकू लागतात,' असे गोखल्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले. बहिष्कार हा त्यांच्या दृष्टीने एक नकारात्मक पवित्रा होता, ज्यातून फारसे काही साध्य होणार नव्हते.

१९०७ च्या सुरत काँग्रेस अधिवेशनात जहाल विरुद्ध मवाळ हा संघर्ष शिगेला पोचला आणि त्याची परिणती जहाल गट काँग्रेस मधून बाहेर पडण्यात झाली. अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल आणि टिळक हे जहाल गटाचे नेते होते. फेरोजशा मेहता, दिनशा वाच्छा आणि गोखले हे मवाळ गटाचे धुरीण होते. सनदशीर मार्गाने फार काही साध्य होत नाही म्हणून स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या साधनांचा जोरदार पुरस्कार करायचा, जेणेकरून ब्रिटीश सरकार जेरीस आले पाहिजे, हा जहाल गटाचा दृष्टिकोन होता. बंगालच्या फाळणीमुळे १९०५नंतर जो प्रचंड असंतोष उसळला होता, त्यामुळे जहाल गटाला पाठिंबा मिळत होता. पण काँग्रेसचे उद्दिष्ट जे 'स्वराज' होते, त्याच्याशी ही साधने सुसंगत असली पाहिजेत असे मवाळ गटाचे मत होते. सुरत अधिवेशनातील अभूतपूर्व गोंधळाकडे न वळता आपण त्यातील ठरावांच्या आधारे या जहाल-मवाळ संघर्षाकडे पाहू या. या ठरावांचे मसुदे गोखल्यांनी तयार केले होते.

जहाल गटाला हवे असलेले ‘स्वराज‘ म्हणजे स्वातंत्र्य अभिप्रेत होते. १९०६च्या कलकत्ता अधिवेशनात संमत झालेल्या ठरावात ’ ब्रिटीश साम्राज्यातील इतर स्वयंशासित वसाहतींच्या धर्तीवरील स्वयंशासन ’ असा उल्लेख करण्यात आला होता. जहाल गटाने हा अर्थ कलकत्ता अधिवेशनात मान्य केला होता. सुरतच्या अधिवेशनावेळी काँग्रेसच्या घटनेचा मसुदा प्रसृत करण्यात आला. त्यामध्ये असे नमूद केले होते की – काँग्रेसचे अंतिम ध्येय हे ब्रिटीश साम्राज्यातील इतर सदस्यांसारखे स्वयंशासन प्राप्त करून घेणे आणि त्यांच्याप्रमाणे साम्राज्यातील अधिकार आणि जबाबदारी मिळविणे हे आहे. ‘इतर स्वयंशासित वसाहती ‘ मधील स्वयंशासित हा शब्द गाळून टाकण्याला जहालांचा आक्षेप होता. अर्थात कलकत्ता अधिवेशनातील मूळ ठराव हा सुरत अधिवेशनात ठेवलेला होताच.

स्वदेशीबद्दल सुरत मसुद्यात बदल हा होता की ‘लोकांनी झळ सोसून स्वदेशी मालाचा अंगीकार करावा‘ हे कलकत्ता ठरावातले विधान बदलून तेथे ‘शक्य असेल तेथे स्वदेशी मालास पसंती द्यावी ‘ असे सुचविले होते. जहाल गटाच्या मते आदेशाची जागा आवाहनाने घेतली होती. बहिष्काराच्या मुद्द्यावर केवळ ‘चळवळ‘ हा शब्द गाळल्याबद्दल मवाळ हे रोषास पात्र झाले.

राष्ट्रीय शिक्षणाबद्दलचा कलकत्ता अधिवेशनातील ठराव असा होता :

‘या काँग्रेसचे मत असे आहे की देशभरातील लोकांनी मुलामुलींच्या राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न गांभीर्याने घेण्याची वेळ आलेली आहे आणि त्यासाठी देशाच्या गरजांशी सुसंगत अशा साहित्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या शिक्षणाची राष्ट्रीय स्तरावर आणि राष्ट्रीय नियंत्रण असलेली व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे.‘

सुरतच्या ठरावात ’राष्ट्रीय स्तरावर आणि राष्ट्रीय नियंत्रण असलेली ’ या शब्दांऐवजी ‘स्वतंत्र ‘ हा एकच शब्द वापरला होता. जहाल गटाच्या मते नियंत्रण हा या ठरावाचा गाभा होता आणि नेमका तोच गाळण्यात आला होता.

आज या जहाल –मवाळ संघर्षाकडे पाहताना असे जाणवते की जहाल गटाला

काँग्रेसची सूत्रे आपल्या हातात घेऊन ब्रिटीश सत्तेपुढे आव्हान निर्माण करायचे होते. सुरत काँग्रेसच्या वेळेस अध्यक्ष निवड व ठरावांचे मसुदे यावरून निर्माण झालेले वाद हे जहाल गटाचे डावपेच होते. मवाळ गटाला हे माहित होते की कुठलेही अतिरेकी पाऊल उचलले की ब्रिटीश राज्य यंत्रणा ते तात्काळ दडपून टाकण्यास तयार होती. 'अर्ज-विनंत्या-निषेध' अशी मवाळ राजकारणाची हेटाळणी त्यांनी सहन केली. काँग्रेस हे एक असे संघटनात्मक साधन होते की दोन दशकांच्या अस्तित्वानंतर तिला एक सार्वत्रिक मान्यता मिळाली होती आणि काँग्रेसच्या मताला झुगारून देणे सरकारला सोपे नव्हते. म्हणून गोखल्यांचा सारा भर हा जहाल आणि मवाळ यांच्यातील संघर्ष टोकाला जाऊ नये यावर होता. फूट पडल्यास सरकार दोन्ही गटांना सहजगत्या निष्प्रभ करू शकेल असा त्यांचा होरा होता. झालेही तसेच, कारण फूट पडल्यानंतर पुढल्याच वर्षी १९०८ मध्ये टिळकांना अटक होऊन त्यांची मंडाले येथे रवानगी करण्यात आली. दुसरे जहाल नेते बाबू अरविंद घोष यांनाही अटक करण्यात आली.

या संघर्षादरम्यान गोखल्यांची जहाल गटाकडून भरपूर निंदा नालस्ती करण्यात आली. त्याचा मनस्ताप सहन करताना त्यांची भूमिका अशी होती :'त्यांना मला काय अप्रामाणिक , भित्रा किंवा आणखी काय म्हणायचे ते म्हणू दे. माझ्या देशावर माझे प्रेम आहे, म्हणून मी माझे काम करतो आणि मला ते करण्याच्या इतक्या संधी मिळतात यातच सारे काही पावले. सार्वजनिक आयुष्यात काम करण्याचे हेच भक्कम अधिष्ठान आहे. इतर कशाचा आधार घेणे म्हणजे वाळूच्या पायावर बांधकाम करण्यासारखे आहे.'

तत्कालीन राजकारणाचा विचार करताना आज आपण हे पाहू शकतो की काळाच्या ओघात ब्रिटीश सत्तेशी संघर्ष करताना मवाळ आणि जहाल हे दोन्ही विचारप्रवाह निर्माण होणे अपरिहार्य होते. सनदशीर मार्गाचा आग्रह धरीत गेल्याने आधुनिक भारत हा कायद्याचे राज्य या संकल्पनेनुसार घडत गेला आणि जन-आंदोलन या मार्गांचा अवलंब केल्याने लोकांमध्ये जागृती होऊन लोकशाही हक्कांची जाणीव वाढत गेली. या

दोन्ही प्रवाहांचा जोर कायम आणि तुल्यबळ राहिला तर लोकशाही सशक्त होते. जहाल आणि मवाळ गटांची बलस्थाने हेरून त्यांचा मेळ घालण्याचे अपूर्व काम हे महात्मा गांधींनी केले. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्याला व्यापक लोक सहभाग मिळाला, परंतु तत्त्वांची चौकट मजबूत राहिल्याने अराजकाची परिस्थिती स्वातंत्र्याच्या पूर्वीही निर्माण झाली नाही आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही अराजक टाळले गेले. अशीच तुलना आपण शेजारी देशांशी केली तर असे दिसते की स्वातंत्र्य मिळविताना आणि नंतर ज्यांनी लोकशाही मूल्यांचा विधिनिषेध बाळगला नाही, त्या त्या देशामध्ये तीव्र आणि जीवघेणी सत्तास्पर्धा पेटल्याने अराजकसदृश परिस्थिती निर्माण होऊन बऱ्याचदा लष्करी क्रांती झाली आहे.

गोखले जेव्हा 'मला राजकारणात आध्यात्मिकता आणायची आहे' असे म्हणत, तेव्हा नीतिमूल्यांना पायदळी तुडवून सत्ता काबीज करणे या गोष्टीला त्यांच्या लेखी थारा नव्हताच; पण विरोधकांशी सामना करताना सुद्धा नीतिमूल्ये जपली पाहिजेत, हा आग्रह होता. परमताचा आदर हा लोकशाहीचा महत्त्वाचा भाग आहे. १९०५च्या वंगभंगाच्या आंदोलनानंतर तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात जहाल विचारसरणीकडे आकृष्ट होऊ लागल्यावर गोखल्यांनी मवाळ मताचा पुरस्कार करणे आरंभिले. अलाहाबाद येथे फेब्रु १९०७ मध्ये त्यांनी एका भाषणात मवाळ भूमिका विस्ताराने विशद केली. ब्रिटीश साम्राज्यात राहून स्वायत्तता मिळविणे शक्य का आहे हे स्पष्ट करीत असताना त्यांनी सांगितले की जरी ब्रिटीश राज्यकर्ते बऱ्याच वेळा काँग्रेसच्या मागण्यांना धुडकावून लावत असले, तरी ब्रिटीश लोकशाही राजकीय स्वातंत्र्य आणि नागरी हक्कांच्या बाजूने उभी राहिल्याचा इतिहास आहे. सनदशीर मार्गाने काही मिळाले नाही, असे जहाल गट मानतो. पण केवळ अर्ज विनंत्या म्हणजे सनदशीर मार्ग असे नसून त्यामध्ये असहकार, करभरणा थांबविणे या सारख्या मार्गांचाही समावेश होतो. अशा तऱ्हेने जो लढा देणे शक्य आहे, त्याचा एक सहस्रांश देखील विरोध आपण अजून केलेला नाही. त्यामुळे सनदशीर मार्ग कुचकामी आहे हे आताच म्हणणे चुकीचे आहे. 'आपल्या हक्कांसाठी

झगडावे लागते, ते आपण अजून केलेलेच नाही' असे गोखल्यांचे मत होते. समाजाच्या विविध घटकांना आपण एकत्र आणू शकलेलो नाही, हिंदू मुस्लिम यांच्यातली दरी मिटवू शकलेलो नाही आणि महत्त्वाचे म्हणजे जात-पात-प्रांत-प्रदेश याच्या पलीकडे जाणारा एक देश म्हणून विचार आपण अजूनही करीत नाही. उच्च दर्जाची नीतिमत्ता आणि शिस्त अंगी बाणवणे हे आपल्याला तितकेच आवश्यक आहे. ब्रिटीश राज्यकर्ते उद्दाम किंवा उदासीन असतीलही, पण ब्रिटीश राजकीय पक्षांना भारतातल्या जनमताला किंमत द्यावीच लागते. त्या आघाडीवरही काम केले पाहिजे. स्वदेशी पाहिजे आणि स्वतंत्र शिक्षणसुद्धा पाहिजे. पण म्हणून एकदम परदेशी मालावर बहिष्कार आणि सरकारी शाळाकॉलेजांवर बहिष्कार घातल्याने काय होईल? आपले स्वतःचे उद्योग आणि स्वतःच्या शिक्षणसंस्था उभारायला बराच काळ लागतो. ते न करता बहिष्कार घालणे आत्मघातकी ठरेल, अशी गोखल्यांची व्यवहार्य धारणा होती. स्थानिक स्वराज्य संस्था आणि कायदेमंडळे यांच्यावरील बहिष्कारही असाच निरर्थक ठरणार होता. त्याऐवजी हातात असलेले अधिकार न सोडता ते वापरून आणखी अधिकार संपादन करणे हा अधिक श्रेयस्कर मार्ग होता. कारण मिळालेले अधिकारही काही सुखासुखी मिळालेले नव्हते.

नेमस्त धोरणाचा पुरस्कार आणि जहाल मताचा प्रतिवाद गोखले दमदारपणे परंतु सौम्य शैलीत करीत. हे उत्तर हिंदुस्तानातील अभिजन आणि विद्यार्थी वर्गाला भावत होते. विशेषतः मुस्लिमांतील शिक्षित वर्गाला व्यक्ती आणि राजकारणी या दोन्ही बाबतीत गोखल्यांचे आकर्षण वाटे. कदाचित यामुळेच पुढे महंमद अली जिनांनी असे उद्गार काढले की ''मला मुस्लिमांतील गोखले व्हावयाचे आहे''. गोखल्यांच्या चरित्रकारांनी त्यांच्या शैलीची तीन वैशिष्ट्ये सांगितली आहेत: वास्तवाचा परखड आढावा, विकारांना थारा न देणारा युक्तिवाद आणि माफक आशावाद. त्यांनी आपल्या देशाच्या हलाखीसाठी ब्रिटीशांनाच केवळ जबाबदार धरले नाही. ही हलाखी दूर करण्यासाठी कुठलाही साधा सोपा उपाय चालणार नाही हे ते ओळखून होते. परिस्थितीत

अनेक राजकीय, सामाजिक आणि आर्थिक घटक एकमेकांत मिसळून कमालीची गुंतागुंत झालेली होती. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने व्यावहारिकता हा सिद्धांतापेक्षा मोठा घटक बनला होता. ''ब्रिटीश राज्यकर्ते कधीही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाला मान्यता देणार नाहीत, हे माहित असून तुम्ही पुनःपुन्हा तो ठराव का मांडता'' असे विचारल्यावर गोखल्यांनी असे उत्तर दिले होते की ''आमच्या पिढीच्या वाट्याला अपयश येणार आहे, पण त्याचमुळे येणाऱ्या पिढ्यांना यश लाभू शकेल. त्यासाठी आम्हाला हे अपेक्षाभंग भोगणे आवश्यक आहे.''

गोखल्यांच्या वाट्याला आलेले अपेक्षाभंग अजिबात कमी नव्हते. १९०७ मध्ये पाणीपट्टीत वाढ झाल्याने पंजाबमधील शेतकऱ्यांनी आंदोलन केले आणि त्याला राष्ट्र द्रोहाचा शिक्का मारून लाला लजपतराय यांची रवानगी मंडालेला करण्यात आली. या आंदोलनापूर्वी गोखल्यांनी पंजाबचा दौरा केला असल्याने त्यांनी अप्रत्यक्ष चिथावणी दिली असल्याचा ग्रह ब्रिटीश राज्यकर्त्यांनी करून घेतला. 'वागायला साधे पण अत्यंत धूर्त राजकारणी' अशी त्यांची प्रतिमा बनवण्यात आली. राजद्रोही सभा प्रतिबंध विधेयक घाईघाईने आणण्यात आले. गोखल्यांनी या विधेयकाची चिरफाड करताना सांगितले की ''जो कोणी भारतीय श्वास रोखून आणि सगळी विनम्रता ओठात आणून बोलत नाही, तो तो आमच्या सनदी अधिकाऱ्यांना राजद्रोही वाटतो. काही अधिकाऱ्यांच्या लेखी त्यांच्या कारवाईबद्दल प्रतिकूल मत देणे, प्रशासनावर टीका करणे आणि कोणतेही राजकीय आंदोलन करणे म्हणजे राजद्रोह आहे.'' तिन्ही भारतीय सदस्यांनी विरोधी मत नोंदवूनही हे विधेयक संमत करण्यात आले. वंगभंगानंतर देशभर तापत असलेल्या वातावरणाचा गैरफायदा राज्यकर्त्यांनी घेतला होता. (गोखल्यांनी लाला लजपतराय यांच्या सुटकेची मागणी करणारे पत्रक काढण्यात पुढाकार घेतला आणि कालांतराने लाला लजपतराय यांची सुटका करण्यात आली.)

या सर्व प्रकारांत ब्रिटीश विरोधाची धग विझल्यागत झाली. त्यातच काँग्रेसची डोकेदुखी वाढवणारी आणखी एक अंतर्गत धुसफूस सप्टेंबर १९०७ पासून सुरु झाली

होती. सुरत काँग्रेसमध्ये टिळकांना काँग्रेसचे अध्यक्षपद देण्याचा जहाल गटाने चंग बांधला होता. ब्रिटीश राज्यकर्त्यांना काँग्रेसमधील ही दुफळी पाहून आणखी हुरूप आला होता. टिळकांच्या एकूण डावपेचांचा अनुभव गोखल्यांना सार्वजनिक सभा टिळक -अनुयायांनी ज्या पद्धतीने ताब्यात घेतली, तेव्हापासून ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्ये झालेल्या वादंगापर्यंत आलेला होता. बऱ्याच उलाढाली होऊन काँग्रेस अधिवेशन सुरतेला घेण्याचे ठरले. जहाल गटाने लाला लजपतराय यांना अध्यक्षपदाचे उमेदवार करण्याचे ठरविले. पण ते तयार होईनात. अधिवेशनापूर्वीच जहाल गटाने सभा व बैठकांचा धडाका लावून नेमस्तांवर टीकेचा भडिमार सुरु केला होता. 'जोपर्यंत आपले बहुमत होत नाही, तोपर्यंत मवाळ गटाशी जुळवून घेऊ आणि मग काँग्रेसला आपल्या मताकडे वळवून घेऊ' अशी भूमिका टिळकांनी मांडली होती. प्रत्यक्षात त्यांचा गट मवाळ नेतृत्वावर हिरीरीने तुटून पडत होता. अधिवेशन सुरु होण्यास दोनच दिवस राहिले असताना ढाक्याच्या कलेक्टरवर जीवघेणा हल्ला करण्यात आला. त्याचे खापर मवाळ गटाने वातावरण तापविण्यास कारणीभूत असलेल्या जहाल गटावर फोडले. नेमस्त गटाचे उमेदवार रासबिहारी घोष हे नियोजित अध्यक्ष म्हणून स्वागत समितीत निश्चित झाले होते. अधिवेशन सुरु झाल्यानंतर त्यांचे नाव रीतसर सूचित होऊन त्याला अनुमोदन मिळणार, त्या वेळेस अभूतपूर्व गोंधळ सुरु झाला आणि सभा तहकूब करण्याची पाळी स्वागताध्यक्षावर आली. दुसऱ्या दिवशी सभा पुन्हा भरल्यावर सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी अध्यक्षपदाचे अनुमोदन पूर्ण केले. मोतीलाल नेहरू बोलण्यास उठणार, एवढ्यात पुन्हा गोंधळ सुरु झाला. टिळकांनी बोलण्याची परवानगी मागितली होती, ती नाकारल्यावर टिळक व्यासपीठावर आले. दोन्ही बाजूंनी घोषणा सुरु झाल्या. खुर्च्या उचलून फेकण्यात आल्या. जोडे भिरकावण्यात आले. त्यातले काही फेरोजशाह मेहता आणि सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांना लागले. सुरत काँग्रेस उधळली गेल्याला मवाळ गटाने टिळकांना जबाबदार धरले. टिळक मवाळ नेत्यांबरोबर समझोत्याला अनुकूल भूमिका घेत, पण त्यांचे अनुयायी मात्र मवाळ नेत्यांवर जाहीर सभांतून कडक टीका करीत.

टिळक आपल्या अनुयायांना ताब्यात ठेवू शकत नाहीत, असे चित्र निर्माण झाले. 'काहीही झाले तरी काँग्रेस फुटता कामा नये, ' अशीच टिळकांची भूमिका होती. देशातील राजकारणाचा दोन दशकांचा अनुभव घेतल्यावर टिळकांना वास्तवाचे भान नक्कीच होते. पण आपल्यामागे आलेल्या अनुयायांच्या उत्साहाला ते आवर घालू शकले नाहीत, हे त्यांच्याबरोबर असलेल्या लाला लजपत राय आणि बाबू अरविंद घोष यांनी कालांतराने नमूद केले.

एक राजकारणी म्हणून गोखल्यांची या घडामोडींबद्दलची भूमिका काळजीपूर्वक अभ्यासली पाहिजे. बेजबाबदार वक्तव्ये आणि अव्यवहार्य भूमिका यांच्या जोडीला आक्रस्ताळ्या कारवाया येत असतील तर काँग्रेसमध्ये फूट पडली तरी हरकत नाही; कारण अशा गटांबरोबर सनदशीर मार्गाने चालणे अशक्यच आहे, असे गोखल्यांचे मत झाले होते. टिळकांच्या राजीनाम्यानंतर आणि आपटे-आगरकर यांच्या अकाली निधनानंतरही डे.ए.सोसायटीची वाटचाल भरीवपणे चालविल्याचा दांडगा अनुभव गोखल्यांच्या गाठीशी होता. त्यामुळे कार्यकर्ते विचाराने एकसंध असतील तर नेमस्तपणे काम करीत आपल्या ध्येयाप्रत जाता येते, हा विश्वास त्यांच्या ठायी दृढ होता. काँग्रेस सारखी देशव्यापी संघटना चालविण्यासाठी देशभक्तीच्या जोडीला शिस्त आणि जबाबदारीची जाणीव या दोन गोष्टी अत्यावश्यक आहेत आणि नेमक्या त्याच गोष्टींचा आपल्या देशात अभाव आहे, असे ते म्हणत असत.

सुरतेला गोंधळ सुरु होत असताना टिळक व्यासपीठावर आले आणि त्यांच्या दिशेने काही मारा सुरु होणार, असे दिसताच गोखले टिळकांच्या पुढे जाऊन त्यांच्या बचावासाठी हात उंचावून उभे राहिले. या एकूणच प्रकाराने त्यांना कमालीच्या वेदना झाल्या. त्यांच्या स्वभावाला अनुसरून त्यांनी निष्कर्ष हाच काढला की आपल्या देशातील राष्ट्रीय चारित्र्य उंचावण्याची नितांत गरज सर्व क्षेत्रात आहे. फुटीमुळे ब्रिटीश नोकरशाहीच्या हातात कोलीत दिल्यासारखे होणार आहे, हे त्यांना चांगलेच ठाऊक होते. जहाल आणि मवाळ दोन्ही गटांना वाटेला लावणे त्यांना आता शक्य होणार होते.

सुरत काँग्रेसनंतर जहाल गटाच्या वृत्तपत्रांतून गोखल्यांवरची टीका-टिंगल-टवाळी अधिकच बोचरी झाली. गोखल्यांना त्याचा त्रास झाला तरी त्यांची भूमिकाही पक्की झाली होती. आजही राजकारणात येऊ इच्छिणाऱ्यांनी त्यांचे विचार गंभीरपणे मनन करावेत असे आहेत. या प्रकरणाच्या सुरवातीला उद्धृत केलेले त्यांचे उद्गार पुनरुक्तीचा दोष स्वीकारून येथे पुन्हा पाहू या.

''त्यांना मला अप्रामाणिक, भ्याड किंवा आणखी काय म्हणायचे ते म्हणू देत. मी काम करतो ते देशावर असलेल्या प्रेमापोटी आणि मला ज्या संधी मिळतात, त्यातच माझ्या कामाचे चीज झाले असे मी समजतो. या एकाच पायावर माणसाने सार्वजनिक जीवनात उतरण्याचा निर्धार करावा. इतर कोणत्याही गोष्टीसाठी सार्वजनिक जीवनात उतरणे म्हणजे वाळूच्या पायावर घर बांधण्यासारखे आहे.'' याच निश्चयाने ते काँग्रेसच्या पुनर्बांधणीच्या कामाला लागले. राज्य कारभारातील सहभाग वाढविण्याच्या मवाळ पक्षाच्या मागण्या जर मान्य झाल्या नाहीत, तर सुरतेतील पडझड जिव्हारी लागलेला जहाल पक्ष पुन्हा जोमाने सक्रिय होईल हे त्यांना चांगले ठाऊक होते.

ब्रिटनमधील उदारमतवादी लिबरल पक्षातील धुरीण आणि डे. ए.सोसायटीचे भूतपूर्व अध्यक्ष वेडरबर्न यांच्या सूचनेवरून गोखले १९०८मध्ये इंग्लंडला गेले. ब्रिटीश परराष्ट्रमंत्री मोर्ले यांच्याशी सुधारणांविषयी वाटाघाटी करून कायदेमंडळात विस्तार आणि प्रतिनिधित्व यांच्या बाबतीत सुधारणा घडवाव्या, हा या भेटीचा उद्देश होता. पण प्रत्येक वेळी गोखले परदेशात गेले की मायदेशात काही ना काही अनवस्था ओढवायची, असा जणू काही नियम असल्यागत घडामोडी व्हायच्या. यावेळेस मुझफ्फरपूर (बिहार) येथे बॉम्बस्फोटात एक ब्रिटीश महिला आणि तिची मुलगी यांचा मृत्यू झाला होता. बॉम्ब चे लक्ष्य तेथील इंग्रज जिल्हा प्रमुख होता, पण बळी निष्पाप महिला आणि मुलगी यांचा गेला होता. अटकांचे सत्र सुरु होऊन कटाच्या सूत्रधाराचा शोध चालू झाला.

हत्येमुळे राज्यकर्त्यांचा क्षोभ उसळला, तशी त्यांची दडपशाही वाढली आणि त्याबद्दल निषेध होऊ लागला. केसरीमधून टिळकांनी बॉम्बस्फोटाचा धिक्कार करतानाच

सरकारच्या दडपशाहीविरुद्ध जोरदार आवाज उठवला. टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला आणि लगोलग सुनावणी होऊन त्यांना शिक्षाही ठोठावण्यात आली. या सर्व घडामोडीत गोखले इंग्लंडात होते, तरी काही कट्टर विरोधकांनी त्यांची निंदा नालस्ती सुरु केली. (अशी मोहीम करणाऱ्या पुण्याच्या ''हिंदू पंच'' या साप्ताहिकावर हितचिंतकांच्या आग्रहावरून गोखल्यांनी अब्रुनुकसानीचा खटला लावला. त्या साप्ताहिकावर जप्ती येऊन त्याचा मालक कृष्णाजी काशिनाथ फडके हा कफल्लक झाला. हे समजताच गोखल्यांनी त्याला आर्थिक मदत पाठविण्यास सुरवात केली.) दरम्यान एक अविश्वसनीय घटना घडली, ती अशी की टिळक राजद्रोह खटल्यामुळे खळबळ माजून अतिशय स्फोटक परिस्थिती निर्माण झाल्यावर मुंबई इलाख्याचे तत्कालीन गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांनी पत्र लिहून गोखल्यांना भारतात परतण्याची विनंती केली. आपल्या पत्रात ते म्हणतात:

''टिळक खटल्याबाबत तुम्ही माझ्याशी सहमत होणार नाही, हे मला ठाऊक आहे. पण मी तुम्हाला सांगू इच्छितो की त्यांना अटक करणे आवश्यक होते. जहाल मंडळींच्या कारवाया इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत की देशातील शांततेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा वेळेस लोकांना सत्य परिस्थिती वस्तुनिष्ठ रीतीने सांगणारा नेता हवा आहे. टप्प्याटप्प्याने सुधारणा घडवून आणायच्या का देशात रक्तपात वाहू द्यायचा आणि देशाला ५० वर्षे मागे न्यायचे, हे निवडण्याची घटका येऊन ठेपली आहे. या निर्णायक वेळेस तुमच्याशिवाय अन्य कोणी हे काम करु शकणार नाही अशी माझी धारणा आहे.''

देशातील हिंसक कारवाया चालू राहणे हिताचे नव्हते. कारण त्यातून अनागोंदी, घातपात आणि विध्वंस यापेक्षा आणखी काही हाती लागण्याची शक्यता नव्हती. म्हणून भारतीयांचे प्रतिनिधित्व वाढविणे, अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे आणि संस्थानिकांपेक्षा सुशिक्षितांना अधिक वाव देणे, या गोष्टी नेमस्त पक्षाला निकडीच्या वाटत होत्या. सुरत काँग्रेसचा बोजवारा उडाल्यानंतर मुझफ्फरपूर हत्याकांड आणि टिळकांचा कारावास या

पार्श्वभूमीवर काँग्रेसचे अधिवेशन १९०८च्या अखेरीस मद्रास येथे भरणार होते, त्याला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले होते. ब्रिटीश परराष्ट्र मंत्री, व्हाईसरॉय आणि प्रांतिक गव्हर्नर यांच्या कायदेमंडळात भारतीयांचे प्रतिनिधित्व वाढणे, तसेच प्रांतिक विधिमंडळात लोकनियुक्तांचे बहुमत आणणे, या सुधारणा ब्रिटीश संसदेसमोर मांडण्यात आल्या होत्या. गोखल्यांनी मद्रास अधिवेशनात केलेल्या भाषणात हे सांगितले की या सुधारणा म्हणजे केवळ एक टप्पा आहेत. त्या पुरेशा नाहीत. पण त्या आपण जितक्या जबाबदारपणे वापरू, त्यावर पुढील टप्पा अवलंबून राहील. कायदेमंडळात सहभाग हा एका प्रकारे प्रशासनातील काही जबाबदारी घेण्याचा भाग होता आणि त्यावर आपली स्वयंशासनाकडे वाटचाल कशी आणि किती वेगाने होते ते ठरणार होते. गोखल्यांनी आपल्या भाषणातून या सुधारणांबद्दल अवास्तव अपेक्षा निर्माण न होता उगाच निराशेचाही सूर निघणार नाही अशी काळजी घेतली होती. राजकारणात एखाद्या गोष्टीबद्दल फाजील उत्साह निर्माण होणार नाही आणि त्याच वेळेस पुढे जाण्याचा निर्धारही मावळणार नाही, या दोन्ही परस्परविरोधी वाटणाऱ्या गोष्टींचा मेळ कसा साधायचा हा वस्तुपाठ गोखल्यांनी घालून दिला होता असे म्हणता येईल.

इंग्लंडमधील वास्तव्यात मोर्ले यांच्याबरोबर गाठीभेटी घेऊन या सुधारणांबद्दल आग्रह धरून त्यांना आकार देण्यात गोखल्यांनी जी मेहनत घेतली, ती मोर्ले यांच्या राजकीय विरोधकांनी हेरली होती आणि त्याबद्दल ब्रिटीश संसदेत मोर्ले यांना खास ब्रिटीश पद्धतीने चिमटेही काढण्यात आले होते. या सुधारणांचे भारतात स्वागत होत आहे, म्हटल्यावर मोर्ले यांचे विरोधक आणखी पुढे सरसावले आणि जणू काही गोखल्यांनीच या सुधारणा मोर्ले यांच्या हातून कागदावर उतरवल्या, असा आरोप करू लागले. या सर्व गदारोळात भारतीय राजकारणाच्या दृष्टीने निर्णायक वळण देणारी गोष्ट घडत होती आणि ती म्हणजे सत्ता काही अंशी लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या हातात जाणार होती. एका परीने संस्थानिकांचे महत्त्व कमी होऊन राजेशाहीकडून लोकशाहीकडे जाणारे ठोस पाऊल उचलले गेले होते.

## धार्मिक तेढीचा ब्रिटीश डाव

पण नेमकी हीच गोष्ट भारतातील ब्रिटीश नोकरशाहीला अत्यंत डाचत होती. मुस्लिमांतील उच्चभ्रू, सुशिक्षित आणि नवाबी थाटाच्या मंडळींना हाताशी धरून तत्कालीन व्हाइसरॉय मिंटो यांनी त्यांना सरकारकडे काँग्रेसपेक्षा वेगळी निवेदने, मागण्या आणि प्रतिनिधित्व करण्यास प्रोत्साहन देण्यास सुरवात केली. 'कायदेमंडळात भारतीयांना प्रतिनिधित्व म्हणजे शेवटी हिंदूंचे प्राबल्य' अशा तऱ्हेचा युक्तिवाद मुस्लिम नेत्यांच्या मनावर हळूहळू ठसविण्यात येऊ लागला. तो गोखले प्रभृतींच्या लक्षात येण्यास काही काळ निघून जावा लागला. ब्रिटीश राज्यकर्त्यांबद्दलची गोखले प्रभृती नेमस्त मंडळींची अटकळ या काळात चुकली.

त्यावेळेस ब्रिटनमध्ये उदारमतवादी पक्षाचे सरकार होते आणि भारतातील कारभारात हळूहळू लोकसहभाग वाढवावा असा त्या पक्षाचा दृष्टिकोन होता. परंतु नोकरशाहीचा बहुतांश हिस्सा हा साम्राज्यवादी भूमिकेत मुरलेला होता. भारतीयांचा सहभाग म्हणजे आपल्या अधिकारांचे आकुंचन समजणाऱ्या नोकरशहांनी उदारमतवादी धोरणाला शक्य तितके अडथळे निर्माण करून पाहिले. मोर्ले यांच्या सुधारणा १९०८च्या शेवटी संसदेने संमत केल्यावर व्हाइसरॉय मिंटो आणि त्यांचे सहकारी यांनी त्यांचे कायदेकानूंत रूपांतर करताना अनेक तपशील असे बेमालूमपणे त्यात घातले की प्रत्यक्षात भारतीयांच्या प्रतिनिधींना फार काही साध्य करता येऊ नये. पण या पेक्षा त्यांनी मोठा धूर्त डाव जो खेळला तो म्हणजे मुस्लिम पुढाऱ्यांना चुचकारून हिंदूंच्या मताधिक्याने तुमची कशी वाताहत होणार आहे असा बागुलबुवा निर्माण केला.१९४७च्या फाळणीची बीजे या काळात पेरली जात होती, हा सुरवातीला उल्लेख केलेलाच आहे.

मुस्लिमांसाठी वेगळ्या मतदारसंघाच्या योजनेला गोखल्यांचा आणि काँग्रेसचा प्रथमपासून विरोध होता. अविभक्त मतदारसंघात मुस्लिमांचे प्रतिनिधित्व कमी होऊ शकते, म्हणून त्यांच्यासाठी काही थोड्या जागा राखीव ठेवाव्यात, अशी तरतूद करण्याची तयारी त्यांनी दाखविली होती. हिंदू-मुस्लिम तणाव आणि भारतीय राष्ट्रीयत्व याबद्दलची

गोखल्यांची भूमिका स्पष्ट होती आणि जसजसा मुस्लिम लीगचा प्रचाराचा जोर वाढू लागला, तसतसे गोखल्यांनी उत्तर हिंदुस्थानात दौरे करून मुस्लिम सुशिक्षित आणि तरुण वर्गासमोर आपले विचार निर्भीडपणे मांडले होते.

१८९२च्या कायद्यान्वये जी प्रतिनिधिमंडळे अस्तित्वात आली होती, त्यांच्यात मुस्लिमांचे प्रतिनिधित्व बहुतेकवेळा अत्यल्प असे. शिक्षणाचा अभाव आणि औदासीन्य ही त्यामागची प्रमुख कारणे होती. धर्मापलीकडे जाणारे भारतीय राष्ट्रीयत्व हे ध्येय असले तरी ते प्रत्यक्षात आणण्यासाठी भिन्न धर्माच्या लोकांना बरोबरीने काम करण्याचा अनुभव महत्त्वाचा होता. म्हणून अल्पसंख्याकांकडे सहानुभूतीने पाहिले पाहिजे असे नेमस्तांचे मत होते. त्यासाठी नवीन कायद्यात गोखल्यांनी पंचवीस निर्वाचित सदस्यांपैकी एकवीस अविभक्त मतदारसंघांतून आणि चार मुस्लिमांसाठी राखीव मतदारसंघांतून निवडले जावे असे सुचविले होते. यामुळे आपले प्रतिनिधित्व निश्चित प्रमाणात कायम राहील अशी ग्वाही त्यांना मिळाली असती. मात्र मिंटो आणि त्यांच्या सल्लागारांनी मुस्लिमांना त्याविरोधात उठवून प्रमाणाबाहेर प्रतिनिधित्व त्यांना अखेरीस मिळवून दिले.

१९०७ मध्ये मुस्लिम लीगच्या निमंत्रणावरून लाहोर येथे गोखल्यांनी 'हिंदू मुस्लिम संबंध' या विषयावर भाषण केले. भारताच्या भवितव्यासाठी हिंदू मुस्लिम संबंध हा कळीचा मुद्दा आहे हे त्यांनी सुरवातीला सांगितले आणि या विषयाकडे पूर्वग्रह बाजूला सारून मनात उत्पन्न होणाऱ्या विकारांना थारा न देता निर्लेपपणे पाहण्याचा प्रयत्न करू या, असे आवाहन केले. परकीय आक्रमकांबरोबर आलेला इस्लाम, त्यांचा राजकीय आणि धार्मिक संघर्ष, कालांतराने निर्माण झालेली मोगलप्रणीत मिश्र राज्यव्यवस्था, तिला मराठा, शीख आणि राजपूतांकडून निर्माण झालेले आव्हान आणि शेवटी ब्रिटीशांनी मोगलाईचे केलेले उच्चाटन हा ऐतिहासिक आढावा घेऊन त्यांनी मुस्लिमांची 'अपमानित' आणि हिंदूंची 'अस्थिर' मानसिकता यांच्यातील तणाव स्पष्ट केला. नेमक्या याच अवस्थेत ब्रिटीशांनी शिरकाव करून घेतला. तेव्हापासून एकमेकांपासून फटकून राहणे हा स्थायी भाव बनला.

संख्याबळाने पाहता पंजाब आणि बंगाल वगळता सर्वत्र मुस्लिम हे अल्पसंख्याक होते. साक्षरतेचे प्रमाण त्या काळात मुस्लिमांमध्ये तीन टक्के तर हिंदूंमध्ये पाच टक्के होते. उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण हिंदूंमध्ये मुस्लिमांच्या प्रमाणाच्या दुप्पट होते. हिंदू हे जाति-उपजातींमध्ये विभागले गेले होते. तो प्रकार मुस्लिमांमध्ये नव्हता. पण आता येणाऱ्या काळात दोघांचे हितसंबंध समानच असणार होते. दोघांना ब्रिटीश राजवटीत सारख्याच समस्यांना तोंड द्यावे लागत होते. दोघांनी बरोबर काम करणे हे सर्वांच्या हिताचे होते आणि शक्यही होते. संख्याबळ, शिक्षण आणि आर्थिक स्थिती पाहता हिंदू हे उजवे असल्याने त्यांनी मुस्लिमांबरोबर सलोखा वाढविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे असे गोखल्यांनी मत मांडले. ''थोड्या हिंदू मंडळींनी हे काम केले तरी ते मोठे ठरणार होते. त्याचवेळेस मुस्लिमांनी हे ध्यानात घेतले पाहिजे की स्वातंत्र्य चळवळ ही धार्मिक नाही, तर राजकीय हक्कांसाठी चालविली जात आहे. यापुढील काळात भारत हा देखील तुर्कस्तान, इजिप्त इ देशांसारखाच एक देश म्हणून जगात ओळखला जाणार आहे. तेव्हा मुस्लिमांनी भारताची चळवळ केवळ हिंदूंवर सोडून देणे हे उचित होणार नाही. त्यांनी या चळवळीत सहभागी होणे आवश्यक आहे.''

विसाव्या शतकात उदयाला आलेल्या राष्ट्र या संकल्पनेचा ठसा आपल्या मुस्लिम श्रोतृवर्गावर उमटावा असा गोखल्यांचा प्रयत्न होता. मुस्लिम लीगने त्यांचा बालेकिल्ला असलेल्या लाहोरमध्ये गोखल्यांना हिंदू मुस्लिम संबंधांवर बोलण्यास निमंत्रित करावे हेच त्यांना असलेल्या सार्वत्रिक आदराचे द्योतक होते. पण याच वेळेस पूर्व बंगालमध्ये स्वदेशी चळवळीला विरोध वाढू लागला होता. मुस्लिमांमधील काही गट गुंडगिरी करून हिंदूंना लक्ष्य करीत होते आणि ब्रिटीश अधिकारी व पोलीस त्यांच्याकडे कानाडोळा करीत होते. मुस्लिम नेत्यांचा समावेश असलेल्या एका उच्चस्तरीय सर्वधर्मीय शिष्टमंडळाने व्हाइसरॉयच्या सचिवांना भेटून स्थानिक अधिकाऱ्यांच्या कुटील कारवायांना आळा घालण्याची मागणी केली. गोखल्यांनी स्वतः १९०७च्या मध्याला कलकत्त्यात एक आठवडा मुक्काम केला. वंगभंगानंतर पेटून उठलेला जहाल गट, त्यांना डाम्बण्यासाठी

तत्पर असणारे गोरे अधिकारी आणि त्यांनी प्रोत्साहन दिलेले मुस्लिमांतील अतिरेकी गट यांच्या कारवाया एकाच वेळी चालू होत्या. पूर्व बंगालातील अतिरेकी मुस्लिम गट हिंदूंविरुद्ध धर्मयुद्ध पुकारण्याची भाषा करीत होते, हेही गोखल्यांनी पाहिले. परंतु त्याला तितकीच जहाल प्रतिक्रिया देणे हे त्यांच्या दृष्टीने अडाणीपणाचे होते. सरकारने या सर्व अतिरेकी कारवायांना वेळीच आळा घालणे आवश्यक होते आणि त्यांनी हर तऱ्हेने ते प्रयत्न चालविले होते. पण भारतातली ब्रिटीश नोकरशाहीच हा कुटील डाव खेळीत आहे हे गोखल्यांना कळेपर्यंत गोष्टी भलत्याच थराला गेल्या होत्या.

मोर्ले यांच्या मूळ हेतूला हरताळ फासण्याचा उद्योग मिंटो आणि त्यांच्या सल्लागारांनी सुधारणांचे कायदेकानूंत रूपांतर करताना सफाईने पार पाडला होता. उत्तर प्रदेश (तेव्हाचा संयुक्त प्रांत) मधून १४ टक्के लोकसंख्येच्या मुस्लिमांना ८५ टक्के लोकसंख्येच्या हिंदूंना मिळाल्या तेवढ्याच जागा शाही कायदेमंडळात मिळाल्या. प्रांतिक कायदेमंडळात २० पैकी ७ जागा त्यांना मिळाल्या. हा सरळ सरळ मुस्लिमांच्या बाजूने आणि हिंदूंच्या विरोधात केलेला पक्षपात होता. 'सैतान हा तपशिलात लपलेला असतो' असे इंग्रजीत म्हणतात, त्याचा प्रत्यय त्या वेळेस आला होता. भारतातले तत्कालीन सरन्यायाधीश जेंकिन्स यांनी कालांतराने मोर्ले यांना सांगितले होते की 'मुस्लिमांना मागण्यांसाठी उठवणे यामागचा खरा हेतू हा तुमच्या प्रतिनिधित्व वाढवण्याच्या सुधारणांवर पाणी फिरवणे हाच होता.'

मूळ सुधारणांच्या मसुद्यासाठी मोर्ले यांच्याबरोबर वाटाघाटी करणारे गोखले त्या सुधारणा प्रत्यक्षात भलत्याच अवतारात आल्यावर चक्रावले तर खरेच. मुंबई प्रांतिक सभेतर्फे फेरोजशा मेहता यांच्या सहीने खालील तार संदेश त्यांनी सरकारला पाठविला:

''आम्ही आपणास स्मरण करून देऊ इच्छितो की भारतातील ब्रिटीश सत्ता ही वंश आणि धर्म यांचा विचार न करता सर्व समाज घटकांना समान न्यायाच्या तत्त्वावर आधारलेली आहे. आपले सध्याचे एका समाजाला झुकते माप देण्याचे धोरण दुसऱ्या समाजांवर अन्याय करणारे, म्हणून न्यायाच्या तत्त्वाविरुद्ध आहे आणि त्याचे परिणाम

भयानक होणार आहेत.''

परंतु गोखल्यांनी त्याबद्दल जाहीर मतप्रदर्शन करण्याचे टाळले. त्यांचे नेमस्त गटातील सहकारी मोतीलाल नेहरू आणि रमेशचंद्र दत्त यांनी आपली खंत त्यांच्याजवळ व्यक्त केली.

गोखल्यांचा विशाल दृष्टिकोन आणि भारताच्या लोकशाहीचे ब्रिटीशांबरोबरील भागीदारीत विकसित झालेले उदात्त चित्र हे काही उदारमतवादी ब्रिटीश सोडले तर इतर ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या पचनी पडलेले नव्हते. रानडे आणि वेडरबर्न या आपल्या गुरुजनांविषयी कमालीचा आदरभाव गोखल्यांच्या मनात घर करून होता. सदसद्विवेक आणि वस्तुनिष्ठता यांच्या आधारावर त्यांनी वाटचाल केली होती. संसदीय लोकशाहीचे विकसित रूप त्यांनी ब्रिटनमध्ये पाहिले होते. त्यामुळे स्वातंत्र्य आणि लोकशाही या मूल्यांना स्वदेशात कमालीचे जपणाऱ्या ब्रिटीश राजकारण-धुरीणांपैकी काही हे वसाहतीच्या राजकारणात कुटील डाव खेळू शकतील, याची कल्पना गोखले करू शकले नसावेत असे आज म्हणता येते. ब्रिटीश नोकरशाहीतील धूर्त मुत्सद्दी मात्र गोखले हे नेमस्त आहेत हे त्यावेळेसही मान्य करीत नव्हते.

## नेमस्तांची कोंडी

१९०८ च्या सुरत काँग्रेस गोंधळानंतर नेमस्तांनी अलाहाबाद येथे एक परिषद भरवून काँग्रेसची घटना लिखित असावी आणि सदस्यत्वाचे नियम कडक असावेत म्हणून एक मसुदा तयार केला. त्यातल्या तरतुदी या सुरतेतील गोंधळ पुन्हा कुणालाही घालता येऊ नये या उद्देशाने तयार केल्या होत्या. त्याच सालच्या डिसेंबर अखेरीस मद्रास येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात त्यांना मंजुरी देण्यात आली. अर्थात मध्यंतरीच्या काळात टिळकांची मंडालेला रवानगी झाली होती आणि बाबू अरविंद घोष यांना तुरुंगात टाकण्यात आले होते. त्यामुळे जहाल गट हा काँग्रेसमध्ये शिल्लक राहिला नव्हता. मद्रास अधिवेशनात मोर्ले यांच्या सुधारणांचे स्वागत झाले खरे, पण नंतर मिंटो

यांनी त्या अंमलात आणताना ज्या क्लृप्त्या वापरल्या होत्या, त्यांच्यामुळे मुस्लिमांना प्रमाणाबाहेर प्रतिनिधित्व मिळाले होते.

परिणामी सुशिक्षित भारतीयांचे जनमत हे नेमस्त काँग्रेसच्या विरोधात तयार झाले होते. जहाल गटाला पुन्हा काँग्रेसमध्ये घेण्यास विरोध, मोर्ले मिंटो सुधारणांबद्दल घाईघाईने केलेले स्वागत आणि नंतर वाट्याला आलेली अचंबित अवस्था, एकूणच संघटनात्मक पातळीवरील मरगळ यामुळे नेमस्तांची घसरण झालेली होती. या सर्व गोष्टी निरुत्साही वातावरणात १९०९ मध्ये भरलेल्या लाहोर काँग्रेसमध्ये पुरेशा स्पष्ट झाल्या होत्या.

अशा नैराश्याने झाकोळलेल्या वातावरणात काँग्रेसमध्ये पुन्हा चैतन्य आणण्यासाठी संस्थापक सदस्यांना पाचारण करण्याचे ठरून १९१०च्या अलाहाबाद अधिवेशनासाठी सर विल्यम वेडरबर्न यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. गोखल्यांबरोबर त्यांचे कमालीचे जिव्हाळ्याचे संबंध होते. वेडरबर्न यांचे भारतप्रेम कित्येक भारतीयांहून अधिक आणि सर्व ब्रिटीश अधिकाऱ्यांना वाटे त्यापेक्षा सरस होते, असे गोखल्यांचे मत होते. जहाल-मवाळ यांच्यात दिलजमाई घडवून आणायची, सरकारने लोकप्रतिनिधींना दूर लोटल्याची भावना होती ती मिटवायची आणि हिंदू मुस्लिम तेढ कमी करायची अशी तिहेरी आव्हाने त्यावेळेस वेडरबर्न यांच्यासमोर उभी होती. या तिन्ही बाबतीत गोष्टी कमालीच्या ताणल्या गेल्या होत्या.

विशेषतः हिंदू मुस्लिम तणाव मर्यादेबाहेर ताणला जाणे हे ब्रिटीश राजवटीच्या दृष्टीने हिताचे नव्हते. कारण त्यामुळे त्यांचे कारस्थान उघड होण्याचा धोका होताच, पण एकूण कायदा आणि सुव्यवस्थेला त्यामुळे हानी पोचू शकत होती. धूर्त ब्रिटीश अधिकाऱ्यांनी त्यामुळे मुस्लिम पुढाऱ्यांना त्यांच्यातील अतिरेकी मुखंडांना आवर घालण्याचा सल्ला दिला. मुस्लिम लीगचे अध्यक्ष आगा खान यांनी काँग्रेसशी बोलणी करण्याची तयारी दाखविली.

वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखाली अलाहाबाद काँग्रेस अधिवेशनानंतर हिंदू मुस्लिम

परिषद भरली. मुस्लिम लीगचे चाळीसहून अधिक प्रतिनिधी तिला हजर होते. परिषदेच्या शेवटी एक उभयपक्षीय समिती नेमण्यात आली आणि तिला वादग्रस्त विषयांवर तोडगा काढण्यास सांगण्यात आले. या विषयांत मशिदीसमोर वाजंत्री, गोहत्या, भाषाविषयक निर्णय आणि प्रतिनिधित्व यांचा समावेश होता. समितीत आठ हिंदू आणि आठ मुस्लिम सदस्य नेमण्यात आल्यावर मुस्लिम प्रतिनिधींनी गोखल्यांच्या नावाचा आग्रह धरला. तेव्हा गोखले म्हणाले की 'अहो, मी पडलो हिंदू, अशाने संतुलन राहणार नाही.' तेव्हा 'आम्हाला तुम्ही हिंदू आहात याने काही फरक पडत नाही', असे त्यांना उत्तर मिळाले. ही गोष्ट इतकी बोलकी आहे की अधिक सांगणे नलगे. अर्थात या समितीच्या नंतरच्या कामकाजातून फार काही निष्पन्न झाले असे म्हणता येणार नाही.

जहाल गटाला पुन्हा काँग्रेसमध्ये परतण्यासाठी वातावरण निर्माण करण्यासाठी वेडरबर्न यांना फार कष्ट पडले नाहीत. दोन्ही गटांना एकूण परिस्थितीचे भान चांगल्यापैकी आले होते. राज्यकर्ते आणि प्रतिनिधी यांच्यात मोर्ले मिंटो 'सुधारणांमुळे' जी दरी निर्माण झाली होती, ती दूर करणे अधिक जिकिरीचे होते. लोकांमध्ये या सुधारणांमुळे काँग्रेसच्या आतापर्यंतच्या कामगिरीवर पाणी पडल्याची भावना होती. दुसरीकडे जहाल गटातील अतिजहाल मंडळींच्या हिंसात्मक कारवाया आणि त्यांना ठेचण्यासाठी शासनाने चालविलेली दडपशाही यामुळे राजकीय चळवळींवर बंधने आली होती. अशा परिस्थितीत कायदेमंडळाबाहेर काय करता येईल याकडे गोखले प्रभृतींचे लक्ष वळले होते.

गोखल्यांच्या मनात हिंद सेवक समाज (Servants of India Society) काय काय करू शकेल याचे संकल्पचित्र तयार होत होते. अर्थात शिक्षण, तंत्रज्ञान, महिला-शिक्षण इ. आघाड्यांवर जनजागृती करायची कामे ही राजकीय स्वरूपाची नव्हती.

डिसेंबर १९११ मध्ये राजे पंचम जॉर्ज यांच्या भारत भेटीचा मुहूर्त साधून ब्रिटीश राजवटीने बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा केली. त्यामुळे राजकीय वातावरण पुन्हा एकदा पालटले. मध्यवर्ती कायदेमंडळात सरकार आणि त्यांच्या अंकित सदस्यांचे बहुमत असले तरी राजकीय दृष्ट्या सहमतीने काही साध्य करता येईल का असा

गोखल्यांचा या वेळेस प्रयत्न होता. महंमद अली जिना, रावबहादूर रघुनाथ नरसिंह मुधोळकर, सच्चिदानंद सिन्हा आदी थोड्या सदस्यांना त्यामध्ये स्वारस्य होते. सरकार पक्षाच्या लेखी गोखले हे अनधिकृत विरोधी पक्ष नेते होते.

ज्या लष्करी आणि मुलकी खर्चात बचत करून तो निधी शिक्षणाकडे वळवण्याच्या धोरणाचा गोखल्यांनी सातत्याने आग्रह धरला होता, त्या धोरणाचा पुरस्कार करणारे सर गाय विल्सन हे त्या सुमारास वित्तविषयाचे सरकारी सदस्य म्हणून नियुक्त झाले. गोखल्यांविषयी प्रतिकूल अभिप्राय विल्सन यांच्या मनात भरवून देण्याचे सुरवातीला प्रयत्न झाले. परंतु प्रत्यक्ष अनुभवांती विल्सन यांचा गोखल्यांबद्दलचा ग्रह पालटला. मग विल्सन हे गोखले यांच्या प्रभावाखाली गेल्याची चर्चा शासकीय वर्तुळात सुरु झाली.

गोखल्यांनी पुन्हा एकवार सरकारच्या लष्करी खर्चाला लक्ष्य करण्याच्या दृष्टीने सर्व सार्वजनिक खर्चाची छाननी व्हावी, असा आग्रह धरला. सरकारी अंदाजपत्रक म्हणजे केवळ जमाखर्चाचे हिशेब नसून ते राजकीय धोरणांच्या आर्थिक निर्णयांचा परिपाक असते, हे गोखले आग्रहाने मांडत. त्यांचा युक्तिवाद कधीही टोकाचा सैद्धांतिक नसे, पण त्याचवेळेस ते आपला नैतिक आग्रह सोडत नसत. अफूच्या व्यापारामुळे जरी ७० लाख पौंड तिजोरीत जमा होत असले तरी चीन या शेजारी देशाला या अंमली पदार्थाच्या नादी लावून त्यांच्या अधःपतनाचा कलंक त्या उत्पन्नाला लागत आहे आणि म्हणून ते त्याज्य आहे, अशीच त्यांची भूमिका होती.

दिव्याच्या तेलावर कर बसवताना शासकीय प्रतिनिधीने सांगितले की वर्षाला या करामुळे एका कुटुंबाला फक्त चार आणे जास्त द्यावे लागतील आणि म्हणून ही वाढ जाचक ठरणार नाही. गरीबांतील गरीब कुटुंबाला चार आणे सुद्धा मोलाचे असतात असे गोखल्यांनी सांगून त्या कराला विरोध केला. ज्या कौशल्याने आणि युक्तीने गोखले कोरड्या आकडेवारीला जिवंत करून त्यांच्या मागच्या जीवन कहाणीकडे लक्ष वेधत, त्यामुळे सरकारी सदस्यही अवाक होत असत.

जिल्हा प्रशासन मंडळे स्थापन करून त्यावर लोकनियुक्त सदस्य आणि शासन

नियुक्त सदस्य असावेत, अशा आशयाचे विधेयक गोखल्यांनी या वेळेस आणले होते. त्यावरून मुंबई इलाख्याचे राज्यपाल यांच्या मनात गोखल्यांच्या हेतूविषयी शंका निर्माण झाली. अशा तऱ्हेने लोक सहभाग वाढत राहिला तर ब्रिटीश सत्तेला हे लोक सुरुंग लावतील, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. गोखल्यांच्या हालचालींवर पाळत ठेवण्यात येऊ लागली. ते गोखल्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी एवढेच म्हटले की पाळत ठेवणाऱ्यांनी आपले काम करतेवेळी फार धांदल करू नये.

गोखल्यांच्या एकूण राजकीय भूमिका आणि दृष्टिकोन यांच्या गाभ्याचा शोध घ्यायचा असेल तर १९१२ मध्ये लंडन येथे तिथल्या भारतीयांनी केलेल्या सत्काराला उत्तर देताना त्यांनी जे भाषण केले त्याकडे पाहिले पाहिजे . भारतीयांचे भवितव्य ते स्वतः काय आणि किती प्रयत्न करतात यावर जास्त अवलंबून आहे. ब्रिटीश राज्यकर्ते काय करतात यावर ते कमी अवलंबून आहे. ब्रिटीश साम्राज्यातले इतर देश, ऑस्ट्रेलिया, कॅनडा इ ज्या प्रमाणे स्वयंशासन राबवितात त्याप्रमाणे भारतीयही करू शकतात. कारण व्यक्ती म्हणून कोणीही भारतीय कोणाही परदेशी माणसापेक्षा कमी नाही. पण एकूण समाज म्हणून पाहिले तर शिक्षणाच्या अभावामुळे आपले सामूहिक प्रयत्न मागे पडतात. म्हणून आपण सर्वांनी शिक्षणाकडे प्रामुख्याने लक्ष दिले पाहिजे. म्हणजे मग आपली सरासरी क्षमता वाढेल आणि थोड्या उच्च क्षमतेच्या लोकांवर आपल्याला अवलंबून राहावे लागणार नाही.

याच सुमारास ब्रिटीश राज्यकर्त्यांचे विचार याच्या बरोबर उलट दिशेने चालले होते. त्यांच्या मते भारतात ब्रिटीश वसाहतीतील संसदीय व्यवस्था कधीच चालू शकणार नव्हती. मानसिकता, मूल्ये आणि क्षमता याबाबतीत भारतीय हे कित्येक शतके मागासलेले होते आणि त्यामुळे ब्रिटीशांना आपले इतिहासदत्त कर्तव्य पार पाडावे लागत होते. राज्यकर्त्यांच्या या दृष्टिकोनाला टक्कर देणारी गोखल्यांची भूमिका होती आणि भारतात आणि इंग्लंडात तिचा सातत्याने ते पुरस्कार करीत राहिले.

स्वयंशासनासाठीची भारतीयांची क्षमता टप्प्या टप्प्यानेच वाढणार होती आणि

त्यासाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता. त्यासाठी आर्थिक तरतूद करणे सहज शक्य होते. अनावश्यक लष्करी खर्चाला कात्री लावून तसे करावे हा गोखल्यांचा आग्रह होता. जे मोजके ब्रिटीश अधिकारी आणि राजकारणी भारतातील बदलांना अनुकूल होते, त्यांना आपली भूमिका पटवून देण्याचा गोखल्यांचा प्रयत्न होता.

बाकीचे ब्रिटीश प्रशासक हे गोखल्यांना बिचकून असत, कारण राज्यकारभारातील विसंगती, त्रुटी आणि दोष हेरण्याची आणि बिनतोड युक्तिवाद करण्याची गोखल्यांची हातोटी विलक्षण होती. आपल्या ध्येयावरची अविचल निष्ठा, तीक्ष्ण बुद्धिमत्ता आणि भूमिकेची पारदर्शकता यामुळे गोखल्यांना चकवणे हे धूर्त ब्रिटीशांना दुरापास्त होते. १९१२ मध्ये व्हाइसरॉय हार्डिंज यांनी मुंबई इलाख्याचे राज्यपाल क्लार्क यांना गोखल्यांबद्दल असे सांगितले होते की 'हे गृहस्थ पुढच्या वीस वर्षांचा विचार करीत असतात. जिल्हा परिषदांच्या त्यांच्या प्रस्तावावर चर्चा चालू असताना क्रॅडॉक च्या एका शेऱ्यावर त्यांनी खरमरीत प्रतिटोला मारला की हो, आम्हाला जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार काढून घ्यायचे आहेत. कारण अधिकार म्हणजे सत्ता आणि आम्हाला लोकांची सत्ता हवी आहे. हे गृहस्थ धोकादायक आहेत, कारण त्यांची राजनिष्ठा वीस वर्षांनी वितळून गेलेली दिसेल.'

◆◆◆

# ५ आंतरराष्ट्रीय कर्तृत्व

दक्षिण आफ्रिकेत गांधींच्या आग्रहामुळे गोखल्यांनी जे काम केले त्याकडे वळण्याआधी थोडक्यात तेथील स्थलांतराचा भारतीयांचा इतिहास पाहू.

इतर साम्राज्यवादी सत्तांप्रमाणे ब्रिटीशांनी आपल्या साम्राज्यातील वसाहतींमधून अधिकाधिक संपत्ती कशी काढता येईल याचा विचार केला. मॉरिशस, गयाना, त्रिनिदाद येथील वसाहतींमध्ये ऊस लागवड आणि दक्षिण आफ्रिकेत खाणी येथे कामासाठी मजुरांची गरज मोठ्या प्रमाणावर होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यात गुलामांचा व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत होता. बरेच विदेशी व्यापारी निरनिराळ्या प्रांतांत गुलामांचे स्थलांतर घडवून फायदा कमावत होते. सिलोनमधील चहाच्या मळ्यांसाठी बिहार–बंगाल मधून गुलामांची तस्करी करताना काही व्यापारी पकडलेही गेले होते. त्यामुळे कंपनी सरकारला गुलामांचा व्यापार नियंत्रित करण्यासाठी निर्बंध हे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणावे लागले. त्यानंतरच्या पन्नास वर्षांत झालेल्या औद्योगिक क्रांतीमधील घडामोडींमुळे ब्रिटीश राज्यकर्त्यांनी गुलामगिरीचे उच्चाटन करायचे ठरविले. १८३३ मध्ये गुलामगिरीवर बंदी घालणारा कायदा संमत झाला.

त्यामुळे त्यानंतरच्या काळात मजूर मिळविणे आणि त्यांचे मॉरिशस, वेस्ट इंडिज इ वसाहतीत स्थलांतर करण्यासाठी मळे आणि खाणींच्या मालकांनी बंधपत्रित मजूर अशी पद्धत तयार केली. दक्षिण आफ्रिकेत जाणाऱ्या मजुरांना बंधपत्रान्वये पाच वर्षे मालकाच्याकडे काम करता येई. त्यानंतर त्याने एक तर परत जावे, वा स्वतंत्रपणे काम करावे किंवा नव्याने करारावर सही करावी. परत जाण्याचा विचार सोडून द्यावा लागायचा, कारण लांबच्या समुद्र सफरीत जिवंत परतण्याची शक्यता कमी. स्वतंत्रपणे काम करायचे तर तिथला तीन पौंडाचा दरडोई वेगळा कर भरणे आले. त्यामुळे मालकाच्याकडे हलाखी पत्करून मजुरी करत राहणे हा पर्याय शिल्लक राही. बरोबर याचा फायदा उठवून मालक आणि त्यांना पाठीशी घालणारी तिथली सरकारे मजुरांचे शोषण करून आपली

संपत्ती वाढवत होती. आर्थिक शोषणाच्या जोडीला वंशभेद आणि वर्णभेद यांची अन्याय्य आणि अमानुष वागणूक स्थलांतरित भारतीयांच्या वाट्याला येत होती.

स्थलांतर ही मानवी समाजाच्या उत्क्रांतीमधील एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया इतिहासकाळापासून चालत आली आहे. नवीन संधीच्या शोधात डोळसपणे केलेले स्थलांतर आणि भुकेपोटी जिवाच्या आकांताने केलेले स्थलांतर, हे प्रकारही आजच्या काळात थांबलेले नाहीत. न्या.रानडे यांना ब्रिटीश साम्राज्यामुळे निर्माण झालेल्या संधींचा फायदा स्थलांतराने घेता येईल असे वाटत होते. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून सुमारे शंभर वर्षे गुजरातमधून व्यापारी आणि इतर यांनी पूर्व आफ्रिकेत स्थलांतर करून जम बसविला होता, तो बहुधा त्यांच्या डोळ्यासमोर असावा. परंतु त्याच कालावधीमध्ये बिहार-बंगालमधून आमिषे, प्रलोभने दाखवून मजुरांना बोटीवर चढवून कलकत्त्याहून दक्षिण आफ्रिका, मॉरिशस अशा निरनिराळ्या वसाहतीत पाठविले जात होते. अपुऱ्या सोयी असलेल्या वस्त्या, कमी पगार आणि अतोनात कष्ट अशा परिस्थितीत त्यांना काम करावे लागे. थोडे कुठे गाऱ्हाणे मांडायला तोंड उघडले की लाथा बुक्क्यांचा मार सहन करावा लागे.

१८९३ मध्ये मोहनदास करमचंद गांधी हा तरुण बॅरिस्टर आपले नशीब अजमावयाला दक्षिण आफ्रिकेत एक वर्षासाठी म्हणून गेला आणि त्याच वर्षी आगगाडीच्या डब्यात त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा प्रसंग घडला. सत्याग्रहाच्या मार्गाने लढा देत असताना मायदेशातून आपल्याला पाठिंबा मिळविण्यासाठी गांधी १८९६ मध्ये भारतात आले. त्यांनी फेरोजशा मेथा, टिळक आणि गोखले यांच्या भेटी घेतल्या. गोखल्यांनी आफ्रिकास्थित भारतीयांच्या प्रश्नासंबंधी सर्वतोपरी साह्य करण्याची तयारी दाखविली. भारतभेट संपवून गांधी आफ्रिकेत परतले आणि काही दिवसांतच गोऱ्यांच्या जमावाने त्यांना चोप देण्याचे ठरवले. त्यातून गांधी बचावले. पण या घटनेबद्दल गोखल्यांनी एक लेख लिहिला. तो काँग्रेसच्या ब्रिटनमधील समितीच्या 'इंडिया ' या मुखपत्रात छापला गेला. गोखल्यांनी लिहिले की ''व्हिक्टोरिया राणीच्या अमदानीच्या हीरक महोत्सवी

वर्षात घडलेला हा प्रसंग काय दर्शवतो, तर भारतीय हे ब्रिटीशांच्या राज्यातील प्रजाजन नसून ते ब्रिटीशांना आपले गुलाम वाटतात. त्यामुळे जेव्हा ब्रिटीशांना सोयीचे नसेल तेव्हा ते भारतीयांना न्याय्य आणि उचित वागणूक देतील, अशी भारतीयांनी अपेक्षा धरणे हे बाष्कळपणाचे लक्षण आहे.''

त्यानंतर १९०१ च्या कलकत्त्यात भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात विषय समितीत आणि खुल्या अधिवेशनात गांधींना द. आफ्रिकेतील भारतीयांच्या हलाखीबद्दल ठराव मांडण्याची अनुमती देण्यात आली. पुढे १९०२ च्या जानेवारीत तेथेच ''दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचा प्रश्न'' या विषयावर एक जाहीर सभा भरविण्यात आली आणि त्यात गोखल्यांनी भाषण केले आणि गांधींच्या प्रयत्नांचे आणि त्यांच्या प्रवृत्तीचे मनसोक्त कौतुक केले. गोखल्यांकरवी भारतातील जनमत तयार होऊन त्याचा रेटा व्हाइसरॉयला भारतीयांचा प्रश्न ब्रिटनमध्ये नेण्यास भाग पाडू शकेल, असा गांधींचा या मागचा हेतू होता. त्यामुळे पुढील पाच वर्षे गांधींनी आफ्रिकेतील भारतीयांबद्दल सतत गोखल्यांचा पिच्छा धरला. त्यानुसार १९०५ मध्ये आपल्या इंग्लंडमधील वास्तव्यात गोखल्यांनी तरुणांच्या एका व्यासपीठावर दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या प्रश्नावर भाषण केले आणि त्याचा चांगला परिणाम तेथे दिसून आला. १९०७ मध्ये गांधींनी ट्रान्सवाल प्रांतात सत्याग्रह चळवळ सुरु केली. त्याला गोखल्यांनी पाठिंबा दिला. परंतु एकूण काँग्रेसमध्ये दरवर्षी अधिवेशनात आफ्रिकेबद्दल ठराव संमत करण्यापलीकडे फारशी काही हालचाल होत नव्हती. काँग्रेसला आपल्या घरातल्या कटकटीतून डोके वर काढायला १९०९ साल उजाडावे लागले.

ट्रान्सवाल मधील सत्याग्रह चळवळीची व्याप्ती त्यावर्षी वाढली आणि तिथल्या ८००० भारतीय नागरिकांपैकी ७५०० जणांनी सत्याग्रहात भाग घेतला होता. सुमारे अडीच हजार जणांना अटक करून तुरुंगात डांबले होते. गोखले त्यामुळे चिंताक्रांत झाले होते. गांधींनी आपली वकिली सोडून दिली होती आणि बचत केलेले सर्व पैसे चळवळीसाठी खर्च केले होते. द. आफ्रिकेतील गोरे आपल्या भूमिकेवर ठाम होते

आणि ब्रिटीश सरकारला देखील न जुमानण्याची त्यांची तयारी होती. भारतातून पाठिंबा मिळविण्यासाठी गांधी बेचैन झाले होते. आपल्या पत्रातून त्यांनी गोखल्यांना कळविले की मायदेशातून आम्हाला भक्कम पाठिंब्याची नितांत आवश्यकता आहे. आपले प्रतिनिधी म्हणून गांधींनी पोलाक नावाच्या ज्यू धर्मीय इंग्रजाला गोखल्यांच्या भेटीला भारतात धाडले.

गोखल्यांनी मुंबईच्या टाऊन हॉल मध्ये सप्टेंबर १९०९ मध्ये सभा भरवून भारतातील ब्रिटीश राजवटीला आपल्या भारतीय प्रजाजनांचे द. आफ्रिकेत संरक्षण करावे आणि द. आफ्रिकेसाठी मजुरांची नवीन भरती तात्काळ बंद करावी, अशी मागणी केली. 'फार मोठे आत्मिक बळ असलेला एक दुर्दम्य नेता' असा गांधींचा उल्लेख करून गोखल्यांनी असे प्रतिपादन केले की 'द. आफ्रिकेत जे अत्याचार होत आहेत त्याचे मूळ ब्रिटीश राजवट भारतामध्ये भारतीयांना जी वागणूक देते, तिच्यात आहे. ज्या नागरिकांना मायदेशात कस्पटासमान वागवले जाते, त्यांना विदेशात काही सौजन्य लाभेल, अशी सुतराम शक्यता नाही. मुळात आम्हाला भारतात समान वागवले जावे अशीच आपली कायम भूमिका असली पाहिजे.''

नामवंतांची एक समिती स्थापून गोखल्यांनी आफ्रिकेतील सत्याग्रहींसाठी पैसे गोळा करायला सुरवात केली. पोलाक यांनी लिहिलेली 'दक्षिण आफ्रिकेतील भारतीय'' ही पुस्तिका आपले मित्र जी. ए.नटेशन यांच्याकरवी प्रकाशित करविली. दिल्ली, बनारस, लाहोर या ठिकाणी सभा घेण्यासाठी त्यांनी पोलाक यांना मदत केली. लाहोर कॉंग्रेस अधिवेशनात गोखल्यांनी उपस्थितांना भावनिक आवाहन करताना सांगितले की ''आपण किमान एक लाख रुपये गोळा केले पाहिजेत. आपले देशबांधव तिकडे ज्या यातना भोगीत आहेत, त्यांच्या मानाने लाख रुपये म्हणजे काहीच नाहीत. आता कसोटी आपली आहे. आपली देशभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि आपला प्रामाणिकपणा सगळ्या गोष्टींची कसोटी संपूर्ण जगासमोर आता लागली आहे.'' त्या वेळेस उद्योगपती रतन टाटा यांनी रु २५००० देणगी दिली.

नंतर झालेल्या मध्यवर्ती कायदेमंडळाच्या अधिवेशनात गोखल्यांनी बंधपत्रित मजुरांच्या भरतीवर बंदी घालणारा ठराव मांडून संमत करून घेतला. 'आता आफ्रिकेतील सरकारला विनवण्याची वेळ संपली आहे. आता त्यांना कृतीनेच प्रत्युत्तर दिले पाहिजे', असे गोखल्यांनी प्रतिपादन केले. परिणामी नाताळ प्रांतासाठी मजुरांची भरती करण्यावर प्रथम आणि कालांतराने सर्व परदेशी वसाहतींसाठी बंधपत्रित प्रकारे भरती करण्यावर बंदी घालण्यात आली.

पोलाक यांच्या भारत दौऱ्यामुळे गांधी हे नाव काँग्रेसजनांना माहीत झाले. तोपर्यंत ते फक्त गोखल्यांना माहीत होते आणि त्यांनाही गांधींना भेटून सात आठ वर्षे झाली होती. एव्हाना गांधींनी मुळात गुजरातीत लिहिलेली आणि नंतर इंग्रजीत भाषांतरित झालेली ''हिंद स्वराज' ही पुस्तिका चर्चेत आली होती. ब्रिटीश राजवटीने भारतात तिच्या वितरणावर बंदी घातली. ब्रिटीश धर्तीच्या संसदीय लोकशाहीवर गांधींनी सडकून टीका केली असल्याने आपले विचार गोखल्यांच्या पसंतीस उतरणार नाहीत, अशी गांधींच्या मनात अटकळ होती. पण गोखल्यांनी त्यावर फार प्रतिकूल मत न देता असहकारावर आधारित आंदोलनाला पाठिंबा दिला. खरेतर 'असहकार' हे जहाल पक्षाचे हत्यार समजले जाई आणि मवाळ मंडळींचा त्याला कायम विरोध होता. परंतु गांधींच्या हातात हे शस्त्र असण्याला गोखल्यांचा पाठिंबा होता. कारण द.आफ्रिकेत सरकारच्या टोकाच्या जुलमी दडपशाहीला तेच प्रभावी उत्तर आहे, असे त्यांचे मत झाले होते.

दक्षिण आफ्रिकेला गोखल्यांनी भेट द्यावी असा गांधींनी बरीच वर्षे लकडा लावला होता. त्यासाठी १९१२ साल उजाडावे लागले. दोन्हीकडची सरकारी यंत्रणा या घडामोडींवर लक्ष ठेवून होती. आफ्रिकेमध्ये गोखल्यांच्या भेटीमुळे भारतीयांची भूमिका अधिक ताठर होईल की काय अशी चिंता होती. तर दिल्ली आणि लंडनमध्ये धास्ती ही होती की आफ्रिकेतील सरकारने गोखल्यांशी काही आगळीक केली तर फार मोठा गदारोळ भारत आणि इंग्लंड दोन्हीकडे उद्भवू शकतो. या कारणास्तव इंग्लंडमधील प्रशासक आणि

राजकारणी यांनी द. आफ्रिका सरकार आणि नेतेमंडळी यांच्याशी संधान साधून गोखल्यांची भेट सुरळीत पार पडेल याची तजवीज करून ठेवली.

बऱ्याच शहरांना भेटी देऊन तिथल्या भारतीय लोकांसमोर गोखल्यांनी भाषणे केली आणि उत्स्फूर्त स्वागत करणाऱ्या लोकांना त्यांची गाऱ्हाणी राज्यकर्त्यांसमोर मांडण्याचे वचन दिले. गोखल्यांचे व्यक्तिमत्त्व, ऋजुता आणि मुत्सद्देगिरी यामुळे गोरे राजकारणीसुद्धा प्रभावित झाले हे खरे. सेनेटर श्राइनर यांनी तिथल्या संसदेत केलेल्या भाषणात गोखल्यांचा उल्लेख ''आजच्या काळातील महत्तम व्यक्तींपैकी एक '' या शब्दांत केला. परंतु गोरे राज्यकर्ते हे पक्के वर्णभेदवादी होते. पंतप्रधान बोथा आणि त्यांचे सहकारी मंत्री यांना भेटल्यावर गोखल्यांचा ग्रह असा झाला की गोरे राज्यकर्ते सर्व अन्याय्य कायदे आणि निर्बंध मागे घेणार आहेत. गांधींनी त्यांना सांगितले की हे धूर्त लोक आता बोलत असले तरी तसे काहीही करणार नाहीत. गोखल्यांचा प्रभाव गांधी, स्थलांतरित भारतीय, गोरे राज्यकर्ते आणि गोरे पुढारी या सर्वांवर पडला, पण अर्थातच त्याचा पुष्टिदायक भाग हा गांधी आणि भारतीयांसाठीच होता.

स्थलांतरितांचे काम मुख्यतः गोऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविणे हेच होते. भारतीयांना मोकळीक दिल्याने नफा कमी, कटकटी जास्त आणि कृष्णवर्णीय आफ्रिकनांचा असंतोष वाढणार, यामुळे ते टाळण्यासाठी गोरे राज्यकर्ते हरतऱ्हेच्या युक्त्या वापरत होते. प्रवासावर निर्बंध, भारतीयांच्या मुलांना ठराविक शाळांमध्येच प्रवेश, त्यांनी कोणत्या नोकऱ्या करायच्या यावर बंधने या त्यापैकी काही होत्या. मूळ वर्णभेदाचे तत्त्व कदापि सोडायचे नाही हा त्याचा गाभा होता. तीन आठवड्यांच्या आफ्रिका भेटीमध्ये गोखल्यांचा कार्यक्रम भेटीगाठी, चर्चा आणि भाषणे यांनी गजबजलेला होता.

भारतातून येणारा रोजगारोत्सुकांचा लोंढा थोपवा असे गोरे शासक म्हणू लागले होते. स्थायिक भारतीयांवरची बंधने सैल करत असाल तर नवागतांच्या संख्येवर निर्बंध मान्य करू अशी गांधी-गोखले यांनी भूमिका घेतली होती. भारतातील काही गटांना ही भूमिका मान्य नव्हती आणि म्हणून 'गांधींनी शरणागती पत्करली' असे सूर उमटू लागले

होते. त्याला उत्तर देताना गोखल्यांनी बजावले की ज्यांना तसे वाटत असेल त्यांनी हिम्मत दाखवून देशभर दौरा करून आणि गांधींसारखा त्याग करून आपली भूमिका लोकांना पटवून द्यावी.

दरम्यानच्या काळात आफ्रिकेतील गोरे शासन देशांतरितांवरचे निर्बंध सैल करतील ही आशा फोल ठरली. वर्णभेद, त्याला पूरक छळवाद आणि निर्बंध हे कडकच राहिले. गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपले आंदोलन अधिक व्यापक करण्याचा निर्णय घेतला. तो गोखल्यांना कळवीत असताना गांधींनी त्यांना हेही विनविले की प्रकृतीची हेळसांड होऊ नये, यासाठी गोखल्यांनी मदतकार्यात भाग घेणे टाळावे. त्यावेळेस शाही लोकसेवा सुधारणा आयोगावर सदस्य म्हणून गोखल्यांची नियुक्ती झाली असल्याने त्या कामासाठी ते इंग्लंडात होते. परंतु द. आफ्रिकेतील स्फोटक परिस्थितीचा अंदाज असल्याने आणि गांधींना भारतातून लागेल ती मदत देणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे या विचाराने गोखले शाही आयोगाचे काम सोडून भारतात परत येण्यास निघाले. ''तुमची शक्ती २५ कोटी भारतीयांसाठी राखून ठेवा, आफ्रिकेतील लाख भर भारतीयांसाठी ती पणाला लावू नका'' असे वेडरबर्न त्यांना सांगत होते. पण गोखल्यांची अटकळ अचूक ठरली.

द.आफ्रिकेत सरकारने अटकांचे सत्र सुरु केले. प्रांतबंदी मोडून नाताळ मधून ट्रान्सवालमध्ये प्रवेश करणाऱ्या सोळा सत्याग्रहींना अटक झाली. त्याबरोबर खाण कामगारांनी संप पुकारला. खाणमालकांनी कामगारवस्तीचा वीज आणि पाणी पुरवठा तोडला. या सगळ्या कामगारांना घेऊन गांधींनी मोर्चा काढला आणि ते नाताळ प्रांताच्या सीमेवर पोचताच त्यांना सगळ्यांना अटक करण्यात आली. कामगारांना परत खाणीत डांबण्यात आले आणि खाणक्षेत्र हेच तुरुंग म्हणून घोषित करण्याची शक्कल सरकारने लढविली. कैदी म्हणून कामगारांना खाणीवर पुन्हा जुंपण्यात आले. पण कामगार जुमानत नाहीत, म्हटल्यावर फटके, लाठीमार आणि गोळीबार या चढत्या क्रमाने आफ्रिकन सरकारने पाशवी उपाय योजले. त्याची प्रतिक्रिया म्हणून इतर मळे

आणि खाणीमधले भारतीय मजूर संप करून बाहेर आले. संपकऱ्यांवर घोडदळ घालून त्यांना माघारी पाठवण्यात आले. गांधींना बेड्या ठोकण्यात आल्या आणि खणण्याचे आणि आवार झाडण्याचे काम त्यांना देण्यात आले.

गोखले या सर्व घडामोडींनी फार अस्वस्थ झाले आणि त्यांनी तात्काळ मुंबईत सभा भरवून द.आफ्रिकेतून येणाऱ्या कोळशाच्या आयातीवर बंदी घालण्याची मागणी केली. डॉक्टरांचा सल्ला न जुमानता त्यांनी देशभर दौरे काढून आफ्रिकेतील कैद्यांच्या कुटुंबियांना मदत म्हणून पैसे गोळा करायला सुरवात केली. स्वतःच्या सात हजार रुपयांच्या बचतीतून एक हजार रुपये या फंडात त्यांनी घातले. त्यांच्या आवाहनाने त्यावेळी तरुण असलेले जवाहरलाल नेहरू आणि राजगोपालाचारी भारावून न जाते तरच नवल! ते उत्साहाने निधीसंकलनात उतरले. पण एक कमालीचे भारत-द्वेष्टे इंग्रज पत्रकार आणि शाही आयोगावरील गोखल्यांचे सहकारी वॅलेंटाईन चिरोल हेदेखील गोखल्यांच्या वक्तव्याने इतके प्रभावित झाले की त्यांनी फंडाला पाच पौंड मदत केली. मुंबई इलाख्याचे राज्यपाल लॉर्ड विलिंग्डन यांनी सुद्धा आर्थिक मदत करण्याची इच्छा प्रदर्शित केली होती हे विशेष.

गोखल्यांच्या प्रयत्नांमुळे देशभर आफ्रिकेतील अत्याचाराविरुद्ध संतापाची लाट उसळली. टाइम्स ऑफ इंडिया सारख्या सरकारधार्जिण्या वृत्तपत्राने अग्रलेखाद्वारे सत्याग्रहींच्या अहिंसात्मक आंदोलनाची दखल घेतली. गोखल्यांनी शाही कायदेमंडळाची तातडीची बैठक बोलाविण्याची मागणी केली. देशातल्या निरनिराळ्या शहरांत सभा आणि निदर्शने घडू लागली. या सर्वात विद्यार्थ्यांचा सहभाग होता आणि विशेष म्हणजे मुस्लिमांची उपस्थिती लक्षणीय होती. सर्व भेदाभेद विसरून परदेशस्थ बांधवांसाठी भारतीय एकत्र येत होते. लाहोर येथील सभेत (नोव्हेंबर १९१३) गोखल्यांच्या भाषणाला कवी महंमद इकबाल, लाहोर उच्च न्यायालयाचे न्या शाह दिन आणि लाला लजपत राय उपस्थित होते. श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्व मोठे पुढारी आपापल्या शहरांत या सभांमध्ये उपस्थित राहून आपला पाठिंबा व्यक्त करीत होते. त्यात सुरेंद्रनाथ

बॅनर्जी, फेरोजशा मेथा, मोतीलाल नेहरू, तेजबहादूर सप्रू, आगा खान यांचा समावेश होता. आपल्या दौऱ्यांनी गोखल्यांनी राजकीय वातावरण ढवळून काढले होते.

आफ्रिकेत कस्तुरबा गांधी सत्याग्रहात उतरल्यामुळे भारतातही महिलांना स्फुरण चढले आणि त्या निषेध सभांमध्ये प्रथमच मोठ्या प्रमाणावर दिसू लागल्या. या सर्व चळवळीची दखल व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यांना घ्यावी लागली. मुळात त्यांना भारतीय जनमानसाची चांगली जाण होती. त्यांनी तारेने आफ्रिकेतील मुख्य राज्यपाल ग्लॅडस्टन यांना कळविले की आंदोलकांशी, सुसंस्कृत देशांत ज्या पद्धती अवलंबिल्या जातात. त्यांना धरून व्यवहार करण्यात यावा. ग्लॅडस्टनचे उत्तर असे होते की हा उठाव भारतात बसून गोखल्यांनी गांधींना हाताशी धरून घडवून आणलेला आहे. त्यावर हार्डिंजने त्यांच्या हे निदर्शनास आणून दिले की आंदोलकांच्या मागण्या काही फार मोठ्या म्हणजे 'सर्व निर्बंध हटवा' अशा तऱ्हेच्या नसून त्यांना केवळ सन्मानाने वागविण्यात यावे एवढ्या आहेत. कारण त्यांनी आफ्रिकेच्या वैभवाला हातभार लावला आहे. या शिष्टाईचा उपयोग होत नाही हे पाहिल्यावर लॉर्ड हार्डिंज यांना अखेरीस मद्रास येथील एका जाहीर सभेत हे सांगावे लागले की भारतीय नसूनही ज्यांना भारतीयांबद्दल आस्था आहे, अशा सर्वांना आफ्रिकेतील सरकारच्या कारवाईने व्यथित केले आहे आणि त्यात त्यांचा स्वतःचा समावेश आहे.

या सर्व घडामोडींचा परिणाम होऊन गांधींची मुक्तता करण्यात आली आणि तिथल्या सरकारने या सर्व प्रकरणासाठी एक चौकशी आयोग नेमला. परंतु त्यावर एकही भारतीय सदस्य नसल्याने आणि सर्व अहिंसक आंदोलकांची मुक्तता न झाल्याने सॉलोमन कमिशनवर बहिष्कार घालण्याची गांधींनी भूमिका घेतली. यावेळेस छातीच्या दुखण्यामुळे गोखल्यांना डॉक्टरांनी सक्तीची विश्रांती घ्यायला भाग पाडले होते. व्हाइसरॉय हार्डिंज यांनी गोखल्यांना तार पाठवून गळ घातली की त्यांनी गांधींना कमिशनवर बहिष्कार घालण्यापासून परावृत्त करावे. त्याच वेळेस गांधींनी गोखल्यांना तारेने असे कळविले की कमिशन हे निव्वळ वेळ काढण्याचे साधन आहे आणि ते अजिबात

कुठलीही सूट देणार नाही, हे इथल्या लोकांना चांगले ठाऊक आहे. त्यामुळे जे पुढारी भारतीय लोकांना आंदोलन मागे घ्या असे सांगायला जातील, त्यांनाच प्रक्षुब्ध जमाव उडवून लावेल. गांधींच्या ताठर भूमिकेमुळे काही फार साध्य होईल असे गोखल्यांना वाटत नव्हते. चर्चेची दारेच बंद झाली तर परिस्थिती आणखी अवघड होत जाईल, असे गोखल्यांचे मत होते. परदेशस्थ भारतीयांना मायदेश सरकारचा पाठिंबा हवा असेल, तर सरकारचे मतही विचारात घेणे हे योग्य ठरेल. तशा आशयाची तार गोखल्यांनी गांधींना पाठविली. उत्तरात गांधींनी लिहिले की आम्ही शपथपूर्वक निर्धार केला आहे. भारत सरकारची सहानुभूती मिळो वा न मिळो, जनता साथ देवो वा सोडो, निर्बंध हटेपर्यंत हा लढा आता कुणी थांबवू शकत नाही.

हे समजल्यावर गोखल्यांनी व्हाइसरॉय यांना कळविले की सॉलोमन यांच्या आगमनानंतर एक आठवडा आंदोलन स्थगित करण्याची तयारी गांधींनी दाखविली आहे. त्यानंतर मात्र त्यांना कुणीही थांबवू शकणार नाही. अशा परिस्थितीत सॉलोमन कमिशनबरोबर काही तडजोड होण्याची शक्यता नव्हती.

अशा वेळेस दिल्लीच्या सेंट स्टीफन्स कॉलेजमधील एक तरुण ब्रिटीश प्राध्यापक सी एफ अँड्रूज यांनी गोखल्यांना कळविले की ते द आफ्रिकेत जाऊन गांधींशी बोलण्यास उत्सुक आहेत. त्याप्रमाणे अँड्रूज हे आपल्या पीटरसन नामक मित्रासोबत आफ्रिकेत जाऊन पोचले. त्यांनी गांधींना चरणस्पर्श करून वंदन केले. दोघांची तार जुळली. त्याचवेळेस आणखी एक इंग्रज महिला कार्यकर्त्या एमिली हॉबहाऊस आफ्रिकेत आल्या. इंग्रज–बोअर युद्धात बोअर स्त्रिया आणि मुले यांच्या तुरुंगवासातील छळाविरुद्ध याच एमिलीबाईनी आवाज उठविला होता. त्यादेखील गांधी आणि तेथील सरकार यांच्या संपर्कात होत्या. युरोपातील आंतरराष्ट्रीय वातावरण १९१३ मध्ये चांगलेच तापू लागले होते. त्यामुळे सरकारपक्षाचा सूर नरमाईचा लागू लागला. १९१४ साल उजाडल्यावर अँड्रूज यांनी केलेली शिष्टाई यशस्वी ठरली आणि संसदेच्या पुढील अधिवेशनात नवीन विधेयक आणेपर्यंत सत्याग्रह स्थगित ठेवण्यास गांधी तयार झाले.

या सर्व प्रकरणात गोखले मुत्सद्देगिरीत किती निष्णात होते हे लक्षात येईल. ब्रिटनमधील सर्व उच्चपदस्थ नेते आणि प्रशासक यांच्याबरोबर त्यांनी आधीच संपर्क साधला होता. द.आफ्रिकेतील सरकारी सूत्रांबरोबरही आपल्या दौऱ्यात त्यांनी संबंध स्थापित केले होते. परंतु अखेरीस जनमताचा रेटा निर्णायक ठरतो, हे जाणून आफ्रिकेतील संघर्ष चिघळताच भारतात दौरे करून आणि सभांमधून आवाहन करून निधी गोळा केलाच. पण त्यांनी भारतातील ब्रिटीश राजवटीला या संघर्षात निश्चित भूमिका घेऊन आफ्रिकेवर दबाव आणण्यास भाग पाडले. अँड्रूज सारख्या तरुण, उत्साही आणि प्रामाणिक इंग्रज माणसाला गोखल्यांशी संपर्क साधून त्यांची अनुमती मिळवावीशी वाटली, यातच त्यांचे आंतरराष्ट्रीय कर्तृत्व दिसून येते. गांधींचे मोठेपण ओळखून त्यांच्या भिन्न पवित्र्याला आदरभाव दाखवण्याचा सुज्ञ विवेक गोखल्यांच्या ठायी आपल्याला दिसून येतो.

◆◆◆

# ६ आदर्श देशसेवक

देशसेवा हे व्रत आहे असा गोखल्यांचा दृढ निश्चय होण्याला काही घटक कारणीभूत होते. त्यांचे गुरु महादेव गोविंद रानडे हे ज्या अविचल निष्ठेने काम करीत तो आदर्श त्यांच्या समोर होताच. डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्ये स्थापनेपासूनच जेसुईट मिशनरी यांनी चालविलेल्या शिक्षणसंस्थांचा आदर्श पुढे ठेवला होता. गोखल्यांनी शपथपूर्वक आजीव सदस्यत्व स्वीकारून डे.ए. सोसायटीतील आपली सेवा पूर्ण केली होती. शिक्षण क्षेत्राबाहेर सामाजिक आणि राजकीय जागृतीचे मोठे काम वाढून ठेवले आहे आणि ते करण्यास सुशिक्षित तरुणांशिवाय अधिक सुयोग्य कोणी नाही, याची जाणीव गोखल्यांना विधिमंडळात काम करायला लागल्यापासून होऊ लागली होती. स्वयंशासनाचे स्वप्न कॉंग्रेसचे धुरीण पाहत होते. पण आर्थिक, सामाजिक आणि राजकीय घडामोडींचे आकलन, समस्यांची मांडणी, लोकजागृती आणि धोरणांची आखणी करणारी सक्षम फळी निर्माण झाली नाही तर इंग्रजांच्या हातून घेतलेली सत्ता राबवता येणार नाही, अशी धारणा गोखल्यांच्या मनात घर करून राहिली होती. राजेशाहीकडून लोकशाहीकडे संक्रमण करीत असताना समाजाला लोकशाही तत्त्वे, मूल्ये, यंत्रणा आणि प्रक्रिया हे सारे आत्मसात करावयाचे असते. हे काम धिमेपणाने सार्वजनिक जीवनामधून होत असते. त्या सार्वजनिक जीवनाचे महत्त्व गोखल्यांनी चांगले जाणले होते. गाव पातळीपासून चढत्या क्रमाने देशपातळीवरच्या सर्व यंत्रणेमध्ये केवळ सहभाग नव्हे तर सर्व सार्वजनिक प्रश्नांवर मतप्रदर्शन, जनमत संघटित करणे आणि ते सरकारपर्यंत पोचविण्यासाठी सर्व सनदशीर मार्गांचा अवलंब करणे हे सारे सार्वजनिक जीवनात गृहीत धरले होते.

लोकशाहीमध्ये मतभेद आहेत, चर्चा आहेत, या सर्वाला एक शिस्त आहे आणि सहमतीची प्रक्रिया आहे, ही गोखल्यांची धारणा होती. तिचे प्रतिबिंब त्यांनी 'हिंद सेवक समाज' अर्थात सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटी स्थापन करतेवेळी जी प्रस्तावना

लिहिली, त्यात आपल्याला पाहावयास मिळते. ते लिहितात:

''... राष्ट्र उभारणीच्या कामात आपण अशा टप्प्यावर आता आलो आहोत की पुढील प्रगतीसाठी आपल्याला विशेष प्रशिक्षण दिलेल्या, मिशनरी वृत्तीने झटून काम करणाऱ्या फळीची आज गरज आहे. गेल्या पन्नास वर्षांत समान परंपरा आणि संबंध, समान आशा -आकांक्षा, इतकेच काय तर समान बाधा यावर आधारित एकाच राष्ट्रीयत्वाची भावना लक्षणीय रीत्या वाढली आहे. आपण पहिल्यांदा भारतीय आहोत आणि नंतर हिंदू, मुसलमान, पारशी किंवा ख्रिस्ती आहोत ही जाणीव हळूहळू मूळ धरू लागली आहे. आपल्या गत वैभवाला साजेसे स्थान आजच्या जगात मिळवण्यासाठी एकजुटीने नवनिर्माणाकडे वाटचाल केली पाहिजे, ही काही आता फक्त काही सुपीक डोक्यांची कल्पना नसून देशातील सुशिक्षित वर्गाने आपले ब्रीद म्हणून निश्चयपूर्वक ती स्वीकारली आहे. शिक्षण आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांचा धिमेपणाने विस्तार होत आहे, ही गोष्ट त्या वाटचालीचे द्योतक आहे. ज्या उत्साहाने सभा-परिषदा भरत आहेत आणि ज्या तडफेने वृत्तपत्रांत लिखाण होत आहे, त्यावरून नवे चैतन्य कसे सळसळत आहे ते कळून येते. पण आपल्यासमोरचे काम पाहिले तर असे म्हणता येईल की झाडझाडोरा काढून जमीन आपण साफसूफ केली आणि पाया घातला. अजून वरती इमारत बांधायची बाकी आहे.''

या कामासाठी चारित्र्य आणि क्षमता उंचावण्याची गरज आहे असे सांगून हा मार्ग किती जिकिरीचा आहे हेही या प्रस्तावनेत स्पष्टपणे नमूद केले आहे.

''या मार्गावरून परत फिरण्याचा मोह वारंवार होईल. निराशेचे कटू प्रसंग पांथस्थाच्या निश्चयाची कसोटी पाहतील. पण ज्यांचे हृदय कमकुवत नाही, त्यांच्या कष्टाला यश हटकून मिळणारच. धार्मिक बाबतीत जी निष्ठा दिसते, तशी निष्ठा ज्यांच्यापाशी आहे, अशा देशवासीयांनी पुरेशा संख्येने पुढे येऊन हे काम हाती घेतले, तर यश मिळणे दूर नाही. सार्वजनिक जीवनात आध्यात्मिकता आली पाहिजे. देशप्रेम हृदयात इतके भरले पाहिजे की त्यापुढे इतर गोष्टी किरकोळ वाटल्या पाहिजेत. मातृभूमीसाठी त्याग करण्याच्या

प्रत्येक संधीचा उत्साहाने स्वीकार करणारे उत्कट देशप्रेम असले पाहिजे. .....''

हिंद सेवक समाज अशा तरुणांना सनदशीर मार्गाने देशहित साधण्यासाठीचे प्रशिक्षण देणार होता. त्यासाठी सहा उद्दिष्टे निवडली होती. पहिले म्हणजे सेवकांनी आपल्या आचरणातून आणि उदाहरणाने मातृभूमीबद्दल अलोट प्रेम देशबांधवांमध्ये निर्माण होईल, हे पाहणे की जेणेकरून त्यांनी सर्वोच्च सेवा आणि त्याग यासाठी तयार असले पाहिजे. दुसरे म्हणजे लोकांसमोरील सार्वजनिक प्रश्नांचा साक्षेपाने अभ्यास करून राजकीय शिक्षण आणि आंदोलने यांचा मार्ग पत्करून देशाचे सार्वजनिक जीवन बळकट करणे. तिसरे हे की सेवकांनी विविध समाजघटकांमध्ये सौहार्द आणि सामंजस्य घडवून आणायचे होते. सेवकांनी तीन प्रकारच्या शिक्षणामध्ये विशेष लक्ष घालायचे होते. ते म्हणजे स्त्रिया आणि मागासवर्गाचे शिक्षण आणि तिसरे होते औद्योगिक तंत्र शिक्षण. देशाच्या औद्योगिक विकासाकडे आणि दलित वर्गाच्या उन्नतीकडे सेवकांनी अधिक लक्ष द्यायचे होते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चा अनुभव घेतल्यानंतर गोखल्यांना हे प्रकर्षाने जाणवू लागले होते की देशकार्यासाठी पूर्णवेळ देणारे प्रशिक्षित आणि त्यागी तरुण नसतील तर फावल्या वेळात प्रसिद्धीसाठी अल्पजीवी आवेशाने काम करणारी नेते मंडळी पुढे येतात; पण ते फार काही साध्य करू शकत नाहीत. अधिवेशन भरवणे आणि त्यात ठराव पास करणे या पलीकडे काँग्रेसचे काम गेले पाहिजे ही गोखल्यांची तळमळ होती. देशात संन्यस्त वृत्तीने काम करण्याची एक परंपरा होती. तिचा सार्वजनिक क्षेत्रात वापर करून घेणारा हा प्रयोग होता. फर्ग्युसन कॉलेजमधील निरोप समारंभात उत्तरादाखल केलेल्या (आणि अजूनही प्रसिद्ध असलेल्या) भाषणात त्यांनी याचा उल्लेख केला होता. ते म्हणाले होते की डे.ए. सोसायटीचा मुख्य नैतिक उद्देश हा भारतीय लोक नागरी क्षेत्रात स्वार्थाचा विचार न करता निष्ठापूर्वक व संन्यस्त वृत्तीने काम करू शकतात हे सिद्ध करणे हा होता.

आपल्या प्रयोगाला कितपत प्रतिसाद मिळेल याबद्दल गोखले अर्थातच साशंक

होते. येतील किती, शिकतील किती आणि टिकतील किती, यातल्या कशाचा अंदाज येत नव्हता. संस्थेसाठी जागा, इमारत आणि सेवकांच्या राहण्याजेवण्याचा खर्च यासाठी पैसा उभा राहील का हा सुद्धा एक प्रश्न होता. सरकार अशा राष्ट्रीय मिशनरी तयार करू पाहणाऱ्या संस्थेला परवानगी देईल का, ही शंका सुद्धा रास्त होती. ''या अवघड जबाबदारीला पेलताना मला बळ येते ते या कामाला दैवी आशीर्वाद आहेत या विश्वासानेच !'' असे गोखले म्हणत असत.

मुंबईचे राज्यपाल लॅमिंग्टन यांच्या स्वीय सचिवांची भेट घेऊन हिंद सेवक समाजाबद्दल एकूण योजना त्यांच्या कानावर घालण्यात आली. लगोलग राज्यपालांनी आपला अभिप्राय तत्कालीन व्हाइसरॉय कर्झन यांना कळविला. त्याचा मथितार्थ असा होता की नवीन पिढीमध्ये राजद्रोही आणि बेताल वृत्ती वाढीस लागू नये यासाठी त्यांच्यासमोर त्यागवृत्तीने काम करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांचे उदाहरण ठेवणे आवश्यक होते आणि त्यातून लोकांची राजकीय समज एक ना एक दिवस नक्की विकसित होईल, असा विश्वास गोखल्यांनी व्यक्त केला होता. असे जरी असले तरी राज्यपाल महोदयांच्या सल्लागारांच्या मते गोखल्यांची पावले आता अशा दिशेने पडू लागली होती की एक दिवस ते सरकारच्या विरोधात दंड थोपटून उभे राहणार हे निश्चित. व्हाइसरॉय कर्झन यांना गोखल्यांच्या कायदेमंडळातील कामगिरीने प्रभावित केले असले तरी ते गोखल्यांकडे संशयानेच पाहत. सरकारच्या कायम विरोधात असलेले ''पुणेकर चित्पावन ब्राह्मण'' हा शिक्का त्यांच्यावर होताच. हिंद सेवक समाजाबद्दल त्यांची प्रतिक्रिया अशी होती की एक तर गोखल्यांना आपण कुठे जात आहोत हे दिसत नाहीये किंवा दिसत असले तर ते लपवाछपवी करीत आहेत. 'एका बाजूला तुम्ही राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करीत आहात तर मग त्याबरोबर ब्रिटीश राजवटीवर निष्ठा तुम्ही कशी बाळगू शकता?'

काँग्रेसमधल्या जुन्या मंडळींना वेगळीच चिंता वाटत होती. गोखल्यांचे चेले राजकीय मिशनरी बनून आले तर ते जुन्या नेतृत्वाला आव्हान देऊ शकतील ही भीती त्यांना होती. मुस्लिमांचे नेते आगाखान यांना मात्र हिंद सेवक समाज कल्पनेचे मोठे

कौतुक वाटले आणि त्यांनी भरघोस देणगीही देऊ केली. हिंद सेवकांचे राष्ट्रीयत्व हे धर्मातीत असणार हे आगाखान यांना भावले होते. परंतु नेमकी तीच गोष्ट ब्रिटीश अधिकाऱ्यांना डाचत होती. अशा तऱ्हेचे हिंदु-मुस्लिम ऐक्य हे ब्रिटीश सत्तेला घातक ठरेल हा त्यामागचा तर्क होता. ब्रिटीश अधिकाऱ्यांनी हिंद सेवक समाजाला वेसण कशी घालता येईल याबद्दल आगाखान यांची चाचपणी करून पाहिली. पण गोखले हे धूर्त आणि आगाखान बेभरवशाचे, असे ब्रिटीशांचे मूल्यांकन असल्याने हे मनसुबे पुढे गेले नसावेत.

गोखल्यांचा ध्येयवाद उच्च कोटीचा होता. आपल्या तरुण कार्यकर्त्यांमध्ये तो उतरावा यासाठी प्रशिक्षण, वर्तन आणि शिस्त यावर भर देणारी नियमावली त्यांनी तयार केली होती. संन्यस्त वृत्तीने राजकीय आणि सामाजिक जागृती करणारे मिशनरी त्यातून तयार व्हावे ही कल्पना होती. प्रशिक्षण काळात महिना ३० रुपये विद्यावेतन आणि पूर्ण सदस्याला मासिक मानधन ५० रुपये देण्याची योजना होती. याव्यतिरिक्त सदस्यांनी वैयक्तिक उत्पन्न ठेवायचे नाही, असा नियम होता. याचे कारण म्हणजे डे.ए. सोसायटीत या मुद्द्यावरूनच मोठे वादंग झडले होते. त्यावेळेस गोखल्यांच्या गणितावरील पुस्तकाला मागणी असल्यामुळे त्यांना पैसे मिळतात, हे कारण इतरांना मिळाले होते. तो अनुभव गाठीशी असल्याने हिंद सेवक समाजात सुरवातीपासूनच गोखल्यांनी ही काळजी घेतली होती आणि वैयक्तिक भांडणांना थारा दिला नव्हता. आपल्या सभा बैठकांचे मिळणारे भत्ते देखील गोखले संस्थेत जमा करीत असत आणि हा प्रघात आजतागायत संस्थेत चालू आहे.

देवधर, पटवर्धन आणि द्रविड या तिघांनी स्थापनेच्या दिवशी, १२ जून १९०५ ला गोखल्यांच्या बरोबर शपथ घेऊन हिंद सेवक समाजाच्या कामास सुरवात केली. गोखल्यांच्या बाबतीत त्यांच्या जीवनातल्या संपूर्णपणे समर्पित पर्वाला सुरवात झाली होती. 'अनिश्चितता असली तरी आपण पराकाष्ठा करायची, मग काय होईल ते होवो' हा भाव त्यांच्या मनात होता. पुढचे दशक त्यांच्या आयुष्यातले अखेरचे पर्व

ठरणार होते.

पुढल्या दोन वर्षांत सदस्यांची संख्या दुप्पट म्हणजे आठ झाली. क्रमाक्रमाने त्यात वाढ होऊन गोखल्यांच्या अंतसमयी ती सत्तावीस पर्यंत जाऊन पोचली होती. संस्थेची पहिली शाखा मद्रास येथे सुरु झाली आणि नंतर लगेचच नागपूर, मुंबई आणि अलाहाबाद येथे आणखी शाखा उघडण्यात आल्या. पुढे अंबाला, कटक आणि कालिकत येथे संस्थेची केंद्रे सुरु झाली. गोखल्यांचे स्वप्न हे त्याकाळच्या २७५ जिल्ह्यांमधून प्रत्येकी एक हिंदसेवक नेमण्याचे होते. विद्यापीठातील पदवी आणि सार्वजनिक कार्याची आवड असणे हे सेवकासाठी आवश्यक होते.

संस्थेत प्रवेश घेण्याआधी संस्थेच्या कामाची ओळख उमेदवाराने करून घ्यावी आणि आपल्याला ही जबाबदारी पेलता येईल का याचा अंदाज घ्यावा अशी योजना केलेली होती. त्याचबरोबर गोखल्यांच्या छाननीतून तो पसंत पडला तरच निवड होत असे. उमेदवाराने संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी सहा महिने संस्थेत राहावे आणि अनुभव घ्यावा आणि या काळात गोखल्यांना त्याची बौद्धिक क्षमता, देशप्रेम आणि मानसिक तयारी यांचा अंदाज यावा अशी योजना केलेली होती.

प्रत्येक हिंदसेवकावर ''प्रथम सदस्य'' या नात्याने गोखल्यांचे बारीक लक्ष असे. अभ्यास, वाचन, लेखन, चर्चा याचबरोबर प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन भेटीगाठी घेणे, तसेच प्रसंगी भाषण करणे अशी कामे नेमून दिली जात. 'ब्राह्मण-ब्राह्मणेतर' यासारख्या विषयांवर वादचर्चा ठेवल्या जात. गोखले स्वतः निरनिराळ्या विषयांवर बोलत असत. सदस्यांना विवाह करण्यास आडकाठी नव्हती, परंतु कुटुंबासह संस्थेच्या निवास स्थळी राहण्याची परवानगी नव्हती.

सदस्यांसाठी नियमावली गोखल्यांच्या मनातल्या आदर्श हिंदसेवकाच्या प्रतिमेवरुन बेतलेली होती. न्या रानड्यांची शागिर्दी करताना गोखल्यांना स्वतःला साधेपणा, बौद्धिक कुतूहल, कामाची आखीव आणि शिस्तबद्ध पद्धती या गोष्टींचे महत्त्व जाणवून त्या अंगी बाणवाव्या लागल्या होत्या. त्यानुसार अभ्यास करून वैचारिक बैठक तयार करणे

आणि संस्थेची शिस्त पाळणे हे सर्वांनाच झेपणारे नव्हते. त्यामुळे काही सदस्य कुटुंबियांच्या दडपणाखाली तर काही सरकारी नोकरीच्या आकर्षणापायी राजीनामा देऊन बाहेर गेले होते. विशेष म्हणजे प्रवेश दिलेल्यांत एका मुस्लिम तरुणाचाही समावेश होता. तो नंतर सोडून गेला हा भाग अलाहिदा.

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांत संस्थेचे बरेच उपक्रम चालू असत. त्यात किती वैविध्य होते पहा. काँग्रेसच्या अधिवेशनाचे संघटन करणे हिंदसेवकांकडे सोपविले जात असे. पुण्यात 'ज्ञानप्रकाश' हे मराठी वृत्तपत्र संस्थेतर्फे चालविले जाई. नंतरच्या काळात नागपूरचे 'हितवाद' (इंग्रजी) आणि लखनौचे 'हिंदुस्थान' (उर्दू) ही वृत्तपत्रे संस्थेने चालविण्यास घेतली. १९०७ मध्ये प्लेगविरोधात मोहीम सुरु करण्यात आली आणि देवधर हे प्लेगनिवारण समितीचे कार्यवाह म्हणून काम पाहत होते. पूर, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी संस्थेला मदतीसाठी बोलावणे येत असे. संयुक्त प्रांत, गुजरात, बिहार, विदर्भ आणि मद्रास या प्रांतांत हिंद सेवक समाजाने दुष्काळग्रस्त वा पूरग्रस्त मदत केंद्रे उघडून मोलाचे काम १९०७ ते १९१३ या वर्षांत निरलसपणे केले. गोखल्यांनी आपले शिक्षणविषयक विधेयक कायदेमंडळात मांडले, तेव्हा त्याच्या समर्थनार्थ हिंदसेवकांनी देशभर दौरे काढले. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणावर उपाय म्हणून सहकारी पतसंस्था सुरु करण्याचा प्रयोग संस्थेने मुंबई, मद्रास, संयुक्त प्रांत आणि मध्य भारत या इलाख्यांत केला. १९११ मध्ये पुण्याजवळ हडपसर सहकारी पतसंस्था रु ८५००० भाग भांडवलावर सुरु करण्यात आली. मुंबई येथे अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी इंडियन इकनॉमिक सोसायटी स्थापन करण्यात आली.

एकुणात सार्वजनिक प्रश्नांवर जनजागृती आणि सार्वजनिक कल्याणाचे उपक्रम यांवर संस्थेचा भर होता आणि त्यासाठी प्रकाशन आणि सरकार, इतर संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्याबरोबर सहकार्य या माध्यमांचा वापर केला जात होता. स्थानिक परिस्थितीला अनुकूल काम करण्यासाठी स्थानिक सहकार्य महत्त्वाचे मानले जाई.

कामाचा विस्तार जसा झाला तसा संस्थेच्या निधीवरचा ताण वाढू लागला. पैसे गोळा करण्यासाठी गोखल्यांनाच प्रतिष्ठितांकडे शब्द टाकावा लागे. छापखान्यासारख्या अर्थव्यवहारांची जबाबदारी ज्यांच्याकडे दिली होती त्यांच्याकडून ती दरवेळेस दक्षतेने पार पाडली जाणे शक्य नव्हते. त्यामुळे गोखल्यांची कमालीची घालमेल होत असे. त्यात भर पडायची ती पुण्यातील टिळकपक्षीय मंडळींनी केलेल्या गोखल्यांच्या निन्दानालस्तीची. टिळकांनी त्यांना वेसण घालण्याचा प्रयत्न कधी केल्याचे दिसून आले नाही. १९०८मध्ये उसळलेल्या हिंसाचाराच्या घटनांमुळे राजकीय वातावरण स्फोटक बनले होते. त्यात आपल्या हिंदसेवकांनी काही अनुचित वक्तव्य करू नये म्हणून सुद्धा गोखले जागरूक असत.

संस्थेच्या विस्ताराबरोबर संशयखोर ब्रिटीश सरकारची हिंदसेवकांवर टेहळणी सुरु झाली. त्याबद्दल शाही कायदेमंडळात बोलताना गोखले म्हणाले होते की ''आमच्या विवेकबुद्धीला स्मरून देशाची सेवा कशी करायची ते आम्ही ठरविले आहे, तेव्हा त्या निर्णयाचे सर्व परिणाम भोगायला आम्ही तयार आहोत. फक्त टेहळणी अशा बेताने करा की आम्हाला कामात कमीतकमी व्यत्यय येईल.'' त्यांचे सौम्य वक्तव्य देखील किती धारदार असू शके हे यावरून लक्षात येईल. व्हाइसरॉयचे वित्तविषयक सदस्य फ्लीटवूड विल्सन यांनी संस्थेला भेट देऊन हिंदसेवक मंडळींसमवेत चर्चाही केली. संस्थेची इमारत आणि सोयीसुविधा उत्कृष्ट असल्याचा अभिप्राय त्यांनी नोंदविला. हिंदसेवक हे तरुण मोकळेपणे, दिलखुलास पद्धतीने आणि स्वतंत्र मतप्रणालीला अनुसरून माझ्याबरोबर बोलले, असे त्यांनी नमूद केले. परंतु या मंडळींचा अंतःस्थ हेतू काही वेगळा आहे की काय याचा त्यांना काही थांगपत्ता लागला नाही.

हिंद सेवक समाजापासून प्रेरणा घेऊन देशाच्या इतर भागांत वेगवेगळ्या संस्था उभ्या राहिल्या. धोंडो केशव कर्वे यांचा 'निष्काम कर्म मठ'(१९०८), लाला लजपतराय यांची 'सर्वण्ट्स ऑफ पीपल सोसायटी' (१९२१), ॲनी बेझंट यांची 'सन्स ऑफ इंडिया' (१९०९) आणि गांधीजींचे आश्रम (साबरमती –१९१५) यांचा या संदर्भात

उल्लेख करता येईल.

गोखल्यांची राजकीय सामाजिक प्रबोधिनी आणि गांधींचा सेवाश्रम यामध्ये त्यागी वृत्ती, साधी राहणी आणि समर्पित भाव या गोष्टींचे साम्य असले तरी काही महत्त्वाचे फरक होते. सामाजिक राजकीय कामामध्ये भाव आणि वृत्ती यांच्या जोडीने अभ्यास, ज्ञान आणि परिस्थितीची जाण या गोष्टी हिंदसेवकाजवळ असणे गोखल्यांच्या दृष्टीने आवश्यक होते. तर गांधींच्या मताने नैतिक धारणा प्रबळ असणे अत्यंत महत्त्वाचे होते. एकूण संसदीय लोकशाहीबद्दल इंग्लंडमधील वास्तव्यापासूनच गांधींच्या मनात प्रतिकूल मत बनत गेले होते. त्यामुळे त्या धर्तीच्या राजकारणाचा अभ्यास त्यांना उच्चभ्रू मंडळींचा एक उपक्रम वाटत असे. गांधींनी हिंद सेवक समाजात दाखल होण्याबद्दल सुरवातीला त्यांना आणि गोखले दोघांनाही उत्साह वाटत होता, तो कालांतराने मावळत गेला असावा असे मानण्यास जागा आहे. याचे कारण दोघांच्या संसदीय राजकारणाविषयीच्या मूलभूत दृष्टिकोनात अंतर होते. इतर ज्येष्ठ हिंदसेवक मंडळींना गांधींच्या दृष्टिकोनाबद्दल संदिग्धता वाटत होती. गांधींनाही ते जाणवू लागले होते.

सुरवातीच्या हिंदसेवकांनी निरनिराळ्या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्यापैकी काहींबद्दल लिहिणे अप्रस्तुत होणार नाही.

श्रीनिवास शास्त्री हे मद्रास प्रांतिक मंडळ, शाही कायदेमंडळ आणि प्रिव्ही कौन्सिल चे सदस्य राहिले होते. जेव्हा राष्ट्रसंघाची स्थापना झाली, त्यावेळेस त्यांनी भारताचे प्रतिनिधी म्हणून त्यात भाग घेतला होता. इंग्रजी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व जगभर वाखाणले गेले होते.

पंडित हृदयनाथ कुंझरू यांनी संसदपटू म्हणून बहुविध कामगिरी बजावली. ते घटनासमितीचे सदस्य होते आणि सरकारचा लोकांवरील प्रभाव हा अमर्याद राहू नये म्हणून ते प्रयत्नशील होते. भारतातील खासगी रेल्वे कंपन्यांचे भारतीय रेल्वे यंत्रणेमध्ये एकत्रीकरण, राष्ट्रीय छात्र सेना एनसीसी आणि राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी एनडीए यांची स्थापना तसेच राज्य पुनर्रचना आयोग यांच्यामध्ये मोलाची कामगिरी पं कुंझरू यांनी

बजावली. त्याबद्दल त्यांना 'भारत रत्न' देण्याचा प्रस्ताव झाला, पण तो त्यांनी नाकारला, कारण लोकशाहीमध्ये अशा प्रकारचे सन्मान गैरलागू आहेत, अशी त्यांची भूमिका होती.

आदिवासी आणि हरिजन यांच्या सेवेसाठी आयुष्य समर्पित करणारे ठक्कर बाप्पा हे हिंद सेवक समाजाचे पहिल्या फळीतील सदस्य होते. अमृतलाल ठक्कर हे सरकारी नोकरी सोडून गोखल्यांना येऊन मिळाले होते. गांधीजी त्यांना 'बाप्पा' म्हणून संबोधत. त्यामुळे तेच नाव लोकांमध्ये प्रसिद्ध झाले. ठक्कर यांनी स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊन मुंबई महानगरपालिकेत नोकरी केली आणि ती करीत असताना मैला सफाई कामगारांची दैन्यावस्था पाहून त्यांनी त्यांच्यासाठी काम करण्याचे ठरविले. देशभरातील सर्व आदिवासी भागांना भेटी देऊन त्यांनी आदिवासींच्या समस्यांकडे लक्ष वेधले होते. ते सर्व प्रवास हा रेल्वेच्या तिसऱ्या वर्गातून करीत असत.

कामगार पुढारी नारायण मल्हार जोशी हे हिंद सेवक समाजात १९०९ मध्ये दाखल झाले. सुरवातीला त्यांनी दुष्काळ आणि पूर मदत केंद्रात स्वयंसेवक म्हणून काम करू इच्छिणाऱ्यांसाठी सोशल सर्विस लीग ही प्रशिक्षण देणारी संस्था १९११ मध्ये स्थापन केली होती. १९२० मध्ये अखिल भारतीय कामगार संघटना काँग्रेस च्या स्थापनेत त्यांचा सहभाग होता. १९२५ ते १९२९ या काळात ते आयटकचे सरचिटणीस होते. कामगार चळवळीतील त्यांच्या कामामुळे त्यांना कायदेमंडळात कामगार प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यात आले होते, तसेच आंतरराष्ट्रीय मजूर संघटन (ILO) च्या नियामक मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. कामगार कल्याणाचे कायदे संमत करून घेण्यात त्यांचा मोठा वाटा होता. सोशल सर्विस लीग च्या द्वारे १९२५ मध्ये त्यांनी हिंदुस्तानातील पहिला सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण कार्यक्रम सुरु केला. तो आजतागायत चालू आहे. या त्यांच्या कामामुळे ना. म. जोशी यांना भारतातील आधुनिक समाजकार्य विद्याशाखेचे एक प्रणेते म्हणून मानले जाते.

हिंद सेवक समाजाच्या ऐतिहासिक कामगिरीचा आढावा घेताना हे लक्षात येते

की भारतातील लोकशाहीच्या स्थापनेचा तळागाळातला पसारा हा अवाढव्य होता आणि त्याला आकार देण्यासाठी संस्थात्मक संरचनेची गरज होती. संघटन आणि कायदे या दोन्हींची जनतेच्या समस्यांशी जोड घालणारे वैचारिक नेतृत्व देशाला हवे होते. आदिवासी, अस्पृश्यता, कामगार, सार्वजनिक सेवा आणि संरक्षण इतके विविध विषय हिंदसेवकांनी हाताळलेले आपल्याला दिसतात. वर उल्लेखिलेल्या नामवंतांनी आणि त्यांच्यासारख्या इतर हिंदसेवकांनी कृतिशील वैचारिक नेतृत्वाची भूमिका विविध क्षेत्रांत निरलसपणे बजावली. गोखल्यांनी हिंद सेवक समाजाच्या रूपाने त्याग आणि सेवा वृत्तीला वैचारिक आणि मूल्यात्मक बैठक देणारी व्यवस्था निर्माण केली होती.

◆◆◆

# ७ गोखल्यांचे अर्थकारण

माहितीवरचे प्रभुत्व, युक्तिवादाची तर्कशुद्ध मांडणी आणि देशाच्या उन्नतीबद्दलची तळमळ ही गोखल्यांच्या बाबतीत त्यांच्या कायदेमंडळातील अंदाजपत्रकावरील भाषणांत ठळकपणे दिसून येत असे. त्यांना अनधिकृत 'विरोधी पक्ष नेते' असे संबोधले जाई आणि ब्रिटीश मुलकी अधिकारी त्यांच्या भाषणांनी प्रभावित होत असत. १९१२मध्ये व्हाइसरॉयच्या मंडळात गोखल्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्वायत्तता सुधारण्यासाठी एक समिती नेमावी असा ठराव आणला, तेव्हा ब्रिटीश सदस्य सर जेम्स मेस्टन काय म्हणाले ते पाहण्यासारखे आहे: '' गोखल्यांचे भाषण ऐकताना मला हटकून हिंदुस्थानी जादूगाराची छबी समोर दिसू लागते. तो काय करतो तर रिकाम्या कुंडीत आंब्याची कोय पुरतो आणि वरती कापड झाकून टाकतो. थोड्या वेळात तो झर्रकन ते कापड ओढतो आणि तुम्हाला कैऱ्या लटकलेले आंब्याचे झाड दिसायला लागते. गोखल्यांचे प्रस्ताव तसे असतात. आम्ही काही तरी उत्तर देऊन त्यांना वाटेला लावतो आणि कुंडीवर फडके टाकतो. पण आमच्या लक्षात यायच्या आत गोखले ते कापड ओढतात आणि आमच्या समोर मोहराचा बहर आलेले झाड उभे झालेले असते.'' याचे रहस्य असे होते की सरकारी अधिकाऱ्यांना सहज उपलब्ध असलेली परंतु इतरांना दुष्प्राप्य असणारी माहिती अत्यंत साक्षेपाने गोळा करून तिचे मंथन करून तिच्या मुळात काय दडले आहे हे शोधण्याची किमया त्यांना साध्य झाली होती. न्या. रानडे आणि रा.ब.गणेश व्यंकटेश जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गोखल्यांनी अर्थशास्त्राचे धडे गिरविले होते. रानड्यांकडून सर्वात मोठे कौतुकाचे शब्द म्हणजे ''चालेल'' (That will do) एवढेच असत. त्यामुळे उथळ युक्तिवाद, अपुरी किंवा चुकीची माहिती आणि केवळ टीकेसाठी टीका हे दोष त्यांच्या मांडणीत कधी शिरले नाहीत.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या पाव शतकात ब्रिटीश अर्थनीती ढोबळ मानाने आयकर, मिठावरील कर, आयात शुल्क या मार्गांनी उत्पन्न वाढविण्याची असे. अफगाण

युद्ध तसेच ब्रह्मदेशातील लष्करी कारवाई यामुळे ब्रिटीश तिजोरीवर जो भार पडे, तो कर आकारणी वाढवून भरून काढायचा आणि नाईलाज झालाच तर दुष्काळासाठी प्रांतिक सरकारांना अनुदाने द्यायची त्यांची रीत होती. समजा 'तूट वाढू लागते आहे' असे दिसले तर दुष्काळ निवारणाची अनुदाने स्थगित करून टाकायची, असा त्यांचा शिरस्ता होता. कपडा उत्पादनांवर आयात शुल्क वाढविल्यावर मँचेस्टरच्या कापड उद्योगांनी ओरड केली, तशी त्यांचे शुल्क कमी करून भारतातील कापड निर्मितीवर अबकारी कर बसविण्यात आला. याच कालावधीत भारतातील शिक्षित वर्ग भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कडे आपल्या आकांक्षांना संधी मिळेल, या मोठ्या आशेने पाहत होता. ब्रिटीशांची अर्थनीती या वर्गाला अर्थातच जाचक वाटू लागली होती. काँग्रेसच्या पहिल्याच अधिवेशनात लष्करी खर्च वाढत असल्याबद्दल ठराव पास करण्यात आला होता आणि आर्थिक धोरण बदलण्याची गरज व्यक्त करण्यात आली होती. दादाभाई नवरोजी, न्या महादेव गोविंद रानडे आणि रा.ब. ग.व्यं.जोशी ही मंडळी आर्थिक प्रश्नांवर बोलत आणि लिहीत होती. रानड्यांनी भारताच्या राजकीय अर्थव्यवहाराचा ऊहापोह करून देशाच्या आर्थिक उन्नतीसाठी सरकारने स्वस्त भांडवलाचा पुरवठा करणे कसे आवश्यक आहे याकडे लक्ष वेधले होते. रानड्यांच्या अर्थविचाराचे दुसरे सूत्र असे होते की पाश्चात्यांच्या सुसंघटित कौशल्य (आजच्या भाषेत, तंत्रज्ञान) आणि विज्ञानाची बरोबरी करायची असेल तर आपल्याला आपला आळस आणि अडाणीपणा दोन्ही सोडून द्यावे लागतील. अशा वातावरणात गोखल्यांकडे सार्वजनिक सभेच्या त्रैमासिक पत्रिकेच्या संपादकत्वाची जबाबदारी आली.

ब्रह्मदेशाला ब्रिटीश भारतात सामील करून घेतल्याने सरकारी तिजोरीवर जो भार १८८८ मध्ये पडला होता, तो भरून काढण्यासाठी मिठावरील कर दर मणामागे २ रुपयांवरून २.५० रुपये करण्यात आला. आता हा भार सर्वसामान्य गरीब जनतेवर पडणार हे माहीत असूनही आयकर वाढविण्याचा दुसरा पर्याय निवडण्यात आला नाही. याचे कारण म्हणजे श्रीमंत वर्गाचा आयकर वाढविण्याला विरोध होता. वास्तविक व्हाइसरॉय पासून सर्व प्रशासकांना मिठावरील कर हा गरीबांना जाचक ठरतो, हे पटले

होते. तरीही तोच पर्याय निवडला गेला. रा.ब.जोशी यांनी एक लेख लिहून 'ब्रिटीश सरकार आयकर वाढवीत नाही, लष्करी खर्च कमी करत नाही किंवा त्यातला काही हिस्सा ब्रिटनमधील सरकारकडून मागत नाही किंवा आयात करही वाढवीत नाही; उलट सर्वसामान्य भारतीय जनतेकडून दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक अशा मिठावर कर लादणे अन्यायकारक आहे' हे मांडले होते. या कराला देशभरातून विरोध झाला, तरी ब्रिटीश सरकारने त्याची फिकीर केली नाही.

१८९०च्या कलकत्ता काँग्रेसमध्ये गोखल्यांनी मिठावरील करावर टीका करताना म्हटले की कराचा दर कमी ठेवल्याने वापर वाढतो आणि त्यामुळे कराचे उत्पन्न वाढते. तेच तुम्ही दर वाढवला तर वापरावर मर्यादा येतात, परिणामी कराचे उत्पन्न घटते, हा सुप्रतिष्ठित निकष मिठाच्या बाबतीत सोडून देणे हा अर्थशास्त्र आणि मुत्सद्देगिरी दोन्हीमध्ये न बसणारा निर्णय होता.

पुढच्याच वर्षीच्या काँग्रेसमध्ये शिक्षणविषयक ठरावावर बोलताना त्यांनी भारताची तुलना युरोपीय देशांशी केली. शाळेत जाण्याच्या वयामध्ये युरोपातील ९० टक्के मुले शाळेत दाखल असतात, तर हेच प्रमाण भारतात ११ टक्के आहे. तसेच युरोपातील देश आपल्या उत्पन्नाच्या ६.५ टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करतात तर भारतामध्ये हे प्रमाण १ टक्का इतकेच आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की आज सव्वाशे वर्षांनंतरही भारतामध्ये शिक्षणावरील सरकारी खर्चात लक्षणीय वाढ दिसत नाही.

तत्कालीन आर्थिक व्यवस्थेचे एक वैशिष्ट्य असे होते की भारतीय रुपयाचे विनिमय मूल्य हे सोन्याच्या भावावर ठरत असे. ब्रिटनमधील भारतविषयक विभागांचा तसेच निवृत्त अधिकाऱ्यांच्या निवृत्तिवेतनावरचा खर्च भारताच्या तिजोरीतून भागविला जाई. रुपयाची सोन्यातली किंमत कमी होऊ लागली तशी पौंडातल्या खर्चासाठी अधिकाधिक रुपये मोजावे लागत असत. रुपये चांदीचे असल्याने चांदीचा भाव घसरू लागला तरीही पौंड रुपयाच्या भावात महाग होत असे. भारतातून पैसे इंग्लंडांत पाठविताना पौंडाचा दर चढा राहिल्याने भारताची गंगाजळी रिकामी होऊन तूट वाढू लागल्यावर

चांदीचे रुपये त्रासदायक ठरू लागले आणि त्या टांकसाळीवर १८९३ मध्ये टाळे ठोकावे लागले. रुपयाचे घसरते मूल्य त्यामुळे सावरले गेले आणि जरी निर्यातदारांनी ओरड केली असली तरी शेवटी त्यांना जुळवून घ्यावे लागले. १८९९ मध्ये सुवर्णाधारित चलनप्रणाली मान्य करण्यात आली. उत्पन्न वाढविण्यासाठी आधीच्या कंपनी सरकारने सर्व आयातीवर ५ टक्के आयात कर बसविलेला होता. जसजसा भारतीय गिरण्यांचा कापड व्यापार वाढू लागला, तसतशी मँचेस्टरच्या कापड उत्पादकांची 'आयात कर हटवा' म्हणून ओरड सुरु झाली.

१८७८ च्या दुष्काळातून मद्रास इलाखा अजून वर यायचा होता. जमीन महसुलात नवीन अधिभार चढविण्यात आले होते. अंदाजपत्रकात तूट दिसत होती आणि दुष्काळ निवारण निधी रिकामा झालेला होता. अफगाण युद्धाचा खर्च भारताच्या तिजोरीतून भागवला जात होता. अशा परिस्थितीत केवळ लँकेशायर उद्योगांच्या दबावाला बळी पडून काही कापड उत्पादनांवरचा आयात कर काढून टाकण्यात आला. हेच धोरण चालू राहून १८९४ पर्यंत पेट्रोल वरील आयात कर सोडला तर बाकी सर्व आयात ही करमुक्त करण्यात आली. परंतु ज्यावेळेस जमाखर्चातील तूट २ कोटीपर्यंत पोचली तेव्हा पुन्हा एकदा सुती धागा आणि कापड सोडून इतर बहुतेक सर्व वस्तूंवर ५ टक्के आयात कर बसविण्यात आला. लँकेशायरला पक्षपाती लाभ देणाऱ्या या धोरणाला अर्थातच भारतातून विरोध व्यक्त झाला. मग सरकारने शक्कल अशी लढविली की सुती धागा-कापड यांच्या आयातीवर ५ टक्के आयात कर बसविताना भारतातल्या धागा आणि कापड उत्पादनावर ३.५ टक्के अबकारी कर बसविण्यात आला, जेणेकरून भारतीय उत्पादन मँचेस्टरच्या तुलनेत फार स्वस्त ठरू नये. युरोपीय आणि भारतीय गिरणी मालक या प्रश्नावर एकत्र आले आणि अबकारी कराला जोरदार विरोध करू लागले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. ब्रिटनच्या साम्राज्यवादी आर्थिक नीतीचे हे ढळढळीत उदाहरण होते.

१८९६-९७ आणि १८९९ च्या भीषण दुष्काळांनी भारतीय कृषिव्यवस्थेचे कंबरडे मोडले. पिके, चारा आणि धावती- दुभती जनावरे या सर्वांच्या विनाशाच्या जोडीला साथीचे

रोग फैलावले आणि जीवितहानी सुद्धा झाली. या दारुण अनुभवातून बोध घेण्यासाठी आणि उपाययोजना करण्यासाठी दुष्काळ आयोग नेमण्यात आले. दुष्काळ निवारणासाठी प्रत्यक्ष मदत आणि महसुलातून सूट या दोहोंचा भार सरकारी तिजोरीवर पडणे अपरिहार्य होते.

दादाभाई नवरोजी यांनी सातत्याने भारतातून संपत्तीची गळती होत असल्याची टीका ब्रिटीश संसद आणि वृत्तपत्रांत लावून धरली होती. ब्रिटनमध्ये घेतलेल्या कर्जावर व्याज पौंडात भरले पाहिजे, ब्रिटनमध्ये निवृत्तीनंतर स्थायिक झालेल्या सनदी अधिकाऱ्यांचे निवृत्तिवेतन पौंडात भरले पाहिजे आणि भारतातील यंत्रणा चालविण्यासाठी ब्रिटनमध्ये जे सरकारी विभाग नियंत्रण पाहतात, त्यांच्या खर्चाचा भार हा भारत सरकारने पौंडात उचलला पाहिजे. येथपर्यंत युक्तिवाद तर्कसंगत आहे. पण भारतीय उद्योगांना वाढू दिले, भारतीय पदवीधरांना पात्रतेनुसार वरिष्ठ पदे दिली आणि अधिकाधिक कारभार व्हाइसरॉय आणि त्यांचे कायदेमंडळ यांना दिले तर ही सर्व पौंडात चालणारी संपत्तीची गळती हळूहळू कमी होऊन थांबेल, असा दादाभाई प्रभृती मंडळींचा दावा होता. त्यात गोखल्यांनी भर घातली ती म्हणजे ब्रिटनच्या लढायांसाठी भारताने किती म्हणून भार उचलायचा या मुद्द्याची. ब्रिटनमधील मुत्सद्द्यांपैकी काहींना भारताकडून वसूल केले जाणारे मायदेशी खर्च हे गैरवाजवी आहेत, असे वाटत होते. त्यांचा पाठिंबा मिळविण्यासाठी गोखले प्रयत्नशील होते. 'गळती'मुळे भारतातील गरिबी वाढत आहे असे दादाभाई म्हणत होते. त्याचाच भाग म्हणून गोखल्यांची मागणी होती. अतिरिक्त वसूल केलेले पैसे ब्रिटनने परत केले पाहिजेत असेही गोखले मांडत होते.

## वेल्बी आयोग

दादाभाईच्या अथक कष्टांचा परिपाक म्हणून लॉर्ड वेल्बी यांच्या अध्यक्षतेखाली १८९५ मध्ये एक शाही आयोग नेमण्यात आला. त्याला नेमून दिलेले काम असे होते:'' भारतविषयक ब्रिटनमधील सक्षम मंत्री अथवा भारतातील व्हाईसरॉय यांच्या अधिकारात जो लष्करी आणि मुलकी खर्च केला जातो त्याचे प्रशासन व व्यवस्थापन यांच्याबाबत

वास्तव जाणून घेणे आणि भारत आणि ब्रिटन या दोहोंच्या हिताच्या खर्चाच्या बाबींमध्ये तो कसा वाटून घ्यायचा हे ठरविणे.'' इतर अनेकांबरोबर विल्यम वेडरबर्न आणि विल्यम केन यांच्यासह दादाभाई नवरोजी हेही त्याचे सदस्य होते. या तिघांचा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे या तिघांनी आपला वेगळा अल्पमतातील अहवाल शेवटी सादर केला. त्यांच्या मते बहुमत हे केवळ तांत्रिक बाबी जाणून घेण्यामध्ये गुंतले होते आणि ज्या मूळ व्यापक हेतूने आयोगाची स्थापना केली होती, त्याला ही मंडळी पूर्णपणे बगल देत होती. भारतातील ब्रिटीश प्रशासनामुळे भारताची आर्थिक स्थिती सुधारली आहे का खालावली आहे, हे जाणून घेणे हा व्यापक हेतू होता.

या आयोगासमोर साक्ष देण्यासाठी अधिकृत आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी असे बरेच जाणकार आले होते. डेक्कन सभेचे प्रतिनिधित्व करणारे आणि तिशीच्या उंबरठ्यावर असलेले गोखले हे त्या सर्वांमध्ये तरुण होते. पण न्या रानडे आणि रावबहादूर जोशी यांच्या तालमीत तयार झालेले गोखले पूर्ण अभ्यासानिशी आयोगाला सामोरे गेले आणि आयोग सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. या एकाच कामगिरीमुळे गोखल्यांकडे तत्कालीन राजनीती धुरीणांचे लक्ष वेधले गेले.

गोखल्यांच्या प्रतिपादनात ठळक मुद्दा हा होता की भारतातील आर्थिक धोरण ठरविण्यात भारतीयांना काहीच सहभाग देण्यात येत नव्हता. त्यामुळे ब्रिटीश सत्ताधाऱ्यांचे हित सांभाळण्याच्या भूमिकेतून लष्करी आणि मुलकी खर्च केला जात होता आणि वाढीव खर्चाचा भार करांच्या रूपाने भारतीयांना उचलावा लागत होता. त्यात आणखी भर म्हणून ब्रिटनच्या इतर वसाहतींसाठी देखील भारताच्या तिजोरीतून खर्च केला जाई. हे सर्व व्हाइसरॉयच्या अखत्यारीत येई आणि त्याच्यावर कुणाचेच – भारतात काय किंवा ब्रिटनमध्येही – प्रभावी नियंत्रण नव्हते. परिणामी भारतात शेती आणि उद्योग यांची वाढ होण्यासाठी लागणारे भांडवल पुरेशा प्रमाणात साचत नव्हते. म्हणून गरिबीचे प्रमाण वाढत होते. ही दारुण अवस्था बदलण्यासाठी आर्थिक पुनर्रचना करणे आवश्यक होते.

त्यासाठी भारतीय करदात्यांना कररुपी उत्पन्नातून जो खर्च केला जातो, त्याबद्दल

अधिकार असणे आवश्यक होते. तो नसल्यामुळे अनाठायी खर्चापोटी भारतातील संपत्तीचा विनियोग अन्य कारणांसाठी अन्य ठिकाणी केला गेलेला होता. कंपनी सरकार असताना ब्रिटीश संसदेचा अंकुश त्या सरकारवर होता. १८५८ नंतर तो देखील शिल्लक राहिला नाही. ब्रिटीश संसदेतील विरोधी पक्ष सुद्धा भारताचा विषय आला की मौन धारण करतात, असे गोखल्यांचे म्हणणे होते.

'भारतातल्या परिस्थितीबद्दल बोलायचे तर परराष्ट्र धोरण, लष्करी सज्जता आणि मोठे सार्वजनिक प्रकल्प वगळता बाकी सर्व आर्थिक बाबी प्रांतिक सरकारांकडे सोपविण्यात आल्या आहेत. व्हाइसरॉय यांच्या मंडळातील प्रत्येक सदस्य आपल्या अखत्यारीतील खर्च वाढविता कसा येईल, यावर लक्ष केंद्रित करतो. प्रांतिक सरकारांच्या आर्थिक नाड्या पुन्हा व्हाइसरॉयचे अर्थमंत्री हातात घट्ट धरून ठेवतात. त्यामुळे विकेंद्रीकरण प्रत्यक्षात उतरताना दिसत नाही.'

गोखल्यांनी यावर उपाय सुचविले होते. पहिला म्हणजे भारताचे अंदाजपत्रक व्हाइसरॉय यांच्या कायदेमंडळात संमत झाले पाहिजे. त्यातील प्रत्येक बाबीवर चर्चा होऊन सरकारचे हेतू आणि कृती दोन्ही लोकांच्या नजरेस पडून पारखले जातील. दुसरे म्हणजे भारतीय करदात्यांना आर्थिक धोरणावर आपले म्हणणे किंवा गाऱ्हाणे मांडण्यासाठी एक व्यासपीठ ब्रिटनमध्ये उपलब्ध असले पाहिजे. ते नसल्यामुळे व्हाइसरॉय आणि त्यांचे सल्लागार यांना भारतीयांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करणे सहज शक्य झाले आहे. गोखल्यांनी सुचविलेला आणखी एक उपाय हा कायद्यात दुरुस्ती करण्याचा होता. म्हणजे भारताच्या सीमांबाहेर जर लष्करी हस्तक्षेप केला गेला असेल, तर भारताच्या तिजोरीत त्यासाठी हात घालताना संसदेच्या दोन्ही सभागृहांची मान्यता घेणे कायद्याने बंधनकारक होते. त्यात गोखल्यांनी सुचविलेली दुरुस्ती अशी की प्रत्यक्ष अथवा घडू पाहत असलेले आक्रमण असेल तरच भारतावर त्याबद्दलच्या लष्करी खर्चाचा भार संसदेच्या मान्यतेने टाकावा. केवळ कल्पित धोका आणि प्रतिबंधात्मक कारवाई या नावाने भरमसाट खर्च भारतीय उत्पन्नाच्या भरवशावर करता येणार नाही. त्याचबरोबर

भारतातील प्रत्येक (तत्कालीन ) प्रांताला एक प्रतिनिधी ब्रिटनच्या संसदेच्या आम सभागृहात पाठविण्याची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी गोखल्यांनी केलेली होती.

१८७१ नंतर प्रांतिक सरकारांना महसुलाच्या बाबतीत काही अधिकार मिळाले. तीन प्रकारचा महसूल प्रांतिक सरकारे गोळा करीत. एक प्रकार हा प्रांताने गोळा करून प्रांतासाठी खर्च करायचा. दुसरा गोळा करायचा तो मध्यवर्ती सरकारबरोबर वाटून घेण्यासाठी आणि तिसरा प्रकार हा केवळ मध्यवर्ती शासनासाठीच गोळा करायचा. त्याआधी प्रांतांनी सर्व महसूल गोळा करून शाही तिजोरीत भरायचा आणि व्हाइसरॉय देतील तेवढा निधी खर्च करायचा असा प्रकार होता. त्यामध्ये प्रांतिक सरकारांत गोळा करणे आणि खर्च करणे दोन्ही बाबतीत बेफिकिरी दिसून येऊ लागल्याने लॉर्ड मेयो यांनी विकेंद्रीकरणाचे धोरण अवलंबिले. त्याचबरोबर शाही सरकार आणि प्रांतिक सरकार यांच्यात एक पंचवार्षिक करार करून महसूल, त्याची वाटणी, एकूण खर्चाचे प्रमाण या बाबी निश्चित केल्या जात. या सर्व तरतुदींमध्ये मध्यवर्ती शासनाचाच वरचष्मा राहतो असे गोखल्यांनी दाखवून दिले. परिणामी प्रांतिक सरकारे आर्थिक दृष्ट्या कमजोर राहतात आणि लोकहिताची कामे मागे पडतात. वेल्बी आयोगासमोर आलेल्या आकडेवारीनुसार महसुलाचा पाऊण हिस्सा मध्यवर्ती सरकारकडे आणि केवळ पाव हिस्सा हा प्रांतिक सरकारकडे राहत असे.

अनाठायी वाढणाऱ्या शाही खर्चाबद्दल गोखले सातत्याने टीका करीत आले. त्याची सुरवात वेल्बी आयोगापुढील साक्षीतून झाली. त्यांचे टीकास्त्र धारदार होते. ''सरकारी खर्च वाढणे हे लोकनियुक्त सरकारच्या बाबतीत अर्थव्यवस्थेच्या वाढीचे निदर्शक असते. पण आमच्या बाबतीत मात्र अरेरावी शासन, सदोष वैधानिक व्यवस्था आणि परकी राज्यकर्ते यांच्या संयोगातून आमच्या साधनसंपत्तीचे शोषण होताना आम्हाला पाहावे लागत आहे. आमची भौतिक प्रगती खुंटली आहे, नैसर्गिक सुरक्षितता धोक्यात आली आहे आणि आमच्या डोक्यावर कोणता आर्थिक बोजा लादला आहे तेदेखील आम्हाला ठाऊक होत नाही.'' लष्कराचा आकार आणि त्याच्यावरील खर्च हा भार

अवाजवी आहे हे ते सप्रमाण दाखवून देत. ब्रिटीश साम्राज्यातील इतर देशांच्या बरोबरीला भारताला आणून ठेवायचे असेल तर साधन संपत्तीचा हा बाहेर जाणारा प्रवाह रोखला पाहिजे. त्याशिवाय भारतीयांच्या उन्नतीला कारणीभूत ठरणारे शिक्षण, तंत्रशिक्षण, शेतीतील गुंतवणूक आणि नवे उद्योग हे उपक्रम चालू शकत नाहीत. ''आम्ही का म्हणून स्वतःला कमी समजून युरोपियनांसमोर मान तुकवीत उभे राहायचे? तुमच्या शाळेतील मुले पुढे आपण नेल्सन किंवा वेलिंग्टन होऊ अशी स्वप्ने पाहत त्यासाठी कसून मेहनत करतात. आम्हाला ते का करता येऊ नये? तुमच्या व्यवस्थेत आमची पूर्ण वाढ आणि उन्नती होऊच शकत नाही. कारण आम्हाला आमची लष्करी आणि प्रशासकीय क्षमता वापरण्याची संधीच मिळत नाही. कालांतराने आमच्यातील क्षमता गंजून जातील. मग आम्ही आमच्याच देशात लाकूड तासत आणि पाणी उपसत बसायचे की काय?'' गोखले अशा रीतीने आर्थिक सुधारणांचा संबंध भारतवासीयांच्या नैतिक आणि भौतिक उन्नतीशी जोडत असत. मुंबई इलाख्यातील २५००० गावांमध्ये फक्त ९००० सरकारी प्राथमिक शाळा आहेत आणि शालेय वयातील ८० टक्के मुले चाचपडत आहेत, अशा स्थितीत सरकारला युरोपियन कर्मचाऱ्यांना रुपयाच्या विनिमय दरात घसरण झाल्याने होणारे नुकसान भरून काढण्यासाठी भत्ता देण्याचे सुचते, हे विचित्रच आहे. ही रक्कम संपूर्ण शैक्षणिक खर्चापेक्षा जास्त होते हे त्यांनी दाखविले.

आयोगाच्या सदस्यांना उत्तर देताना गोखले यांनी सांगितले की बिटिश संसदेतील विरोधी पक्ष हे भारतावर टाकणाऱ्या खर्चाच्या भारावर अंकुश ठेवतील ही अपेक्षा फोल आहे. भारतावरील बोजाबद्दल सर्वांचे अलिखित मतैक्य दिसून येते. देशातील साधनसंपत्तीचा वाढता विनियोग हा भारताच्या भौतिक उन्नतीला अडथळा बनून राहिला आहे, हे गोखल्यांचे म्हणणे आयोगाला आव्हानात्मक वाटले. आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ गोखल्यांनी रेल्वेचे उदाहरण घेतले. रेल्वे मार्गांचे जाळे विणल्यामुळे मालाची वाहतूक सुकर झाली आणि दुष्काळ निवारणामध्ये अन्नधान्यपुरवठा झाल्याने जीवितहानी टळली. कापसासारखा कच्चा माल आणि अन्नधान्य यांची निर्यात वाढून शेतकऱ्यांना

अधिक कमाई होऊ लागली हे ही खरे. परंतु विलायतेतला तयार माल इकडे येऊ लागल्यावर आमचे एतद्देशीय उद्योगधंदे मात्र देशोधडीला लागले. त्या कारागिरांना शेतमजुरी करण्याची वेळ आली. ''मग तुमच्या म्हणण्याप्रमाणे भारतात रेल्वे आणायला नको होती की काय ?'' या प्रश्नाला उत्तर देताना गोखले म्हणाले की एका बाजूला रेल्वेचा जोरदार प्रसार आणि दुसरीकडे आमच्यावर मुक्त व्यापार लादण्याची घाई, या दोन्हीचा हा एकत्रित परिणाम आमचे उद्योगधंदे बुडवण्यात झाला आहे. या दोन्ही गोष्टी घाई न करता धिमेपणाने होत्या, तर आमचे उद्योगही स्पर्धेला तोंड देण्याइतके सक्षम होऊ शकले असते. इतर सर्व वसाहतींनी मुक्त व्यापार धोरणाला विरोध केलेला आहे. ''पण इथे नवीन उद्योग सुरु झाले त्याच्याबद्दल काय?'' या प्रश्नावर गोखल्यांनी सांगितले की त्या सर्वात आम्ही कामगार म्हणून काम करतो आणि सर्व नफा हा परदेशात नेला जातो. अधिकाधिक निधी रेल्वेसाठी न वापरता इतर अधिक निकडीच्या क्षेत्रात गुंतवणुकीला प्राधान्य द्या असे गोखल्यांचे प्रतिपादन होते. त्या काळात रेल्वे उभारणीसाठी परदेशात कर्जे काढली जात आणि सर्व रेल्वे कंपन्या या तोट्यात चालत असल्याने भांडवली कर्ज आणि तोटा भरून काढण्यासाठी घेतलेले कर्ज, यावरील व्याजाचा भुर्दंड भारताच्या तिजोरीवर पडत होता. गोखल्यांचे युक्तिवाद आयोगाच्या बहुतेक सदस्यांना चांगलेच झोम्बले.

''तुम्हाला काय वाटते की भारतातील रेल्वेची उभारणी प्रामुख्याने ब्रिटीश व्यापार-उद्योग यांच्या फायद्यासाठी केली जात आहे ?''

''होय. माझे तसे मत आहे. कारण जेव्हा नवीन व्हाइसरॉय भारतात येण्यासाठी प्रस्थान ठेवणार असतात, तेव्हा ब्रिटीश उद्योगपतींचे शिष्टमंडळ त्यांना भेटून रेल्वे जाळे विस्तारण्याविषयी गळ घालते आणि नवनियुक्त महाशय त्यांना आनंदाने शक्य ते सर्व करण्याचे आश्वासन देतात. आर्थिक आयोगाच्या अध्यक्षांनी दुष्काळ निवारणासाठी रेल्वेचे २०००० मैल लांबीचे जाळे पुरेसे आहे, असे सांगितले आहे. तरीसुद्धा आणखी २८ कोटी रुपयांचा विस्तार प्रकल्प तयार केला जात आहे.''

''तुमच्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने स्थापनेपासून जी निवेदने सरकारला दिली त्यामध्ये रेल्वे विस्ताराची मागणी केली नाही काय?'' अशा विस्ताराची मागणी काँग्रेसने कधीच केली नसल्याचे गोखल्यांनी सांगितले. या मताला नंतरच्या काळात वित्तविषयक सदस्य सर गाय फ्लीटवूड विल्सन यांच्याकडून पुष्टी मिळाली. ''भारतीय रेल्वे ही तोट्यात असली तरी एक लखलखीत मालमत्ता आहे. विस्ताराच्या कुठल्यातरी विलक्षण योजना आणून आणि आर्थिक निकष बाजूला सारून त्या मालमत्तेला संकटात टाकू नका.''

आणखी एक विवाद्य मुद्दा होता तो दुष्काळ निवारण निधीचा. १८७८च्या सुमारास तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड लिटन यांनी नवीन कर लादून दरवर्षी दीड कोटी रुपये या निधीत जमा करण्यास सुरवात केली. हा साठत गेलेला निधी दुष्काळाच्या काळात उपयोगी पडेल अशी कल्पना होती. नंतरच्या वीस वर्षात आलेले वित्त सदस्य यांना हा निधी इतर कारणांसाठी वापरावा असे वाटू लागले. गोखल्यांनी दाखवून दिले की या दुष्काळ निधीमधून कर्जावरील व्याज चुकते केले जात होते आणि इतर कोणत्या कारणांसाठी हा निधी वापरला गेला हे कधीही उघड करण्यात आले नाही. त्यामुळे ज्या करदात्यांकडून वाढीव कर बसवून हा निधी निर्माण केला गेला, त्यांच्याशी या कृतीने प्रतारणा होत आहे.

लॉर्ड कर्झन च्या अमदानीच्या सुरवातीस (१८९९ ते १९०५) भारतीय खजिना हा सलग उत्पन्न वाढीने भरून चालला होता. दुष्काळ आणि टंचाई या समस्या हाताळण्याइतका पैसा उपलब्ध होता. विनिमय दरातील अनिश्चितता रुपयाचे मूल्य १६ पेन्स असे निर्धारित केल्याने संपुष्टात आली होती. लॉर्ड कर्झन हे अत्यंत भारदस्त, कर्तृत्वसंपन्न, बुद्धिमान आणि अमोघ वक्तृत्व असलेले व्यक्तिमत्त्व होते. सर्व विभागांना त्याने जोमाने कामाला लावले होते. निधीची कमतरता नव्हती. वातावरण नव्या विचारांनी भारलेले होते. अशा वातावरणात गोखल्यांचे शाही कायदेमंडळात फेरोजशा मेथा यांचे वारस म्हणून १९०२ मध्ये पदार्पण झाले. पहिल्याच भाषणात गोखल्यांनी आर्थिक सुस्थितीचा फुगा फोडला. ते म्हणाले की 'उत्पन्नातून वरकड मिळकत होते आहे यामधून दोन दोष दिसत आहेत. लोकांची विपन्नावस्था वाढत असताना जर वरकड

निर्माण होत असेल तर सरकारला लोकांच्या परिस्थितीशी काही देणेघेणे नाही, हे सिद्ध होते आणि दुसरे म्हणजे या वरकडीमुळे देशात सारे काही आलबेल आहे, असे समजण्यास वाव मिळतो. प्रत्यक्षात जरुरीपेक्षा अधिक उत्पन्न सरकार लोकांकडून वसूल करीत आहे.' गोखल्यांनी सातत्याने आकडेवारी मांडून हे दाखवून दिले की रुपयाची किंमत १३. १ पेन्स असताना जे कर लावले होते, तेच रुपयाची किंमत १६ पेन्स झाल्यावरही चालू राहिले. परिणामी ब्रिटनमधील भारतविषयक खर्च भागविण्यासाठी बाहेर जाणारा ओघ कमी होऊन भारताच्या तिजोरीतील शिल्लक (युद्ध आणि दुष्काळाची वर्षे वगळता) वाढत गेली.

जर येथेही लोकशाही व्यवस्था असती तर भारतीयांना करांच्या बाबतीत विश्वासात न घेता कुठलाही पक्ष निवडून येऊ शकला नसता, असेही गोखल्यांनी कायदेमंडळात बजावले. अंदाजपत्रकीय शिल्लक मुद्दाम कमी दाखविण्याच्या वित्तविषयक सदस्यांच्या प्रवृत्तीवरही गोखल्यांनी टीका केली. कर अवाजवी नाहीत, हे दाखविण्याचा हा खटाटोप आहे असे त्यांनी सांगितले. मणामागे वाढविलेले आठ आणे मिठावरील करातून कमी करा, करपात्र उत्पन्नाची मर्यादा रु ५०० वरून रु १००० सालाना उत्पन्न करा, कापड उत्पादनावरील अबकारी कर माफ करा इ गोष्टी करूनही शिल्लक राहील असे त्यांचे प्रतिपादन होते. सातत्याने उत्पन्न शिल्लक पडू लागल्यावर कोणत्याही सरकारला वारेमाप उधळपट्टी करण्याचा मोह न झाला तरच नवल! आपल्या भाषणाच्या ओघात आपल्या अर्थनीतीचे एक महत्त्वाचे सूत्र त्यांनी अधोरेखित केले. ''राष्ट्रीय उद्योगशीलतेला मुक्त वाव देण्यासाठी करांचे प्रमाण जितके कमी ठेवू तितके चांगले, अर्थात त्यांचा मेळ सरकारी खर्चाबरोबर घातला पाहिजे आणि त्यासाठी काटकसर आणि अनाठायी खर्चाला कात्री लावण्याची प्रामाणिक तयारी पाहिजे.'' सीमापार होणारा खर्च आणि जनतेला अधिकाधिक कंगाल करणारी आर्थिक धोरणे या गोष्टींना पायबंद घातला पाहिजे हे त्या अनुषंगाने येणारे तत्त्वही त्यांनी मांडले.

कायदेमंडळात वित्तविषयक सदस्य हे नेहमी जनतेची आर्थिक स्थिती समाधानकारक

आहे आणि अर्थव्यवस्था मजबूत आहे, हे सांगत असत. वर्षामागून वर्षे जर उत्पन्न शिलकीत पडत असेल तर करांचे प्रमाण वाजवीपेक्षा अधिक आहे आणि कल्याणकारी योजनांवर खर्च केला जात नाही, हे निष्कर्ष निघतात. म्हणून करांचे प्रमाण कमी करा आणि जनतेच्या अभ्युदयाच्या शिक्षण आणि उच्चपदांत समान संधी या योजना राबवा असा गोखल्यांचा आग्रह होता. शेती उत्पादनातील अनिश्चितता हा अंदाजपत्रकातील उत्पन्न कमी दाखविण्याचा नेहमीचा आधार होता आणि त्या आधारावर कर-रचनेचा डोलारा उभा केला जाई. गोखल्यांच्या आग्रहाचा परिणाम होऊन १९०३-०४ मध्ये मिठावरील कर पुन्हा मणामागे २ रु केला गेला आणि आयकरासाठी पात्र उत्पन्नाची मर्यादा रु ५०० वरून रु १००० करण्यात आली. लँकेशायर गटाच्या दबावाखाली कपडा उत्पादनावरील अबकारी कर मात्र तसाच ठेवण्यात आला.

याच सुमारास लॉर्ड कर्झन याने सरासरी उत्पन्न १८८० मध्ये रु २७ होते ते रु ३० झाल्याचे दाखवून जनतेची आर्थिक स्थिती सुधारल्याचे सांगितले. त्याला उत्तर म्हणून गोखल्यांनी सात गोष्टींकडे निर्देश केले. त्या खाली दिल्या आहेत.

१. लोकसंख्येचे मान वाढण्यात घट होत आहे आणि काही मुलखात तर लोकसंख्या घटली आहे.
२. मृत्यूचे प्रमाण कित्येक वर्षे वाढत चालले आहे.
३. लोकसंख्या वाढली असली तरी त्या प्रमाणात मिठाचा वापर वाढलेला नाही.
४. हिंदुस्तानात शेतीमध्ये सार्वत्रिक मंदी आली आहे.
५. लागवडीखालील जमीन जुन्या इलाख्यांमध्ये कमी कमी होत आहे.
६. उच्च प्रतीच्या पिकांसाठीची जमीन उपलब्धता घटत चालली आहे.
७. जनावरांच्या संख्येतही घट दिसून येत आहे.

जगातील इतर देशांच्या तुलनेत ही आकडेवारी जनतेची एकूण विपन्नावस्था दर्शवित आहे, असे गोखल्यांनी सांगितले. आयात करातून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होत आहे, हे अर्थव्यवस्थेच्या सुदृढतेचे गमक आहे, या दाव्याला प्रत्युत्तर देताना

गोखल्यांनी दाखविले की कापड आयातीमुळे देशभरच्या विणकरांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळून ते भूमिहीन मजुरांच्या घोळक्यात सामील झालेले दिसत आहेत. नवीन शतकात प्रवेश केल्यावर ब्रिटीश सरकारने देशाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करावेत, हे गोखले पुनः पुन्हा ठसवित होते. त्यांच्या लेखी उन्नती म्हणजे भौतिक आणि नैतिक प्रगती अशीच अविभक्त होती. एकाशिवाय दुसरे हे वेगळे करता येत नव्हते. त्यासाठीची साधने म्हणजे लोकशिक्षणाचा विस्तार आणि उद्योगांना चालना देणे ही होती.

शिक्षणाच्या प्रसारावर भर देताना गोखल्यांची मागणी ही होती की हा विषय मध्यवर्ती सरकारच्या अखत्यारीत आणावा. म्हणजे ज्याप्रमाणे सरकार लष्करी सेवा आणि रेल्वे यांच्या विस्ताराकडे लक्ष आणि पैसे पुरविते, त्याचप्रमाणे शिक्षणाकडेही त्याला लक्ष द्यावे लागेल. युरोपातील देशांनी अशा प्रकारे शिक्षणात गुंतवणूक केल्याने ते आज प्रगत अवस्थेला पोचले आहेत, असे त्यांचे मत होते. वरकड उत्पन्नाचा विनियोग परदेशातून घेतलेली कर्जे फेडण्यासाठी करावा यावर तत्कालीन वित्त सदस्यांचा भर होता. त्यापेक्षा हे वरकड उत्पन्न शिक्षण आणि उद्योग यांच्या विस्तारासाठी वापरावे हा गोखल्यांचा आग्रह होता. त्यासाठी लोकांच्या नैतिक आणि भौतिक प्रगतीचा सर्वंकष आराखडा बनविणे आणि नेटाने तो राबवत राहणे, हे आवश्यक आहे.

गोखल्यांच्या सततच्या टीकेला प्रत्युत्तर देताना लॉर्ड कर्झन याने त्यांचे वर्णन 'एक विक्षिप्त सद्गृहस्थ असा असतो की तो लख्ख सूर्यप्रकाशात सुद्धा छत्री उघडून बसतो, कारण त्याला पाऊस पडतोय असेच वाटत असते' असे केले. गोखल्यांच्या टीकेचे लक्ष्य झालेला वित्तविषयक सदस्य सर एडवर्ड ली याने म्हटले की 'गोखले कायदेमंडळात येऊन बसले की त्यांच्या चेहऱ्यावर सुतकी भाव नकळत अवतरतो.'' पण गोखल्यांची टीका अनाठायी नव्हती हे नंतर आलेले वित्तविषयक सदस्य बेकर यांनी १९०४-०५ मध्ये केलेल्या बदलांमुळे दिसून आले. वाढत्या महसुलाची नोंद घेत त्यांनी मिठावरील कर आणखी ८ आण्यांनी कमी करून मणामागे दीड रुपया एवढा केला. संयुक्त प्रांत, मध्य भारत आणि पंजाब येथे लावण्यात आलेला दुष्काळ अधिभार काढून टाकण्यात

आला. टपाल, पोलीस, प्राथमिक शिक्षण विस्तार या खात्यात सुधारणांसाठी निधीची तरतूद करण्यात आली. तसेच शेतीविषयक प्रयोग आणि संशोधन यांना वाढीव निधी देण्यात आला आणि जिल्हा व स्थानिक बोर्डांना अर्थसहाय्य वाढविण्यात आले. गोखल्यांनी या सर्व तरतुदींचे मनापासून स्वागत केले. अर्थात तसे करताना, हे ज्याच्यामुळे शक्य झाले ते लोकांकडून वरकड उत्पन्न काढून घेणारे धोरण कसे अन्याय्य आहे, ते सांगायला गोखले विसरले नाहीत. ''कराचा बोजा हलका असला पाहिजे आणि नेहमीचा शासकीय खर्च भागवण्याइतका पुरेसा आणि निश्चित असला पाहिजे, हे तत्त्व सर्वत्र पाळले जाते. ते देश श्रीमंत आहेत आणि भारत देश गरिबांचा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.''

बेकर यांनी लष्करप्रमुख लॉर्ड किचनर यांनी मांडलेल्या लष्कराच्या फेररचनेसाठी दरवर्षी रु ३ कोटी देण्याचे मान्य केले. अर्थातच गोखल्यांनी त्यातला किती भाग अनावश्यक आहे हे सविस्तर मांडले. त्याला उत्तर देताना सर एडवर्ड एलिस यांनी गोखल्यांना लष्करातले काय कळते, अशा आशयाचे विधान करताना म्हटले की ''रशियाबरोबरच्या युद्धात जपानमध्ये गोखल्यांसारखे मुत्सद्दी असते तर काय झाले असते याची कल्पनाच केलेली बरी ''. अजिबात विचलित न होता गोखल्यांनी उत्तर दिले की ,''जपानचे लष्करी निर्णय जपानचे सुपुत्र घेतात. इथे तसे करण्याची आपली तयारी आहे काय? तसे असेल तर सन्माननीय सदस्यांनी आपल्या सहकाऱ्यांना तसे पटवून देण्याचा प्रयत्न करावा.'' त्याचबरोबर जपानने रशियावर विजय मिळविल्याने रशियाकडून वायव्य सरहद्द प्रांताला असणारा लष्करी धोका बऱ्याच प्रमाणात कमी झाल्याचे नमूद करून भारताच्या शिलकीला हात न लावता तुम्ही ब्रिटनमध्ये कर्ज काढून फेररचनेचा खर्च भागवा, असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर रेल्वेवर सगळा उरलेला पैसा खर्च करण्याचा अट्टहास सोडा, असेही ते बजावत असत. शिक्षणासारखी इतर अनेक क्षेत्रे निधीअभावी रखडली आहेत. भारताचा पैसा अन्यत्र वळवला जात आहे, हे सातत्याने घडत असल्याने गोखले हे त्यांचे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे

विधेयक मांडण्यास उद्युक्त झाले असावेत. कारण या विधेयकात गृहीत धरलेल्या ''अवाढव्य खर्चा''बद्दल वित्तविषयक सदस्य सर अरुंडेल यांनी आक्षेप घेताच गोखले म्हणाले की लष्कर फेररचनेचा कार्यक्रम तातडीचा नसल्याने लांबणीवर टाकता येईल किंवा त्याच्यासाठी कर्ज उभारता येईल. गोखल्यांच्या सततच्या टीकेचा परिणाम म्हणून १९०७-०८ च्या अंदाजपत्रकात लष्कर फेररचनेवरचा खर्च ५ लाख पौंडांनी कमी करण्यात आला.

शिक्षण, आरोग्य, देशी उद्योग-व्यापार आणि दारिद्र्य निर्मूलन या गोष्टींनी नैतिक आणि भौतिक उन्नती साधावी, यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यांची कमालीची सचोटी आणि चिकाटी यांचा प्रभाव त्यांच्या सरकारमधील विरोधकांवर पडल्याशिवाय राहिला नाही. पूर्ण विचारांती पूर्ण निर्धाराने आणि पूर्ण प्रामाणिक हेतूने त्यांनी आपले कर्तव्य बजावले.

## स्वदेशी चे अर्थशास्त्र

लॉर्ड कर्झन ने १९०५ मध्ये केलेल्या बंगालच्या फाळणीनंतर जो विरोधाचा उद्रेक झाला. त्यात विदेशी मालावर बहिष्कार आणि स्वदेशीचा पुरस्कार या दोन्हीवर भर दिला गेला होता. बनारस काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात गोखल्यांनी स्वदेशीचा ऊहापोह केला. 'भांडवल, उद्यमशीलता आणि कौशल्य हे तीन घटक उत्पादनाला कारणीभूत ठरतात. आजमितीस आपल्याकडे या तिन्हींचा पुरेसा साठा उपलब्ध नाही. जे कुणी यातल्या कुठल्याही घटकाचे मान वाढविण्यास साह्यभूत ठरतील, त्यांचे आपण स्वागत केले पाहिजे आणि कुणालाही बाजूला टाकता कामा नये. स्वदेशी चळवळीच्या नावाने आपण आपसात फूट पाडणार असलो तर ते सर्वात घातक नुकसान आपलेच होईल.'' भारतात त्या काळात उभे राहिलेल्या उद्योगांवर आततायीपणे 'तुम्ही काहीही आयात करू नका' अशी सक्ती करू नये याकडे गोखल्यांचा रोख होता. १९०७ मध्ये लखनौ येथे केलेल्या भाषणात त्यांनी हा मुद्दा अधिक स्पष्ट केला. ''विदेशी मालाच्या तुलनेत आपला माल दर्जा आणि दर या दोन्ही बाबतीत

एकदम सरस ठरू शकणार नाही. कारण आपल्याला अनुभव आणि कौशल्य अजून कमविण्यास पुरेसा अवधी लागणार आहे. तोपर्यंत केवळ भारतीय ग्राहकांचेच पाठबळ आपण गृहीत धरू शकतो, सरकारचे नव्हे आणि तेही अनंतकाळपर्यंत नव्हे. त्यामुळे केवळ स्वदेशीचा प्रचार करून नव्हे तर उत्पादनातील प्रगती साधूनच आपण देशाच्या प्रगतीकडे वाटचाल करू शकतो. मी हे तुमच्या उत्साहावर पाणी टाकण्यासाठी नाही, तर तुमचा निर्धार बळकट व्हावा यासाठी सांगत आहे.''

◆◆◆

८

# नेत्यांचा नेता
## मूल्यमापन – समकालीनांकडून

## लोकमान्य टिळक

गोखल्यांच्या समकालीनांमध्ये लोकमान्य टिळकांचे नाव अग्रभागी येते. गोखले डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्ये आले ते टिळकांच्या प्रभावामुळे, पण नंतर प्रत्यक्ष काम करताना त्यांच्या तारा जुळल्या त्या आगरकरांबरोबर. पुढे रानड्यांबरोबर सार्वजनिक सभेमध्ये, आगरकरांबरोबर डे.ए. सोसायटीमध्ये आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस मध्ये त्यांना टिळकांचा विरोध पत्करावा लागला. त्यांचे टिळकांशी पराकोटीचे मतभेद होते. परंतु टिळकांनी गोखल्यांच्या निर्वाणानंतर लिहिलेल्या अग्रलेखात त्यांच्या विषयी काढलेले गौरवोद्गार मननीय आहेत. ते म्हणतात :

''लोक गोखल्यांची बुद्धिमत्ता, त्यांचे अविरत परिश्रम व त्यांची सौजन्यशील वृत्ती इ गुणांची प्रशंसा करतात. पण आमच्या मते हे बाह्यात्कारी गुणविशेष आहेत आणि त्याबद्दल मतभेद असू शकतात. पण या सर्व गुणांच्या मुळाशी असणारा आंतरिक स्रोत म्हणजे त्यांची देशहिताबद्दल असलेली निःस्वार्थ निष्ठा. त्यातूनच हे सर्व गुणविशेष उदयाला आले.'' टिळक पुढे म्हणतात की उतारवयात समाजसेवेला लागणे वेगळे आणि सर्व शारीरिक व बौद्धिक क्षमता ऐन भरात असताना देशसेवेत झोकून देणारा गोखल्यांसारखा नेता वेगळा. गोखल्यांच्या मवाळ राजकारणाबद्दल टिळक म्हणतात ,'' त्यांची प्रवृत्ती मवाळ असल्याने त्यांनी कार्यसिद्धीसाठी मवाळ साधनांचा अंगीकार केला आणि आमच्यासारख्या कित्येकांना ती साधने सुयोग्य वाटत नव्हती. पण आहार आणि औषधयोजना याबद्दल दोघा वैद्यांमध्ये मतभेद असले तरी गोखल्यांचे थोरपण आम्ही पूर्णपणे जाणून आहो. आमचा देश उथळ सुखाच्या कल्पनांमध्ये बुडाला असून त्याला या दुर्दशेतून बाहेर काढण्यासाठी बऱ्याच सत्प्रवृत्ती अंगी बाणवाव्या लागतील हे

गोपाळराव यांचे निदान अक्षरशः खरे आहे.......त्यांनी दाखविलेला मार्ग हा सर्वांनी उत्साहाने, धडाडीने आणि निर्धाराने अनुसरला पाहिजे.''

## महात्मा गांधी

महात्मा गांधी हे गोखल्यांकडे आकृष्ट झाले आणि त्यांना गुरुस्थानी मानू लागले. त्यांनी गुजराती मधून गोखल्यांवर लिहिलेले साहित्य संकलित करून नंतर ते Gokhale, My Political Guru या शीर्षकाने इंग्रजी भाषेत प्रसिद्ध करण्यात आले. गांधीजी म्हणतात ,'' संपूर्ण देश गोखल्यांना फार मान देतो, कारण त्यांनी देशासाठी सर्वस्व दिले आहे.'' फेरोजशाह मेथा हे गांधीजींना हिमालयासमान वाटले तर टिळकांचे व्यक्तिमत्त्व सागराप्रमाणे आणि गोखले हे गंगेसमान भासले. हिमालय हा उत्तुंग तर सागर हा अथांग, पण गंगामैया ही सर्वांना सामावून घेणारी आणि सर्वांना जवळची वाटणारी. गांधीजींना गोखले जवळचे वाटले आणि गोखल्यांनी त्यांच्यावर बंधुवत प्रेम केले, त्यांची काळजी घेतली आणि त्यांना मदत तसेच मार्गदर्शनही केले. गोखले दक्षिण आफ्रिकेत १९१२मध्ये गेले त्यावेळेस त्यांच्या दौऱ्याची व्यवस्था गांधीजींनी सांभाळली. या दौऱ्यामध्ये तेथील भारतीयांची स्थिती प्रत्यक्ष पाहून ती सुधारण्यासाठी सरकारकडे प्रयत्न करण्याचा उद्देश होता. यानिमित्ताने गोखल्यांबद्दल काही निरीक्षणे गांधीजींनी नोंदविली आहेत, ती नमुनेदार आहेत.

''त्यांचे प्रत्येक भाषण मी ऐकले, पण मला असा एकही प्रसंग आठवत नाही की ज्यावेळी मला असे वाटले की अमुक उल्लेख त्यांनी टाळायला हवा होता किंवा हे तमुक विशेषण त्यांनी वापरायला हवे होते. त्यांची वाणी सुस्पष्ट, ठाशीव आणि सुसंस्कृत होती. याचे कारण त्यांचे अथक परिश्रम आणि सत्यावर असलेली त्यांची अविचल निष्ठा.'' गांधीजींनी दाखविलेला हा आचार, विचार आणि उच्चार यांच्यातला अतूट संबंध विरळा म्हटला पाहिजे. त्यातून गोखले यांची थोरवी दिसून येते.

याच दौऱ्यामध्ये जोहानसबर्ग येथे फक्त भारतीयांसाठी एक सभा ठेवली होती. गोखल्यांची हिंदी तोडकी मोडकी तर इंग्रजी बहुसंख्य श्रोत्यांना अगम्य. मग गांधीजींनी तोडगा सुचविला की इथे बरेच कोकणी मुसलमान आहेत आणि इतर मराठी भाषक आहेत, तर तुम्ही मराठीत बोला आणि मी ते इतर भाषकांसाठी हिंदुस्तानीमध्ये अनुवाद करून सांगतो. गोखले तयार झाले आणि नंतर जिथे श्रोते केवळ भारतीय होते, तिथे तिथे ते मराठीतून बोलत आणि गांधीजी हिंदुस्तानीतून अनुवाद सादर करीत. गांधीजी सांगतात की गोखल्यांचा प्रत्येक शब्द निर्मल भावना, सत्यनिष्ठा आणि देशप्रेम यांनी जणू चकाकत असे.

गोखल्यांच्या पहिल्या पुण्यतिथीला लिहिलेल्या संदेशात गांधीजी म्हणतात की गीतेमध्ये अर्जुनास कृष्णाने जो सर्व तप, यज्ञ, कृत्य आणि आहारादी क्रिया ईश्वरार्पण करण्याचा उपदेश केला (अ ९ श्लोक २७), तोच गोखल्यांनी अनुसरून त्यांनी जे काही भोगले, त्यागले, लिहिले, सांगितले आणि विचार केले ते सर्व प्रिय मातृभूमीला अर्पण केले.

गोखले हे वैयक्तिक आयुष्यात अज्ञेयवादी होते. ईश्वराचे अस्तित्व स्वीकारण्यासाठी किंवा नाकारण्यासाठी कोणतीही तर्क प्रणाली पुरी पडू शकत नाही. म्हणून हा प्रश्न आणि त्याचे उत्तर शोधणे हे जगण्यासाठी अनावश्यक आहे, असे अज्ञेयवादी मानतात. असे असले तरी गांधीजी म्हणतात की गोखले हे धार्मिक निष्ठेने देशसेवेत गुंतले होते. याचे स्पष्टीकरण देताना गांधीजी आपल्या गोखल्यांबरोबरच्या दोन दशकांच्या स्नेहाचा हवाला देऊन म्हणतात की समर्पित जीवन, कमालीचा साधेपणा, खरेपणाची साक्षात मूर्ती, निखळ मानवता आणि निःस्वार्थ वर्तन हे सर्व गुण गोखल्यांच्या धार्मिक निष्ठेचे द्योतक होते. त्यामुळेच प्रतिपक्षात असलेले युरोपियन देखील गोखल्यांच्या वागण्या बोलण्याने प्रभावित होत. द आफ्रिका भेटीतील प्रसंग सांगताना गांधीजी एक उल्लेख करतात. केपटाऊन येथे एक ज्येष्ठ मुत्सद्दी मि मेरिमन हे गोखल्यांना म्हणाले की '' आपल्यासारखे सज्जन येथे आले की ते आमच्याकडील वातावरण शुद्ध करून जातात.''

# मुहम्मद अली जिना

जिना यांना आपण पाकिस्तानचे जनक म्हणून ओळखतो. ते सुरुवातीच्या काळात काँग्रेसचे सक्रिय सभासद होते आणि त्याकारणाने त्यांचा गोखल्यांशी निकटचा संबंध आला. काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांच्यात १९१६ साली कायदेमंडळातील प्रतिनिधित्वाबद्दल जो समझोता झाला आणि जो 'लखनौ करार' या नावाने प्रसिद्ध आहे, त्यासाठी जिना यांनी पुढाकार घेतला होता. १९२० मध्ये जिना काँग्रेसचा राजीनामा देऊन बाहेर पडले व नंतर मुस्लीम लीगचे नेते झाले. पुढे पाकिस्तानच्या निर्मितीत त्यांचा पुढाकार होता, हा इतिहास सर्वज्ञात आहे.

१९१२ मध्ये जिना आपल्या एका निकटवर्तीयाला असे म्हणाले की ''मी मुस्लिमांमधील गोखले होऊ इच्छितो.'' यावरून त्यांच्या मनात गोखल्यांविषयी किती आदरभाव होता हे स्पष्ट होईल. १९०७च्या सुरत काँग्रेस मध्ये जेव्हा दुफळी झाली, त्यावेळेस जिना हे गोखल्यांच्या बाजूला होते. घटनात्मक मार्गांचा अवलंब हा दोघांमधला समान धागा होता. १९०९ मध्ये गोखले व जिना दोघे शाही विधान परिषदेवर निवडून गेले आणि जिनांना गोखल्यांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. गोखल्यांची बुद्धिमत्ता आणि त्यांचा धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन यांचा जिनांवर प्रभाव पडला. काँग्रेस मध्ये असताना जिनांचे वर्तन पाहून गोखल्यांना असे वाटे की जिना हे सचोटीने वागणारे असून हिंदू मुस्लीम ऐक्याचे ते अग्रदूत होऊ शकतात. गोखल्यांच्या निधनानन्तरची ५ वर्षे जिना त्या मार्गावरून चालले देखील, पण नंतर मात्र त्यांनी आपली वाट बदलली. अर्थात जिनांना अखेरपर्यंत गोखल्यांबद्दल नितांत आदर वाटत राहिला. १९४३च्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात त्यांनी गोखल्यांचा उल्लेख ''बुद्धिमत्तेचे सर्वोच्च शिखर'' या शब्दात केला.

## रमेशचंद्र दत्त

ब्रिटीशांची भारतातील प्रशासकीय सेवा, आय सी एस मध्ये १८७१ मध्ये प्रवेश मिळविणारे दत्त हे आपली प्रशासकीय सेवा उत्तम प्रकारे पार पाडून मुदतीपूर्वी निवृत्त होऊन राजकारणात आले. १८९९ च्या काँग्रेस अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. त्यांनी इंग्रजी मध्ये अर्थशास्त्रावर आणि बंगाली साहित्याच्या इतिहासावर लेखन केले. गोखल्यांची १९०१ला कायदे मंडळात निवड झाल्यावर त्यांनी एक अभिनंदनपर पत्र पाठविले. त्यात ते म्हणतात:

'' चार वर्षापूर्वी लंडनमध्ये मी तुम्हाला प्रथम भेटलो, तेव्हापासून देशाच्या ठायी एकवटलेली तुमची निष्ठा आणि आपले कौशल्य, कर्तृत्व आणि सर्वस्व देशाला अर्पण करण्याचा तुमचा निश्चय हे माझ्या प्रशंसेचा विषय बनले. तुम्ही पूर्वग्रह आणि विरोध हे ओलांडले आहेत. तुमची महत्ता, गुणवत्ता आणि देशभक्ती सर्वांसमोर सिद्ध झाली आहे आणि तरुण पिढीतील एक अत्यंत उमदे, आघाडीचे आणि उत्कृष्ट नेते म्हणून तुम्ही पुढे आला आहात.''

## गोखल्यांचे कर्तृत्व : ऐतिहासिक दृष्टिकोनातून

गांधीजींनी गोखल्यांच्या आध्यात्मिकतेचे स्पष्टीकरण असे दिले होते की निर्भयपणे, सचोटीने, निर्धाराने, निःस्वार्थपणे आणि न्यायबुद्धीने देशाची सेवा करणे ही आध्यात्मिक राजकारणाची लक्षणे गोखल्यांनी पुरेपूर आचरणात आणली होती. आजच्या संदर्भात आपण या तत्त्वाला विवेकनिष्ठा म्हणू शकतो. गोखल्यांनी त्या दृष्टीने ज्या विषयांवर लक्ष केंद्रित केले ते म्हणजे शिक्षण – प्राथमिक आणि तंत्रशिक्षण, अर्थकारण, विकेंद्रीकरण आणि विवेकनिष्ठ प्रशासन. हे सर्व विषय भारताच्या प्रगतीसाठी भविष्यवेधी होते आणि त्यांचे एकत्रित परिणाम आपण आज पाहू शकतो.

तंत्रज्ञानावर आधारित औद्योगिक आणि शेतीतील प्रगती साधणे तसेच भारतीय

उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि प्रशासनाचे विकेंद्रीकरण करणे हे स्वतंत्र भारताच्या सार्वजनिक धोरणाचे स्थायी भाव बनले आहेत. शंभर वर्षांनंतर का होईना आपण शिक्षण हक्क कायदा (२००८) या माध्यमातून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची गोखल्यांनी प्रथम मांडलेली सुविधा निर्माण केली आहे. परंतु या सर्वांच्या मागे विवेकनिष्ठ प्रशासन हा महत्त्वाचा आधार बळकट करण्याकडे आपले पुरेसे लक्ष गेलेले नाही.

हिंद सेवक समाजाच्या माध्यमातून गोखल्यांनी एक अभ्यासाची बैठक असलेली निःस्वार्थ आणि नीतिमान नेत्यांची फळी निर्माण करण्याचा प्रयोग केला. श्रीनिवास शास्त्री, हृदयनाथ कुंझरू आणि ना म जोशी यांच्यासारख्या नेत्यांनंतर प्रा धनंजयराव गाडगीळ आणि प्रा वि म दांडेकर हे भारतातील परिस्थितीला अनुरूप अशी आर्थिक आणि संस्थात्मक धोरणे आखण्यात गुंतलेले होते. या सर्वांना जी साक्षेपी अभ्यासाची परंपरा साथ देत होती, ती रानडे-गोखले या गुरुशिष्य जोडीने महाराष्ट्रात निर्माण केली होती.

या अभ्यासाच्या आधारावरच ब्रिटीशांच्या धोरणांचा प्रतिवाद करणे शक्य होते. ब्रिटीशांचे डावपेच हे संसदीय प्रणालीत पक्के बसवलेले असत. भारताच्या कल्याणाच्या आवरणाखाली आपले हितसंबंध जोपासणे ही त्यांची स्थायी नीती होती. लोकांची वास्तव स्थिती आणि त्यांची उन्नती घडवून आणण्यासाठी कोणती नीती उपकारक आहे हे सिद्ध करणे गोखल्यांपुढील आव्हान होते. त्या पद्धतीचे वाद प्रतिवाद हे संसदीय लोकशाहीचा गाभा होते. भारतात त्यावेळेस संसदीय लोकशाही प्रणालीची सुरवात झालेली नव्हती. परंतु डेक्कन एज्युकेशन सोसायटीमधील आजीव सदस्य मंडळात गोखल्यांना या कार्यपद्धतीचे बाळकडू मिळाले होते. ते बीज पुढे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आणि विविध कायदेमंडळात विकसित झाले. त्यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस तत्कालीन वित्तविषयक सदस्य सर गाय फ्लीटवूड विल्सन यांनी गोखल्यांच्या वादपटुत्वाची तुलना ब्रिटीश पंतप्रधान ग्लॅडस्टन यांच्याशी केली. ज्यांना ज्यांना लोकशाही हे मूल्य अंगी बाणवायचे असेल, त्यांना निष्ठापूर्वक केलेल्या अभ्यासाची जोड वादपटुत्वाला देण्याची

आवश्यकता आहे.

ज्ञानाच्या शाखा विकसित होत असतात, सिद्धांत नवनवीन येत राहतात, मत-मतांतरे चर्चेत येत असतात आणि प्रशासनाच्या निर्णयांवर साधक बाधक टीका होत राहते. या सर्वांना विवेकनिष्ठा असेल तरच मोल राहते आणि लोकांचा विश्वास संपादन करता येतो. गांधीजींनी सांगितल्याप्रमाणे तळमळ, सचोटी आणि न्यायबुद्धी या तीन गोष्टी विवेकनिष्ठेमध्ये सामावल्या आहेत. गोखल्यांच्या बाबतीतली तीन उदाहरणे पुन्हा आठवण्यासारखी आहेत.

पुण्यातील गणेशोत्सवात मेळे असत आणि त्यांत पदे म्हटली जात. या पदांमध्ये गोखल्यांची टिंगल टवाळी केली जात असे. या सर्वांना टिळकांच्या अनुयायांचे पाठबळ असे. टिळकांनी आपल्या अनुयायांना याबाबत कधी अटकाव केल्याचे कुठे नमूद झालेले नाही. मात्र हिंद सेवक समाजातील चर्चेत कुणीतरी टिळकांबद्दल काही टीका टिप्पणी केली, तेव्हा गोखल्यांनी त्याची कानउघाडणी केली आणि सांगितले की टिळकांचे कार्य आणि त्यांचा त्याग इतका मोठा आहे की त्यांची मते पटत नाहीत एवढ्यावरून त्यांना दूषणे देणे योग्य नाही. गोखल्यांची न्यायबुद्धी किती जागृत असे याचे हे उदाहरण आहे. तसेच हिंदू मुसलमानांतील निरनिराळ्या कारणांवरून होणाऱ्या कुरबुरी मिटविण्यासाठी एक संयुक्त समिती नेमण्याचा प्रसंग पहा. आठ हिंदू आणि आठ मुसलमान सद्गृहस्थांची नावे या समितीसाठी सुचविण्यात आल्यावर काही मुसलमान सदस्यांनी सतरावे म्हणून गोखल्यांच्या नावाचा आग्रह धरला. तेव्हा 'अहो मी तर हिंदू आहे' हे गोखल्यांचे म्हणणे बाजूला सारून 'आम्हाला तुम्ही हवे आहात' असे त्यांनी सांगितले. तसेच दक्षिण आफ्रिकेतील युरोपियन श्रोत्याचे उद्गार मननीय आहेत:''तुमचे भाषण ऐकले की आमच्याकडचे वातावरण शुद्ध होऊन जाते.''

याच विवेकनिष्ठेच्या जोरावर गोखल्यांनी स्वकीयांचाच नव्हे तर त्या काळात विरोधक असलेल्या परकीयांचासुद्धा विश्वास संपादन केला, हे महत्त्वाचे सूत्र आजच्या तरुण पिढीने लक्षात ठेवण्यासारखे आहे. लोकशाही व्यवस्था खरोखर केवळ प्रशासकीय

सांगाडा म्हणून निर्जीव न राहता ती सशक्तपणे लोकाभिमुख राहून पुढे न्यायची असेल तर हा परस्पर विश्वास सर्व स्तरांवर आवश्यक आहे.

गोखल्यांच्या बाबतीत त्यांच्या विवेकनिष्ठेची कसोटी प्लेग प्रकरणातील त्यांच्या माफीच्या वेळी लागली. गोखले इंग्लंडात असताना कथित अत्याचार पुण्यात घडलेले. नंतर चौकशी अंती असे काही घडले नाही, कुणी तक्रार करण्यास धजावत नाही अशा स्थितीत प्रशासनाकडून गोखले कोंडीत पकडले गेले. ज्यांनी बातम्या दिल्या ते पुढे येईनात, अशा परिस्थितीत माफी मागणे, हाच सन्मान्य मार्ग त्यांनी निवडला. गुरुजनांचा सल्ला घेतला, पण शेवटी स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून तो घेतला. सार्वजनिक जीवनातून संन्यास घ्यावा इथपर्यंत मनाची तयारी झाली. पण शेवटी प्लेगपीडितांसाठी मदतकार्य करून चुकीचे परिमार्जन करावे असे वाटून त्यांनी प्लेगनिवारण कार्यात स्वतःला झोकून दिले. या ठिकाणी त्यांचे वर्तन हे त्यांच्या विवेकनिष्ठेचे अत्युच्च प्रत्यंतर आणून देणारे ठरले.

भर्तृहरीच्या नीतिशतकातील खालील श्लोक गोखल्यांनी जणू जिवंत करून आपल्यापुढे ठेवला;

**निंदन्तु नीतिनिपुणा यदि वा स्तुवंतु ।**
**लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्टम् ।**
**अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा ।**
**न्याय्यात् पथः प्रविचलन्ति पदं न धीराः ।।**

अर्थात नीतिशास्त्रात प्रवीण असणाऱ्यांनी निंदा करो वा स्तुती करो, पैसे येवोत अथवा जावोत किंवा हवे तेवढे मिळोत, मरण आज ओढवले काय किंवा युगे उलटल्यावर आले काय, ज्यांच्या अंगी धैर्य आहे ते (या कुठल्याच गोष्टीमुळे) न्याय्य मार्गावरून कधी बाजूला जात नाहीत.

जनमताच्या दबावाला झुकून आपल्या मताविरुद्ध वागणाऱ्या नेत्यांची उदाहरणे गोखल्यांच्या अवतीभवती होती, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

**'गोखल्यांची प्रतिष्ठापना मी माझ्या हृदयात केली आहे '** हे गांधीजींचे उद्गार किती उत्कट भाव दर्शवित आहेत !

◆◆◆

# संदर्भ

गोपाळ कृष्ण गोखले यांच्याविषयी विपुल साहित्य हे मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषांमध्ये उपलब्ध आहे. त्याचबरोबर गोखल्यांनी कायदेमंडळांत केलेली भाषणे संकलित स्वरूपात उपलब्ध आहेत. गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे यांच्या खालील संकेतस्थळाचा यासाठी उपयोग होऊ शकतो.

https://dspace.gipe.ac.in

स्वातंत्र्यपूर्व काळात लिहिल्या गेलेल्या साहित्यापेक्षा नंतरच्या काळात लिहिलेल्या साहित्यात फरक असा आहे की विशिष्ट कालमर्यादेनंतर खुली केलेली सरकारी कागदपत्रे अभ्यासकांना उपलब्ध होतात आणि त्यांच्यामुळे इतिहासावर नवा प्रकाश पडू शकतो. या दृष्टीने ब्रिटनच्या सरकारी दप्तरातील कागदपत्रांचा अभ्यास करून बलराम नंदा यांनी इंग्रजीत लिहिलेले खालील पुस्तक महत्त्वाचे आहे.

Gokhale: The Indian Moderates and the British Raj(1977) Nanda BR, Oxford University Press, Delhi

तसेच भारत सरकारच्या दप्तरातील कागदपत्रे अभ्यासून लिहिलेले दुसरे पुस्तक प्रा डी बी माथूर यांचे गोखले चरित्र अभ्यसनीय आहे.

Gokhale : A Political Biography (1966), Mathur DB, Manaktalas, Mumbai

गोखल्यांच्या अर्थकारणाविषयी त्यांच्या मृत्यूनंतर लगेच लिहिले गेलेले वा गो काळे यांचे खालील पुस्तक तपशीलवार माहिती देते.


Gokhale and Economic Reforms(1916): V G Kale, Aryabhushan Press, Pune

टिळक आणि गोखले यांच्या राजकारणाची तुलना करणारी पुस्तके उपलब्ध आहेत. त्या दृष्टीने खालील दोन पुस्तके पाहावीत.

The Myth of the Lokamanya: (1975): Cashman, Richard, The University of California Press, US.

Tilak and Gokhale (1990): Wolpert, Stanley, Oxford University Press India, New Delhi

◆◆◆



## डॉ. आशुतोष भुपटकर

हे व्यवस्थापन क्षेत्रात आधी व्यवस्थापक आणि नंतर प्राध्यापक म्हणून ४० वर्षे कार्यरत होते. त्यांचे शिक्षण पुणे व मुंबई विद्यापीठात झालेले आहे. ते पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य आहेत आणि इतर सामाजिक संस्थांमध्ये विश्वस्त म्हणून सध्या काम करतात. त्यांनी मराठीमधून इंग्रजीमध्ये संतांच्या रचना, ललित तसेच वैचारिक साहित्य अनुवादित केले आहे. ते पुण्यात वास्तव्यास आहेत.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.